जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार ३१ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०

नेपाळमध्ये पुन्हा पुराचा धोका! भोटेकोशी नदीच्या पाणीपातळीत अचानक मोठी वाढ, हाय अलर्ट जारी

मृत्युमुखी पडलेल्यांचा आकडा ७८८ वर

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- नेपाळमध्ये बुधवारी आलेल्या विनाशकारी पुरामुळे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, रविवारी पुन्हा पूर येण्याचे गंभीर संकट निर्माण झाले आहे. भोटेकोशी नदीची पाणी पातळी वाढल्यानंतर प्रशासनाने लोकांना सतर्क राहण्यास सांगितले आहे. रविवारी सकाळी मोबाईल फोनवर पुराचा इशारा पाठवण्यात आला. बचाव पथके काठमांडूला पूरग्रस्त भागांशी जोडणारा महामार्ग मोकळा करण्याच्या कामात व्यस्त आहेत. नेपाळच्या आपत्ती व्यवस्थापन संस्थेने रविवारी मृतांची संख्या ७८८ आणि बेपत्ता लोकांची संख्या २,५०२ असल्याचे सांगितले. चीनमध्ये १६ जणांचा मृत्यू झाला असून ५४६ जण बेपत्ता आहेत. धादिंगमधील विध्वंसाचे दृश्य भीषण आहे. अनेक लोक आपल्या उद्ध्वस्त घरांमध्ये परतले असून, ढिगाऱ्यांमध्ये आणि चिखलात आपल्या वस्तूंचे अवशेष शोधत आहेत. घरांच्या भिंती वाहून गेल्या असून, विजेचे खांब आणि तारा चिखलात अडकल्या आहेत. काही जण चिखलात गाडलेल्या वस्तू बाहेर काढत आहेत. एका माणसाने आपल्या जिवंत कोंबड्या टूकपर्यंत नेल्या. एका महत्त्वाच्या वीज प्रकल्पाचेही मोठे नुकसान झाले असून, त्याचा परिणाम चार जिल्ह्यांतील २०,००० हून अधिक लोकांवर झाला आहे. अनेक पूल कोसळल्याने वाहतूक अवघड झाली आहे.

नदीचा प्रवाह वाढला

मिळालेल्या माहितीनुसार, चीनने नदीच्या वरच्या भागात पाण्याचा प्रवाह वाढल्याचा अहवाल दिल्यानंतर हा इशारा जारी करण्यात आला. बाधित गावांमधील रहिवासी सततच्या इशाऱ्यांमुळे त्रस्त झाले आहेत. कुटुंबांना रात्रीच्या वेळीसुद्धा उंच ठिकाणी जाण्यास भाग पडत आहे. धाडिंगचे रहिवासी गोविंद श्रेष्ठ म्हणाले की, त्यांचे वडील ७२ वर्षांचे आणि आई ७० वर्षांची असून, गरजेच्या वेळी ते त्यांना स्वतः उचलून नेतात. हिमालयीन प्रदेशात एक हिमनदी फुटल्यामुळे हा पूर आला होता. शास्त्रज्ञांच्या मते, हिमनदीच्या खाली झालेल्या दरड कोसळल्यामुळे तिचा मोठा भाग कोसळला आणि त्या खडकांमुळे व वितळलेल्या पाण्यामुळे नद्यांना पूर आला.

नेपाळचे परराष्ट्र मंत्री शिशिर खनाल यांनी हवामान बदलाविरोधात कारवाई करण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणाले की, जागतिक उत्सर्जनात नेपाळचा वाटा केवळ ०.१ टक्के आहे. शास्त्रज्ञांच्या मते, या आपत्तीला थेट जागतिक तापमानवाढीशी जोडणे खूप घाईचे ठरेल, परंतु वाढत्या तापमानामुळे हिमालयात अशा घटनांचा धोका वाढत आहे. दरम्यान, ☞(पान २ वर)

'भाजपाला वाटतंय ते RSS पेक्षा मोठे झाले

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- दिल्लीतील आंदोलनानंतर आता कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी राज्यातील आणि देशातील सरकारी शाळांकडे आपला मोर्चा वळवला आहे. ग्रामीण भागात असलेल्या सरकारी शाळांमधील दुरवस्था दाखवण्यासाठी दिपके यांनी मोहीम हाती घेतलेली आहे. स्वतः अभिजीत दिपके हे विविध गावांमध्ये फिरून शाळांची पाहणी करत आहेत. शाळांमधील विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी दिपके हे काम करत आहेत.

या दरम्यान शाळांमधील समस्या आणि विविध मुद्यांवरून अनेकदा अभिजीत दिपके हे केंद्र आणि राज्य सरकारवर जोरदार टीकाही करत आहेत. आता अभिजीत दिपके यांनी भारतीय जनता पक्षावर आणि पंतप्रधान मोदींवर पुन्हा एकदा जोरदार टीका केली आहे. 'भाजपाला आपण आरएसएसपेक्षा मोठे आहोत असं वाटतंय, पण त्यांनी मोहन भागवत यांचं तरी ऐकलं पाहिजे', असं वक्तव्य अभिजीत दिपके यांनी आज (३० ऑगस्ट) केलं आहे. या संदर्भातील वृत्त पीटीआयने एक्सवर (ट्विटर) दिलं आहे.

अभिजीत दिपके काय म्हणाले?

भाजपाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं ऐकणं किंवा त्यांचा सल्ला घेणं सोडून दिलं आहे का? असा सवाल अभिजीत दिपके यांनी काही दिवसांपूर्वी केला होता. त्यानंतर आता दिपके यांनी भाजपाला आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांचं ऐकण्याचं आवाहन केलं आहे. दिपके यांनी म्हटलं की, 'मी हे आधीपासून सांगत आहे की भाजपाच्या लोकांनी थोडं तरी मोहन भागवत यांचं ऐकलं पाहिजे. मला वाटतं की १२ वर्ष सत्ता हातात असताना आणि एवढ्या सर्व यंत्रणा हातात असल्यामुळे भाजपाला असं वाटतंय की ते आरएसएस पेक्षा मोठे झाले. पण भाजपाने थोडं तरी मोहन भागवत यांचं ऐकलं पाहिजे.'

'मोहन भागवत यांनी 'जेन झी'च्या आंदोलनाला अँटी नॅशनल न बोलण्याचं आवाहन केलं होतं. मात्र, त्यानंतरही पंतप्रधान मोदी यांनी आणखी एक 'दिमागी नक्शल' हा शब्द आणला. त्यामुळे यावरून असं स्पष्ट दिसून येत ☞(पान २ वर)

शेतकरी मेळावा रद्द न केल्याचे परिणाम बंडू जाधवांना भोगावे लागतील : मनोज जरांगे

वडीगोद्रा/वृत्तसंस्था-: मराठा समाज आरक्षणाच्या मागणीसाठी आंतरवाली सराटी येथे एकवटलेला असताना परभणी येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आलेला शेतकरी मेळावा रद्द करावा, अशी मागणी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी खासदार बंडू जाधव यांच्याकडे केली होती. मात्र, मेळावा रद्द न करता तो घेण्यात आल्याने जरांगे यांनी खासदार जाधव यांच्यावर तीव्र शब्दांत टीका करत, या भूमिकेचे गंभीर परिणाम आगामी काळात त्यांना भोगावे लागतील, असा इशारा दिला.

रविवारी(दि. ३०) सकाळी ११ वाजता मनोज जरांगे यांनी मोबाईलवरून खासदार बंडू जाधव यांच्याशी संवाद साधला. मराठा समाजाचा सन्मान राखत मेळावा रद्द करण्याची सूचना त्यांनी केली. मात्र, त्यानंतरही मेळावा झाल्याची माहिती मिळाल्यानंतर जरांगे यांनी आक्रमक भूमिका घेतली.

'समाजाच्या पाठीशी उभे राहण्याची गरज असताना मेळावे घेणे योग्य नाही'

मराठा समाज आरक्षणाच्या प्रश्नावर आंतरवाली सराटी येथे मोठ्या संख्येने एकत्र आला आहे. अशा परिस्थितीत समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याऐवजी परभणीत मेळावा आयोजित करण्यात आल्याबद्दल जरांगे यांनी नाराजी व्यक्त केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे परभणीत आले, मात्र आंतरवाली सराटीकडे फिरकले नाहीत, अशी टीकाही त्यांनी केली.

उपोषणस्थळी मोठ्या प्रमाणात गर्दी- खासदार बंडू जाधव यांनी मेळावा रद्द न करण्याचा निर्णय घेतल्याने ही त्यांच्या राजकीय आयुष्यातील मोठी चूक ठरेल, असे सांगत आगामी काळात त्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतील, असा इशारा जरांगे यांनी दिला. एकनाथ शिंदे यांनाही याचे परिणाम भोगावे लागतील, असे त्यांनी म्हटले. दरम्यान, जरांगे यांच्या समर्थकांनी परभणी गाठण्याची तयारी केली होती. कार्यकर्त्यांकडून वाहनांचीही तयारी करण्यात आली होती. उपोषणस्थळी ☞(पान २ वर)

खासदार संजय जाधव यांच्या मेळाव्याबाहेर जोरदार घोषणाबाजी

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे भाषण सुरू होताच, एक मराठा लाख मराठाच्या घोषणा

खासदार संजय जाधव यांच्या भाषणावेळीही गोंधळ

परभणी/वृत्तसंस्था- शहरात आयोजित शेतकरी व युवा संवाद मेळाव्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे भाषणासाठी उभे राहताच मराठा आरक्षण आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी हा कार्यक्रम रद्द करण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर, सभास्थळी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र उपमुख्यमंत्र्यांनी संयमी भूमिका घेत 'घोषणा देणारे लोक आपलेच आहेत, त्यांना मंचावर बोलवा,' अशा सूचना पोलिसांना व आयोजकांना दिल्या.

या मेळाव्याला परभणी जिल्ह्यासह लगतच्या भागातील शेतकरी व तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. खासदार संजय जाधव यांचे भाषण सुरू असतानाही कार्यक्रमस्थळी काही तरुणांनी 'एक मराठा, लाख मराठा'च्या घोषणा देण्यास सुरुवात केली. त्यामुळे काही काळ सभेत गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थिती चिघळण्याआधीच पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करून घोषणाबाजी करणाऱ्या आंदोलकांना सभास्थळावरून बाजूला केले.

'घोषणा देणारे आपलेच'- एकनाथ शिंदे - आपल्या भाषणाला सुरुवात करताना झालेल्या घोषणाबाजीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शांतता राखत म्हटले, 'घोषणा देणारे हे आपलेच लोक आहेत. पोलिसांनी ☞(पान २ वर)

ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉनचा ढिसाळ कारभार; अनेक स्पर्धकांचा बहिष्काराचा निर्णय

ठाणे /वृत्तसंस्था-: अत्यंत गाजावाजा करून आयोजित करण्यात आलेल्या ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन स्पर्धेच्या नियोजनातील त्रुटी यंदाही समोर आल्या. स्पर्धकांची घटती संख्या, प्रमाणपत्रे आणि पदकांच्या वाटपातील गलथान कारभार, प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीसाठी स्पर्धा उशिरा सुरू होणे, तसेच पाणी आणि अल्पोपहाराच्या उपलब्धतेतील दिरंगाईमुळे अनेक स्पर्धकांनी नाराजी व्यक्त केली. काही स्पर्धकांनी पुढील वर्षीपासून या स्पर्धेवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे महापालिकेच्या आयोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

ठाणे महापालिका आणि ठाणे जिल्हा थलेटिक्स असोसिएशनच्या वतीने रविवारी ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. शिवसेनेचे दिवंगत खासदार सतीश प्रधान यांनी ही स्पर्धा सुरू केली होती. यंदा मॅरेथॉनचे ३२ वे वर्ष होते. रविवारी पहाटेपासूनच धावपटू आणि स्पर्धक महापालिका मुख्यालयाजवळील चौकात जमण्यास सुरुवात झाली होती. यंदाच्या स्पर्धेत ३० हजार स्पर्धकांनी सहभाग घेतल्याचे महापालिकेने ☞(पान २ वर)

मुंब्रा रेतीबंदर खाडीत पोहण्यासाठी गेलेल्या तीन तरुणांचा बुडून मृत्यू

ठाण्यातील धक्कादायक घटना

ठाणे : मुंब्रा रेतीबंदर परिसरातील खाडीत पोहण्यासाठी गेलेल्या तिघांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना रविवारी घडली. तिघांचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात नेण्यात आले आहेत. आलम सय्यद (४२), रिझवान सय्यद (४२) आणि साहिल पोलंदास (३०) अशी मृतांची नावे असून, तिघेही मुंब्रा येथील ठाकूरपाडा परिसरातील रहिवासी आहेत. तिघेही रविवारी दुपारी तीनच्या सुमारास खाडीत पोहण्यासाठी उतरले होते. पाण्याचा अंदाज न आल्याने तिघेही बुडाले. घटनेची माहिती ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्ष, अग्निशमन दल तसेच नारपोली आणि कळवा पोलिसांना मिळाल्यानंतर संबंधित पथके घटनास्थळी दाखल झाली.

आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी शोधमोहीम राबवून तिघांना सायंकाळी ४.२० वाजताच्या सुमारास पाण्यातून बाहेर काढले. त्यांना रुग्णवाहिकेतून कळवा येथील ठाणे ☞(पान २ वर)

पोटगी न दिल्यास वेतन कपात!

ओडिशा सरकारचा नवीन आदेश

भुवनेश्वर वृत्तसंस्था : घटस्फोटित पत्नीला पोटगी देण्यास टाळाटाळ करणाऱ्या व्यक्तीच्या वेतनात कपात करून ती रक्कम संबंधित महिलेच्या बँक खात्यात वळती करण्याचा निर्णय ओडिशातील मोहन चरण माझी सरकारने घेतला आहे. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी अशा स्वरूपाचा आदेशच जारी करण्यात आला आहे. न्यायालयाच्या आदेशानंतरही राज्य सरकारचे अनेक कर्मचारी ☞(पान २ वर)

इंडियन स्पॉट-बिल्ड डक, इंडियन कॉर्मोरंट, लिटल एग्रेट यासह ६१ पक्षीप्रजातींची गोसेखुर्द धरण परिसरात नोंद!

'सीट'च्या मान्सून बर्ड वॉक सर्वेक्षणात १७ घरट्यांचाही शोध; पाणथळ, वनक्षेत्र आणि झुडपी अधिवास पक्ष्यांसाठी अनुकूल

भंडारा /वृत्तसंस्था-: गोसेखुर्द धरण परिसरातील समृद्ध जैवविविधतेचे दर्शन मान्सून बर्ड वॉक सर्वेक्षणातून घडले. 'सेव्ह इकोसिस्टम अँड टायगर'च्या वतीने आयोजित या सर्वेक्षणात गोसेखुर्द धरणाच्या उजव्या बाजूचा परिसर तसेच उमरेड-पवनी-करांडला वन्यजीव अभयारण्याच्या लगतच्या क्षेत्रात पक्षी निरीक्षण करण्यात आले. दोन चमूंच्या माध्यमातून झालेल्या या पाहणीत तब्बल ६१ पक्षीप्रजातींची नोंद झाली असून १७ घरटी आढळून आली.

सर्वेक्षणादरम्यान वैनगंगा नदीकाठचा पाणथळ परिसर, गावठाण, झुडपी क्षेत्र आणि जंगलातील अधिवास यांचा अभ्यास करण्यात आला. गोसेखुर्द धरणालगतचे पाणथळ क्षेत्र, वनस्पतींचे दाट आच्छादन आणि वनक्षेत्र पक्ष्यांसाठी पोषक अधिवास ठरत असल्याचे निरीक्षणातून स्पष्ट झाले.

सर्वेक्षणात इंडियन स्पॉट-बिल्ड डक, लेसर व्हिसलिंग डक, लिटल कॉर्मोरंट, इंडियन कॉर्मोरंट, ग्रेट कॉर्मोरंट, लिटल एग्रेट, ग्रेट एग्रेट, ग्रे हेरॉन, पर्पल हेरॉन, व्हाइट-ब्रेस्टेड वॉटरहेन, रिव्हर टर्न आणि पेंटेड स्टॉर्क यांसारख्या पाणथळ अधिवासाशी संबंधित पक्ष्यांची नोंद झाली. याशिवाय व्हाइट-थ्रोटेड किंगफिशर, कॉमन किंगफिशर, पाइड किंगफिशर, इंडियन रोलर, ब्लॅक ड्रोंगो, इंडियन गोल्डन ओरिओल, शिखरा, पर्पल सनबर्ड, एशियन ग्रीन बी-ईटर, बाया विव्हर आणि इंडियन पॅराडाइज फ्लायकॅचर यांसह विविध प्रजाती आढळल्या. पक्षी निरीक्षणासोबतच पक्ष्यांच्या घरट्यांचेही सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये फ्लायकॅचरची २, रेड- व्हेंटेड बुलबुलची ३ आणि बाया विव्हरची १२ घरटी आढळली. सर्वेक्षणादरम्यान आढळलेल्या पक्ष्यांची नोंद ई-बर्ड या ऑनलाइन पक्षी निरीक्षण व्यासपीठावर करण्यात आली. पक्ष्यांसोबतच त्यांच्या अधिवासाची स्थिती, घरटी, वनस्पती आच्छादन, पाणथळ क्षेत्र आणि परिसरातील अन्य जैवविविधतेचीही नोंद घेण्यात आली. या सर्वेक्षणासाठी पक्षी अभ्यासक राजकमल जोब, मानद वन्यजीव रक्षक शाहिद खान तसेच फ्लायकॅचर्स वाइल्ड फ्रेंड्स, पवनीचे आदित्य उमाटे, वैभव देशमुख, स्नेहा चांदेवार, अभिजीत नागपुरे आणि रुद्रांश समर्थ सहभागी झाले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

महावितरणच्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्याचा विजेचा धक्का लागून जागीच मृत्यू

२५ लाखांची भरपाई आणि कर्मचाऱ्यांवर कारवाईची ग्रामस्थांची मागणी

वुन्हा/प्रतिनिधी:- महावितरणच्या (MSEB) अत्यंत गंभीर हलगर्जीपणामुळे आणि निकृष्ट कामांमुळे एका शेतकऱ्याला आपला जीव गमवावा लागल्याची धक्कादायक घटना तिवसा तालुक्यातील चेनुष्टा येथे घडली आहे. वीजवाहिनीचा (मेनलाईन) तुटलेला तार शेतात पडल्याने विजेचा तीव्र धक्का लागून अशोक शेषरावजी आमले या शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्घटना रविवारी (३० ऑगस्ट) दुपारी ३:०० वाजताच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, चेनुष्टा येथील शेतकरी अशोकराव आमले हे नेहमीप्रमाणे रविवारी दुपारी आपल्या शेतात गेले होते. शेतात महावितरणच्या मुख्य वीजवाहिनीचा तार तुटून खाली पडलेला होता. मात्र, तो तार अशोकराव यांच्या लक्षात न आल्याने त्यांचा सहज स्पर्श झाला आणि विजेचा जोरदार झटका बसून त्यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू

झाला. महावितरणच्या मुख्य वीजवाहिन्यांना सुरक्षेसाठी आवश्यक असणारे गार्डिंग करण्यात आलेले नाही. तसेच वीज वितरण व्यवस्थेची कामे अतिशय निकृष्ट दर्जाची झाली असून, महावितरणचे कर्मचारी व अधिकारी शेतकऱ्यांच्या तक्रारींची वेळेत दखल घेत नाहीत. महावितरणच्या याच मनमानी कारभारामुळे आणि निष्काळजीपणामुळे कुटुंबाचा कर्ता पुरुष गमावल्याची भावना व्यक्त करत चेनुष्टा येथील ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

या घटनेनंतर चेनुष्टा येथील ग्रामस्थ अत्यंत आक्रमक झाले. घटनेस जबाबदार असणाऱ्या महावितरणच्या दोषी कर्मचाऱ्यांना तत्काळ निलंबित/बडतर्फ करण्यात यावे. मृत शेतकऱ्याच्या कुटुंबाला २५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी. कुटुंबातील मुलाला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात यावे, या सर्व मागण्या मान्य होईपर्यंत मृतदेह ताब्यात न घेण्याचा ठाम निर्धार ग्रामस्थांनी केला आहे. तसेच महावितरणच्या कारभाराविरोधात लोकशाही मार्गाने महावितरण कार्यालयावर धडक मोर्चा व तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून प्रशासनाकडून काय पावले उचलली जातात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

इन्स्टाग्रामवरील मैत्रीचे रूपांतर छळात

इग्नोर' केल्याने संताप; जीवे मारण्याची धमकी

-फ्रेजरपुरा पोलिसांत तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

अमरावता/प्रतिनिधी:- इन्स्टाग्रामवर झालेल्या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. मात्र, तरुणाकडून पाळत ठेवून वारंवार फोनद्वारे त्रास दिला जात असल्याने तरुणीने त्याच्याशी बोलणे बंद केले.

याचा राग मनात धरून तरुणाने तरुणीला तसेच तिच्या आई-वडिलांना जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना अमरावती शहरातील फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत समोर आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी सागर भगवान भगत ऊर्फ सॅम (वय २६, रा. नेताजी नगर, वैशाली कॉलनी, यवतमाळ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी २१ वर्षीय शिक्षण घेणाऱ्या तरुणीने फ्रेजरपुरा पोलिसांत तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार, तिची सागर भगत याच्याशी इन्स्टाग्राम ऑपच्या माध्यमातून ओळख झाली होती. ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाल्यानंतर आरोपी तरुण तिच्यावर पाळत ठेवू लागला. त्यामुळे तरुणीने त्याच्याशी बोलणे बंद केले.

यानंतर आरोपीकडून तिला फोन करून त्रास देण्यास सुरुवात झाली. तरुणीने आपल्या आई-वडिलांनी तिच्यासाठी लग्नाकरिता मुलगा पाहण्यास सुरुवात केली असून, यापुढे फोन करून त्रास देऊ नये, असे त्याला स्पष्टपणे सांगितले. मात्र, त्याने तिला धमकावत, 'तू माझ्याशी बोलणे बंद केलेस तर तुला मारून टाकीन आणि तुझ्या आई-वडिलांना फोन करून त्रास देईन,' असे सांगितल्याचे तक्रारीत नमूद आहे. दरम्यान, २८ ऑगस्ट रोजी दुपारी सुमारे १.१३ वाजता आरोपीने एका अनोळखी मोबाईल क्रमांकावरून तरुणीच्या आईच्या मोबाईलवर फोन केला. त्याने तरुणीशी बोलण्याची इच्छा व्यक्त केली.

मात्र, तिच्या आईने नकार दिल्यानंतर आरोपीने त्यांना शिवीगाळ करत मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यानंतर तरुणीने आरोपीशी फोनवर बोलताना त्याला त्रास देणे थांबविण्यास सांगितले. त्यावर आरोपीने, 'तू मला इग्नोर करून चूक करत आहेस. तुझ्या घराचा आधारस्तंभ तुझे वडील आहेत. त्यांनाच संपवून टाकीन. मी तुला सुखाने जगू देणार नाही,' अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी आरोपी सागर भगत याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

मोर्शीतील 'वाघिणी'ची दहशत तिवसा तालुक्यात!

-बछड्यासह वाघीण दिसल्याच्या चर्चा,सोशल मीडियावर उधाण

तिवसा/प्रतिनिधी:- 'वाघ आला रे वाघ आला' ,या चर्चेने व काही घटनेने गेल्या ३ वर्षांपूर्वी तिवसा तालुक्यात चांगलीच दहशत निर्माण झाली होती.मात्र त्यानंतर आता 'वाघिणी'ची दहशत मोर्शी सह तिवसा तालुक्यात पाहायला मिळत आहे.मोर्शी तालुक्यात वाघिणीने एका शेतकऱ्याचा बळी घेतल्यानंतर तिचा वावर हा तिवसा तालुक्याच्या सीमेलगत असल्याने अनेक गावांना सतर्कतेचा ईशारा वनविभागाने दिला आहे.कवठाळ भागात रविवारी एका गायीची शिकार वाघिणी ने केल्याची घटना उघडकीस आली.

मोर्शी तालुक्यातील भांबोरा शेतशिवारात एका शेतकऱ्याचा बळी घेणारा हा वाघ नसून वाघीण असल्याचा दावा वनविभागाने केला आहे.ही वाघीण आज रविवारी तिवसा -मोर्शी सीमेवरील कवठाळ भागात असल्याची व तेथे एका गाईची शिकार देखील केल्याची विश्वसनीय माहिती वनविभागाने आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली. त्या भागात कुठलीही मनुष्यहानी होऊ नये,याकरिता तेथील नागरिकांना सतर्कतेचा इशारा व सूचना देण्यात आल्या आहे.मात्र असे असले तरी ही

कवठाळ भागात आढळलेल्या ठश्यावरून 'वाघीण'असल्याचे निष्पन्न झाले आहे. वाघिणीच्या पंज्याचे ठसे हे लांब असतात.त्यामुळे राजूरवाडी, कवठाळ यासह आजूबाजूला असलेल्या तिवसा तालुक्यातील गावातील नागरिकांनी देखील सतर्क राहावे.कवठाळ भागात वाघिणीला पकडण्यासाठी पिंजरा,ट्रॅप कॅमेरे वैगरे लावून सुरक्षिततेच्या दृष्टीने गस्त ठेवण्यात आली आहे.

-एस डब्ल्यू घोरमाडे, वनपाल,तिवसा वर्तुळ

वाघीण लगतच असलेल्या तिवसा तालुक्यात कधीही प्रवेश करण्याची शक्यता नाकारता येत नाही,त्यामुळे कवठाळ,राजूरवाडी भागच नव्हे तर तिवसा तालुक्यातील करजगाव, दापोरी, सारसी,वरुडा, जावरा,फत्तेपुर, सातरगाव आदी जंगल क्षेत्रानजीक गावात प्रवेश करण्याची देखील शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे तिवसा तालुक्यातील नागरिकांनी देखील शेतात जातांना सुरक्षितेच्या दृष्टीने काठी,टॉर्च व अन्य साहित्य सोबत घेऊन जाण्याच्या सूचना देण्यात येत आहे.

या गावात वाघीण दिसल्याची चर्चा-

मोर्शी तालुक्यात वाघिणी च्या दहशतीचा परिणाम लगतच्या तिवसा तालुक्यात देखील पाहायला मिळत आहे.शनिवारी रात्री जुनी भारवाडी येथे वाघीण दिसल्याने वनविभागाच्या टीमची त्यादिशेने पळापळ झाली.तर रविवारी सकाळी वरखेड भागात ३ बछड्यासह वाघीण दिसल्याचा मॅसेज एका जबाबदार अधिकाऱ्याने व्हाट्सअप ग्रुपवर टाकल्याने तेथून जनतेच्या खबरदारीच्या दृष्टीने तो पुढे व्हायरल करण्यात आला मात्र या गोष्टीला वनविभागाने दुजोरा देत वनविभागाचे लक्ष विचलित होईल,असे कृत्य व मॅसेज कुणीही व्हायरल करू नये,असा संदेश दिला.

१ व १० वरील उर्वरित

नेपाळमध्ये पुन्हा पुराचा धोका!

मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी नेपाळमध्ये एक बचाव पथक पाठवण्याची घोषणा केली आहे. मलेशियाने नेपाळला १० लाख डॉलर्सच्या आर्थिक मदतीचे आश्वासन दिले आहे.

'भाजपाला वाटतंय तs RSS पेक्षा

आहे की भाजपा किंवा पंतप्रधान मोदी हे मोहन भागवत यांचं ऐकत नाहीत. आमचं नाही पण किमान मोहन भागवत यांचं तरी भाजपाने ऐकावं', असं म्हणत अभिजीत दिपके यांनी भाजपावर टीका केली.

शेतकरी मेळावा रद्द न केल्याचे

मोठ्या प्रमाणात गर्दी झाली असून खासदार बंडू जाधव यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात येत असल्याचे चित्र आहे.

मराठा समाजाच्या भूमिकेचाही अवमान...

गोरगरीब मराठा जनतेने मतदान करून बंडू जाधव यांना निवडून दिले. त्यानंतर त्यांनी पक्ष बदलल्याने जनतेच्या मताचा अपमान झाला, असा आरोप मनोज जरांगे यांनी केला. आता मराठा समाजाच्या भूमिकेचाही अवमान झाल्याचे सांगत आगामी काळात समाज आपली भूमिका स्पष्टपणे दाखवून देईल, असा इशारा त्यांनी दिला.

खासदार संजय जाधव यांच्या

आपल्याच लोकांना बाजूला थांबवून ठेवावे किंवा त्यांना मंचावर येऊ द्यावे.' यानंतर त्यांनी आपले भाषण पुढे सुरू ठेवले.

उपमुख्यमंत्री म्हणाले, 'शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या काळात ज्याप्रमाणे विराट सभा व्हायच्या, तशीच ही सभा होत आहे. बाळासाहेबांच्या विचारांची शिवसेना आम्ही पुढे नेत आहोत. परवा रक्षाबंधन झाले, हजारो लाडक्या बहिणी आल्या. आजही अनेक बहिणींनी राख्या बांधल्या. मी विरोधी पक्षनेता होतो, मुख्यमंत्री होतो आणि आता उपमुख्यमंत्री आहे. पण महाराष्ट्रात 'लाडक्या बहिणींचा भाऊ' ही मला मिळालेली सगळ्यात मोठी पदवी आणि ओळख आहे.'

शिंदे म्हणाले, 'मुख्यमंत्री म्हणून काम करताना केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्य सरकारच्या वतीने शेतकऱ्यांना ६ हजार रुपये देण्याचा ऐतिहासिक निर्णय आम्ही घेतला. बळीराजा संकटात असताना हे सरकार सदैव त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील. राज्य सरकारच्या तिजोरीवर पहिला अधिकार हा शेतकरी, युवक आणि लाडक्या बहिणींचाच आहे.'

दरम्यान, पोलिसांच्या सतर्कतेमुळे सभास्थळावरील परिस्थिती लगेच नियंत्रणात आली असून मेळावा सुरळीत पार पडला.

ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉनचा

जाहीर केले होते. मात्र, प्रत्यक्षात सहभागी स्पर्धकांची संख्या कमी दिसत होती.

दरवर्षीप्रमाणे यंदाही गर्दी वाढविण्यासाठी ठाणे महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात आले होते. सकाळी ६ वाजता २१ किलोमीटर गटातील स्पर्धा सुरू होणे अपेक्षित होते. मात्र, प्रमुख पाहुण्यांची उपस्थिती उशिराने झाल्याने ही स्पर्धा सुमारे २० मिनिटे उशिराने सुरू झाली. त्याचा परिणाम इतर गटांतील स्पर्धकांनाही सहन करावा लागला. स्पर्धकांकडून या बाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. तसेच, २१ किलोमीटरच्या मार्गिकेवर मार्गदर्शन करणारे फलकही अपुरे असल्याची तक्रार स्पर्धकांनी केली.

२१ किलोमीटरची स्पर्धा पूर्ण केल्यानंतर आलेल्या अनेक स्पर्धकांना पदके उपलब्ध होऊ शकली नाहीत. त्याचबरोबर तीन किलोमीटरच्या स्पर्धेसाठी शालेय विद्यार्थ्यांनाही सहभागी करून घेण्यात आले होते. ज्या ठिकाणी २१ किलोमीटरची स्पर्धा पूर्ण होत होती, त्याच ठिकाणी तीन किलोमीटर स्पर्धेतील विद्यार्थ्यांचीही सीमा रेषा निश्चित करण्यात आली होती.

सुरुवातीला केवळ २१ किलोमीटरच्या स्पर्धकांसाठी पदकांची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र, तीन किलोमीटरच्या स्पर्धेत सहभागी झालेल्या काही शालेय विद्यार्थ्यांनाही पदके देण्यात आली. त्यामुळे पदक वाटपात गोंधळ झाला. पदके न मिळाल्याने काही विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी मुख्य व्यासपीठासमोरच घोषणाबाजी केली. अखेर महापौर शर्मिला पिंपळोळकर यांच्यासह नगरसेवकांनी त्यांची समजूत काढली. त्यानंतर काही विद्यार्थ्यांनी महापालिका मुख्यालयातही घोषणाबाजी केली.

मुंब्रा रेतीबंदर खाडीत पोहण्यासाठी

महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासून तिघांनाही मृत घोषित केले. याप्रकरणी कळवा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

पोटगी न दिल्यास वेतन कपात!

घटस्फोटित पत्नी किंवा मुलांना दरमहा पोटगी देत नसल्याच्या तक्रारी सरकारकडे आल्या होत्या. यानंतर हा आदेश काढावा लागल्याचे मुख्यमंत्री कार्यालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. प्रत्येक सुनावणीवेळी अशा दोन-तीन तक्रारी मुख्यमंत्र्यांच्या तक्रार निवारण कक्षापर्यंत पोहोचत. याची गंभीर दखल घेत मुख्यमंत्र्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतनातून ही रक्कम कापण्याचे आदेश जारी केले. राज्य सरकारचा कर्मचारी असूनही न्यायालयाच्या आदेशाचा अवमान आणि घटस्फोटित महिला व मुलांशी गैरवर्तन करणे सहन केले जाणार नाही, असे मुख्यमंत्री माझी यांनी म्हटले आहे.

न्यायालयाचा अवमान टळणार- पोटगीच्या प्रकरणांचा समावेश करून राज्य सरकारच्या मानवी संसाधन व्यवस्थापन प्रणालीत सुधारणा करण्याचे आदेशही माझी यांनी दिले आहेत. या निर्णयामुळे न्यायालयाच्या आदेशांचे पालन तर निश्चित होईलच. शिवाय संबंधित महिला व मुलांच्या अडचणीही कमी होतील.

अशी असेल रक्कम कपातीची प्रक्रिया- पोटगी भरण्याबाबत न्यायालयाचा आदेश मिळताच विभागीय डीडीओ सरकारी कर्मचाऱ्याचे मासिक वेतन बिल तयार करेल. त्यानंतर वेतनातून न्यायालयाने निश्चित केलेली पोटगीची रक्कम कापून घेतली जाईल. पुढे ही रक्कम इलेक्ट्रॉनिक माध्यमातून थेट घटस्फोटित महिला किंवा मुलाच्या बँक खात्यात जमा केली जाईल.

हरणाची शिकार करताना

चिंचोली काळे, चांदूरबाजार आणि मोर्शी परिसरातील जंगलांमध्ये नीलगाय, हरण, रानडुक्कर आणि मोर यांसारख्या वन्यजीवांची मोठ्या प्रमाणावर अवैध शिकार केली जात आहे. वन विभागाच्या दुर्लक्षामुळे शिकाऱ्यांचे मनोबल वाढले असून ते आता थेट शेतात घुसून गोळीबार करण्यापर्यंत धजावले आहेत.

दरम्यान, घटनेच्या वेळी काही शेतकऱ्यांनी शिकाऱ्यांचा व्हिडिओसुद्धा काढला असल्याचे समजते. या परिसरात वन्यजीव आणि शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी वन विभागाने चांदूरबाजार व मोर्शी भागात तत्काळ कडक बंदोबस्त आणि गस्त वाढवावी, अशी तीव्र मागणी स्थानिक शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

आठवडी बाजारात एकाची

थेट हाणामारीत झाले. त्यानंतर संशयित आरोपींनी धारदार शस्त्रांचा वापर करीत दोघांवर हल्ला केल्याची प्राथमिक माहिती आहे. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. घटनेची माहिती मिळताच बडनेरा पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसराची पाहणी करून पंचनामा करण्याची कार्यवाही सुरू केली. या प्रकरणात हत्या केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविली आहेत.दरम्यान, आठवडी बाजार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज पोलिसांकडून तपासले जात असून, हल्लेखोरांची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. हल्ल्यामागील नेमके कारण काय, तसेच या घटनेत आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास बडनेरा पोलीस करीत आहेत. रविवारी घडलेल्या या रक्तरंजित घटनेमुळे आठवडी बाजार परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

नरभक्षक वाघिणीची मोर्शीत

दरम्यान त्या वाघाने कळपातील एका गाईला पकडले मात्र ती गंभीरित्या जखमी झालेली गाय कशी तरी वाघाच्या तावडीतून सुटली.दुसऱ्या गुराख्याने आरडाओरड केल्यामुळे वाघीण तेथून निघून गेली. दुपारी जनावरे चारून घरी परतली. त्यावेळी एक गाय कमी असल्याचे आढळून आले.ही माहिती पाथरे यांनी वनविभागाला दिली. वनखात्याचे अधिकारी व त्यांनी स्वतः चराई क्षेत्राकडे गाईचा शोध सुरू केला असता जोरदार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे गाईचा शोध घेणे कठीण झाले.शेवटी आज पुन्हा ही सर्व टीम गाईचा शोध घेण्यासाठी गेले असता त्यांना त्या गाईवर वाघाने हल्ला करून तिला मारून टाकल्याचे आढळून आले.वन विभागाच्या वतीने ड्रोन कॅमेराच्या साह्याने वाघाचा शोध घेणे सुरू असून घटनास्थळी वाघाचे पगमार्क दिसून आले. मृतक चरणदास इखे यांच्या वेळी असलेले पगमार्क हे मॅच होत असल्याने त्याच वाघाने गाईचा जीव घेतल्याचे निष्पन्न झाले.त्या ठिकाणी सध्या वनविभागाने ट्रॅप पिंजरा लावला आहे.काल शेतात कामावर जाणाऱ्या एका व्यक्तीसमोर वाघ चालून आला मात्र त्याने आरडाओरड करून तेथून धूम ठोकली व सदर शेतकऱ्याने झाडाचा आडोसा घेऊन जीव वाचविण्याचा प्रयत्न केल्याने मोठा अनर्थ टळला. वाघाच्या हल्ल्याच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे पाहून परिसरातील शेतकरी शेतमजुरांनी शेतात जाणे बंद केले आहे. त्यांच्या रोजगारावर सुद्धा परिणाम झाला आहे. पिकांची कामे रखडल्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. कवठाळ, भांबोरा,येवती,निंभारणी या गावातील ग्रामस्थांनी शेतकरी शेतमजुरांनी वनविभाग प्रशासनाकडे वाघाला तातडीने जेरबंद करण्याची मागणी केली आहे. तसेच शेतकरी शेतमजुरांच्या सुरक्षेतेसाठी आवश्यक उपाययोजना करण्याची सुद्धा मागणी केली आहे.

अफवांवर विश्वास ठेवू नका-

वनविभागाच्या वतीने रात्रंदिवस वाघाचा शोध घेण्याची विशेष मोहीम राबविली जात आहे.मात्र वाघ हा हुलकावणी देऊन निघून जात असल्यामुळे वन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

तालुक्यातील काही युवक इंस्टाग्राम सारख्या सोशल मीडियावर वाघाचे वेगवेगळे फोटो टाकून तसेच फ्लॅश लावून लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहे.तरी अशा अफवांवर कोणी विश्वास ठेवू नये.

-योगिता मगर, वनपरिक्षेत्राधिकारी मोर्शी.

तक्रार निवारण शिबिरातच

आल्याचा आरोप पीडित महिलेने केला आहे. त्यामुळे तक्रारीतील सर्व आरोपींची नावे, घटनास्थळी उपस्थित व्यक्ती, प्रत्यक्षदर्शी आणि उपलब्ध पुरावे यांची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

पीडित महिलेने पुढे निवेदन देऊन या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून न्याय मिळवून देण्याची मागणी केली आहे. जातिवाचक शिवीगाळीचा आरोप सिद्ध होत असल्यास अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार आवश्यक ती कारवाई करावी, संबंधित आरोपींवर कायद्यानुसार कठोर गुन्हे दाखल करावेत आणि पीडितेला संरक्षण द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

सार्वजनिक कार्यालयात, तेही तक्रार निवारणाच्या कार्यक्रमात, एका महिलेचा अशा प्रकारे अपमान झाल्याचा आरोप हा साधा वाद मानून झटकण्याचा प्रकार नाही. हा आरोप खरा असेल तर प्रशासनाच्या नाकावर टिच्चून कायद्याची पायमल्ली झाल्याचेच चित्र आहे. त्यामुळे या प्रकरणात केवळ कागदी चौकशी न करता प्रत्यक्ष सत्य बाहेर आणण्याची जबाबदारी पोलिस आणि प्रशासनाची आहे.

दरम्यान, घटनेमुळे कविठा बु. परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून आरोपींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. पीडितेला न्याय मिळाला नाही किंवा प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाला तर आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

वंचित बहुजन युवा आघाडीचे तालुकाध्यक्ष विनोद नरवाळे यांनी या घटनेचा तीव्र निषेध केला. 'महिलेवर ग्रामपंचायत कार्यालयासारख्या सार्वजनिक ठिकाणी मारहाण, जातिवाचक शिवीगाळ आणि विनयभंगाचा प्रयत्न झाल्याचा आरोप अत्यंत गंभीर आहे. हा प्रकार केवळ एका महिलेवरील अन्याय नसून संविधानिक मूल्ये, कायदा आणि सामाजिक न्यायव्यवस्थेवर झालेला हल्ला आहे. पोलिसांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता सर्व आरोपींविरुद्ध तातडीने आणि निष्पक्षपणे कारवाई करावी. आरोपींची नावे वगळणे किंवा प्रकरण दडपण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही. पीडितेला तात्काळ संरक्षण, न्याय आणि योग्य ती मदत मिळाली पाहिजे; अन्यथा वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,' असा इशारा त्यांनी दिला.

दलित वस्त्यांच्या प्रश्नावर

असेल तर तो कुठे खर्च झाला? कोणत्या वस्त्यांवर झाला? किती खर्च झाला? आणि पात्र दलित वस्त्या आजही मूलभूत सुविधांपासून वंचित का आहेत? या प्रश्नांची उत्तरे आता कागदोपत्री नव्हे, तर जनतेसमोर द्यावी लागणार आहेत.

आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी न होणे हा केवळ प्रशासकीय विलंब नसून अनुसूचित जातीच्या नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांशी संबंधित गंभीर बाब असल्याचा आरोप मोहोड यांनी केला आहे. वैधानिक आयोगाच्या आदेशालाच तीन वर्षे दाद न देण्याचे धाडस प्रशासन करीत असेल, तर सामान्य नागरिकांच्या तक्रारींची काय अवस्था असेल, याचा अंदाज यावरूनच यावा.

आरपीआयने आता थेट आरपारची भूमिका घेतली आहे. आयोगाच्या ३१ मार्च २०२३च्या स्मरणपत्राची तात्काळ अंमलबजावणी करून सर्व पात्र दलित वस्त्या घोषित कराव्यात, आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्या तत्कालीन व विद्यमान मुख्याधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून निलंबनाची कारवाई करावी आणि दलित वस्ती सुधार योजनेचा निधी अन्यत्र वळविला असल्यास त्याची सखोल चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाला १५ दिवसांची मुदत देण्यात आली असून या कालावधीत ठोस कार्यवाही न झाल्यास अचलपूर नगर परिषदेसमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा किशोर मोहोड यांनी दिला आहे. त्यामुळे आता प्रशासनाने फाईल हलवायची की आंदोलनाची ठिणगी पेटू द्यायची, याचा निर्णय घ्यावा लागणार आहे. तीन वर्षे आयोगाच्या आदेशाला धूळ चारणाऱ्या नगर परिषद प्रशासनाने आता तरी जागे व्हावे; अन्यथा दलित वस्त्यांचा हा प्रश्न नगर परिषदेच्या दारातच धगधगता आंदोलनाचा केंद्रबिंदू ठरण्याची चिन्हे आहेत.

विहिरीत आढळलेल्या महिलेच्या

तपासाच्या आधारे पूजा हिची हत्या तिचा पती दशरथ यानेच केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. आरोपी सध्या तामिळनाडूतील पेराम्बूर येथे असल्याची माहिती मिळाल्याने तपास पथक तातडीने तामिळनाडूकडे रवाना झाले. मात्र, पोलिसांचा सुगावा लागताच आरोपी तेथून निघून पांढरकवडा, यवतमाळकडे आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पथकाने त्याचा पाठलाग सुरू ठेवत पांढरकवडा-यवतमाळ मार्गावर आरोपी दशरथ मांगुळकर याला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता त्याने पत्नी पूजा हिची हत्या केल्याची तसेच तिचे हात-पाय बांधून मृतदेह विहिरीत फेकून दिल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर आरोपीला माहुली जहांगीर पोलीस ठाण्यात आणून अटक करण्यात आली. न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक प्रकाश पाटील, माहुली जहांगीर पोलीस ठाणे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी (दर्यापूर, अतिरिक्त कार्यभार अमरावती ग्रामीण) सतीश कुलकर्णी, पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास पथकात पोलीस उपनिरीक्षक देवेंद्र मेशकर, पोलीस अंमलदार सैयद अजमत, प्रवीण मेश्राम, प्रशांत ढोके, पंकज फाटे तसेच सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार विकास अंजीकर यांचा सहभाग होता.

'दवाखान्याचे काम' सांगून

केली असता त्यांनी दर्यापूर-अमला मार्गावरील शेताजवळून हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल चोरी करून ती अजय चव्हाण याला विकल्याची कबुली दिली. चौकशीदरम्यान आरोपींनी आणखी एक मोटरसायकल चोरी केल्याचेही समोर आले. दर्यापूर येथून चोरी केलेली दुसरी हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल त्यांनी 'दवाखान्याचे काम आहे' असे सांगून अकोट तालुक्यातील केळीवेळी येथील शेख इरफान शेख उस्मान याला तीन हजार रुपयांत विकल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी दोन्ही मोटरसायकली जप्त करून आरोपींसह त्यांना दर्यापूर पोलिसांच्या ताब्यात दिले. मोटरसायकल चोरीच्या अनुषंगाने दर्यापूर पोलिस ठाण्याच्या अभिलेखाची तपासणी केली असता गुन्हा दाखल असल्याचे आढळून आले. त्यामुळे सदर गुन्ह्याची उकल झाली आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने, अपर पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक सतीश झाल्टे तसेच पोलिस अंमलदार मंगेश लकडे आणि सचिन मसांगे यांच्या पथकाने केली.

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

रिसोडमधील अवैध धंद्यांना लगाम घाला ; अन्यथा वरिष्ठ अधिकाऱ्यांसह गृहमंत्र्यांकडे धाव घेणार

हातभट्टी दारू, जुगार, वरली-मटका व अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात तसवर खॉ गुलाम गौस खॉ यांचे पोलिसांना निवेदन

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड पोलीस स्टेशनच्या हद्दीत सुरू असलेल्या हातभट्टी दारू, जुगार, वरली-मटका तसेच अवैध प्रवासी वाहतूक यांसह विविध अवैध धंद्यांवर तातडीने कारवाई करून ते कायमस्वरूपी बंद करण्यात यावेत, अशी मागणी खॉ तसवर. गुलाम गौस खा यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी रिसोड पोलीस स्टेशनमध्ये निवेदन सादर करून प्रशासनाचे लक्ष या गंभीर प्रश्नाकडे वेधले आहे.

रिसोड शहरासह परिसरातील विविध भागांमध्ये अवैध धंदे सुरू असल्यामुळे सामाजिक वातावरणावर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. हातभट्टी दारूमुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत असून, जुगार व वरली-मटक्याच्या आहारी जाऊन अनेक नागरिक आर्थिक अडचणीत सापडत आहेत. त्याचबरोबर अवैध प्रवासी वाहतुकीमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याने या सर्व प्रकारांना

आळा घालण्याची गरज असल्याचे तसवर खॉ. गुलाम गौस खॉ यांनी म्हटले आहे.

पोलीस प्रशासनाने या अवैध धंद्यांची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित ठिकाणी कठोर कारवाई करावी, तसेच अवैध व्यवसायांना पाठबळ देणाऱ्या व्यक्तींवरही कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. केवळ कारवाई करून थांबण्याऐवजी हे धंदे पुन्हा सुरू होणार नाहीत, यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

'रिसोड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सर्व अवैध धंदे तातडीने बंद झाले पाहिजेत. नागरिकांच्या हितासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलली नाहीत, तर हा प्रश्न विभागीय पोलीस अधिकाऱ्यांपासून थेट गृहमंत्र्यांपर्यंत मांडून अवैध धंदे बंद करण्यासाठी लढा उभारला जाईल,' असा इशारा तसवर खॉ. गुलाम गौस खॉ यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

या मागणीमुळे रिसोड शहर व परिसरातील अवैध धंद्यांच्या प्रश्नावर पोलीस प्रशासन आता कोणती भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसह सामाजिक शांतता आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

ज्वेलर्स दुकानात मध्यरात्री चोरीचा प्रयत्न फसला ; गॅस कटरने तिजोरी फोडण्याचा प्रयत्न

■ प्रतिनिधी | मानोरा ■

मानोरा शहरातील डिग्रस चौक येथील शहाणे ज्वेलर्स दुकानात अज्ञात ४ चोरट्यांनी मध्यरात्री गॅस कटरच्या साहाय्याने चोरी करण्याचा प्रयत्न केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. दुकान मालकाच्या भावाने वेळीच धाव घेतल्याने चोरट्यांना पळ काढावा लागला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राठी नगर, मानोरा येथील रहिवासी व डिग्रस चौकातील ज्वेलर्स व्यावसायिक यांचे सोने-चांदी खरेदी-विक्रीचे दुकान आहे. त्यांच्या दुकानाला लागूनच त्यांच्या मालकीचा आणखी एक गाळा असून त्यात वेगळी खोली आहे. त्या खोलीत दोन लोखंडी तिजोऱ्या ठेवल्या होत्या, ज्यात दुकानातील सोन्या-चांदीचे दागिने ठेवले जात होते. दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता दुकान बंद करून ते घरी गेले होते. तर मध्यरात्री १.३० वाजण्याच्या सुमारास त्यांचे लहान भाऊ गोपाल शहाणे यांना दुकानासमोरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कोणतेही दृश्य दिसत नसल्याने संशय आला. त्यांनी दुकानाकडे धाव घेतली असता, त्यांच्या आवाजाने दुकानातून ४ लोक शटरमधून बाहेर पळत आले. त्यापैकी ३ जण दुकानासमोर उभ्या असलेल्या पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीमध्ये बसून पसार झाले, तर एक जण त्यांच्या गाडीमागे पळत जाऊन डिग्रस चौकामध्ये जाऊन गाडीत बसला. दुकानात जाऊन पाहणी केली असता, बाहेरील शटरच्या

४ चोरटे पांढऱ्या स्कॉर्पिओतून पसार, गुन्हा दाखल

लॉकच्या पट्ट्या तोडलेल्या, आतील लहान शटरचे कुलूप तुटलेले, तर गोदरेज कंपनीच्या तिजोरीचे लॉक आणि की-होल गॅस कटरने जाळल्याचे दिसून आले. घटनास्थळी एक इंडेन कंपनीचा गॅस सिलेंडर, एक मोठा ऑक्सिजन सिलेंडर ज्याला लाल व निळ्या रंगाच्या नळ्या जोडून गॅस कटर तयार केले होते, तसेच एक प्लास्टिक मुठ असलेला लोखंडी कोयता आढळून आला. या प्रकरणी मानोरा पोलीस स्टेशनमध्ये चार अज्ञात चोरट्यांविरुद्ध चोरीच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

रूषदा ठाकरे ने शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यात दुसरा क्रमांक पटकावला

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

अमानी येथे कार्यरत असलेले (ग्राम महसूल अधिकारी) जगन महाले यांची भाची रूषदा ठाकरे इयत्ता चौथी हिने शिष्यवृत्ती परीक्षेत ९९ बोर्ड मधून वाशिम जिल्ह्यांतून दुसरा क्रमांक पटकावला असलेल्या मुळे तिचा शिक्षक आमदार किरणराव सरनाईक यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला, महादेव ठाकरे शिक्षक यांची कु.रूषदा ठाकरे ही मुलगी असुन वाशिम जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित वाशिम यांच्या वतीने आयोजित सेवा निवृत्त शिक्षकांचा व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ कार्यक्रमात हा सत्कार करण्यात आला, यावेळी आ. किरणराव सरनाईक यांच्यासह आदी मान्यवरांची उपस्थितीत सेवा निवृत्त शिक्षक व गुंतवण विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला, शिक्षक वृंद व पालक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

'सुपर ग्रेन बॅग' द्वारे सुरक्षित धान्य साठवणुकीचे प्रात्यक्षिक

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने आदिवासी उपयोजना (ऊएइ) अंतर्गत रिसोड तालुक्यातील आगरवाडी येथे घरगुती स्तरावर धान्याची सुरक्षित, गुणवत्तापूर्ण व दीर्घकालीन साठवणूक करण्यासाठी 'सुपर ग्रेन बॅग' तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक दि. २९ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आले. हा कार्यक्रम कृषी विज्ञान केंद्र, वाशिमचे प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

ग्रामीण व आदिवासी भागात उत्पादित धान्याच्या शास्त्रीय साठवणुकीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा मर्यादित असल्याने साठवणुकीदरम्यान किडींचा प्रादुर्भाव, आर्द्रतेचे प्रमाण वाढणे, बुरशीजन्य संसर्ग, धान्याची गुणवत्ता व वजन घटणे तसेच साठवणूक नुकसान यांसारख्या समस्या

उद्भवतात. या पार्श्वभूमीवर घरगुती स्तरावर धान्याची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी आणि साठवणुकीतील नुकसान कमी करण्यासाठी सुपर ग्रेन बॅग हे प्रभावी, व्यवहार्य व तुलनेने कमी खर्चाचे साठवणूक तंत्रज्ञान असल्याने त्याच्या वापराबाबत प्रात्यक्षिक घेण्यात आले. कार्यक्रमादरम्यान शुभांगी वाटाणे, प्रमुख, गृहविज्ञान, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांनी उपस्थित लाभार्थी व महिलांना सुपर ग्रेन बॅगच्या शास्त्रीय वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. धान्य साठवणुकीपूर्वी धान्याची स्वच्छता, योग्य वाळवणूक, सुरक्षित आर्द्रता पातळी राखणे, कचरा व अशुद्धी दूर करणे आणि साठवणुकीस योग्य धान्याची निवड या बाबींचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी सुपर ग्रेन बॅगमध्ये धान्य योग्य पद्धतीने भरणे, आतील पिशवीत कमीतकमी हवा राहील याची काळजी घेणे, बॅगची हवाबंद बांधणी करणे, योग्य ठिकाणी साठवणूक करणे तसेच साठवणुकीच्या कालावधीत बॅगची नियमित पाहणी करणे याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. हवाबंद वातावरणामुळे कीड व इतर साठवणूक घटकांच्या वाढीस अनुकूल परिस्थिती कमी होण्यास मदत होते आणि त्यामुळे धान्याच्या गुणवत्तेचे संरक्षण करता येते, असे मार्गदर्शन करण्यात आले.

आदिवासी उपयोजना (ऊएइ) अंतर्गत लाभार्थी कुटुंबांना सुपर ग्रेन बॅगचे वाटप करण्यात आले. त्यामुळे आदिवासी कुटुंबांना आधुनिक धान्य साठवणूक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव मिळून त्याचा घरगुती स्तरावर प्रभावीपणे वापर करण्याची संधी उपलब्ध झाली.

या उपक्रमातून 'शास्त्रीय साठवणूक – कमी नुकसान – सुरक्षित अन्नधान्य' या संकल्पनेला प्रोत्साहन मिळणार असून, ग्रामीण व आदिवासी कुटुंबांच्या अन्नसुरक्षा आणि धान्याच्या गुणवत्तेच्या संरक्षणासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.

ब्राम्हणवाडा येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगांव तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथील जिल्हा परिषद शाळेत रविवार, ३० ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत स्वाधीन बहुउद्देशीय संस्था, पाडी यांच्या वतीने भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

ग्रामपंचायत व जिल्हा परिषद शाळा, ब्राम्हणवाडा यांच्या सहकार्याने आयोजित या शिबिराला महिला तसेच ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिरामध्ये नागरिकांची आरोग्य तपासणी, वैद्यकीय मार्गदर्शन व आरोग्यविषयक जनजागृती करण्यात आली. विविध आरोग्यविषयक समस्यांबाबत डॉक्टरांनी नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन केले. तसेच बोरकर क्लिनिकल लॅब, पातूर यांच्या माध्यमातूनही तपासणीसाठी सहकार्य करण्यात आले. यावेळी डॉ. पी. डी. मोरे , डॉ. गुलाबसिंग सोळंके यांच्यासह फार्मसी देवेश नीलकंठ उपस्थित होते. स्वाधीन बहुउद्देशीय संस्थेचे सेक्रेटरी निलेश हिवराळे यांनी शिबिराच्या आयोजनासाठी पुढाकार घेतला.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ कर्मचारी पतसंस्था मर्या अकोला ची वार्षिक आमसभा संपन्न

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

दि. २९ ऑगस्ट रोजी ललित कला भवन डबकी रोड येथे संपन्न झाली सदर पतसंस्थेत भागधारक म्हणून मंडळातील वाशिम अकोला यवतमाळ अमरावती आणि बुलढाणा येथील कर्मचारी आहे. आमसभेचे अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे अध्यक्ष प्रमोद घोडचर मंगरूळपीर हे होते तर प्रमुख उपस्थिती सचिव सुरेंद्र शिरसाट कोषाध्यक्ष मोहन तायडे सदस्य सुभाष लहाने, मनीष सरदार, विनोद देशमुख, संचालिका किरण भोगे, ज्योती खत्री होत्या तर प्रमुख उपस्थिती सहाय्यक कल्याण आयुक्त नागपूर श्रीकांत धोत्रे, होते गुणवंत कामगार मावळे तसेच उपस्थिती श्री पंजाबराव देशमुख, कैलास बचे सहदेव ठाकरे होते प्रथम पाहुण्यांचे हस्ते दिप प्रज्वलन करून सरस्वतीतेचे पूजन करण्यात आले पाहुण्यांचा तथा संचालक मंडळ आणि माजी अध्यक्ष यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ आणि शिल्ड देऊन सत्कार करण्यात आला नंतर गुणवंत कामगार पाल्याचा धनादेश, शिल्ड देऊन सत्कार करण्यात आला अहवाल वाचन तथा सूत्रसंचालन संचालक विनोद देशमुख यांनी तर प्रास्ताविक अध्यक्ष प्रमोद घोडचर यांनी आणि विशेष मार्गदर्शन श्रीकांत धोत्रे तथा मावळे, पंजाबराव देशमुख व कैलास बचे यांनी केले तर मार्गदर्शन संस्थापक अध्यक्ष सतीश दाभाडे, आणि सहाय्यक कल्याण आयुक्त वैशाली नवघरे यांनी केले नंतर सर्व सभासद भोजन आणि लाभांशाचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.

मंगरूळपीर पोलिस स्टेशनमध्ये रक्षाबंधनाचा कार्यक्रम

मंगरूळपीर : रक्षाबंधनानिमित्त मंगरूळपीर पोलिस स्टेशनमध्ये गुडलाईफ फाउंडेशनच्या अध्यक्षा गीता वोरा यांच्या पुढाकाराने रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी गीता वोरा व फाउंडेशनच्या सदस्यांनी पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना राखी बांधून रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या.

पोलिस बांधव समाजाच्या सुरक्षिततेसाठी सदैव तत्पर असतात. त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी पोलिस अधिकारी, कर्मचारी तसेच गुडलाईफ फाउंडेशनचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

१९ वर्षीय ऋतूजा गोटे यांचे मरणोत्तर नेत्रदान

■ प्रतिनिधी | वाशिम ■

नेत्रदान पंधरवड्याच्या निमित्ताने विनायकनगर येथील १९ वर्षीय कु. ऋतूजा बालाजी गोटे यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी मरणोत्तर नेत्रदानाचा निर्णय घेतला. या नेत्रदानामुळे दोन अंध व्यक्तींना दृष्टी मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. दुःखाच्या प्रसंगी गोटे कुटुंबीयांनी सामाजिक बांधिलकी जपत घेतलेल्या या निर्णयाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

ऋतूजा यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी आपल्या मुलीच्या डोळ्यांमुळे गरजू व्यक्तीच्या जीवनात प्रकाश येऊ शकतो, या भावनेतून नेत्रदानास संमती दिली. नेत्रदानामुळे ऋतूजा यांच्या स्मृती कायम राहण्याबरोबरच इतरांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण

होणार आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी व नेत्रशल्यचिकित्सक डॉ. आशिष बेदरकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अश्विन पराती, नेत्रदान समुपदेशक रमेश ठाकरे व ऋतिक भूते यांनी मरणोत्तर नेत्रबुबुळे काढण्याची प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर नेत्रबुबुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथे पाठविण्यात आली.

या नेत्रदानासाठी विजय जाधव, दीपक भडंगे, गणेश राठोड, निलेश घुगे, मुकेश ठाकूर (बजरंग दल), योगेश लोनसुणे, सचिन शर्मा, डॉ. योगेश नानोटे, कैलास ठाकरे, सुरेश मिसाळ, विठ्ठल मोरे, शिवम ठाकूर, प्रवीण ढोके व उकंडी डाखारे यांनी विशेष प्रयत्न केले. मृत्यूनंतर नेत्रदान करून गरजू व्यक्तीच्या जीवनात प्रकाश आणता येतो. त्यामुळे सर्व समाजातील नागरिकांनी नेत्रदान चळवळीत सक्रिय सहभाग घेऊन ती लोकचळवळ बनवावी.

राष्ट्रीय क्रीडा दिनी रुषभ ढवळेचा विशेष सत्कार राष्ट्रीय रायफल शूटिंगमध्ये वाशीमचे नाव उंचावले

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राष्ट्रीय स्तरावर रायफल शूटिंगमध्ये उल्लेखनीय कामगिरी करून वाशीम जिल्ह्याचे नाव उंचावणारा युवा राष्ट्रीय रायफल शूटर रुषभ अजय ढवळे याचा राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. दि. २९ ऑगस्ट रोजी आयोजित कार्यक्रमात जिल्हा क्रीडा अधिकारी सतीश चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत रुषभचा राष्ट्रीय खेळाडू म्हणून गौरव करण्यात आला. हा सत्कार सचिन चव्हाण व डॉ. प्रा. शुभांगी दामले-अहीर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी राज्य क्रीडा मार्गदर्शक किशोर बोंडे, तालुका क्रीडा अधिकारी मारोती सोनकांबळे, विकास खंडारे, सेवानिवृत्त पीएसआय व क्रीडापटू दिलीप पवार, अक्षय टेंभुर्णीकर, शेख अब्दुल, सुशांत कळढोने, प्रकाश मोरे, रंजीत कथडे, राजदीप मानवर, अनिल थडकर, कलम मिर्झा आदी उपस्थित होते.

रिमझिम पावसाच्या सरीत मुशायऱ्यातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश

मंगरूळपीरच्या बिलालनगरात ईद मिलन कार्यक्रम; हिंदू - मुस्लिम बांधवांना मिठाईचे वाटप

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

मंगरूळपीर शहरातील बिलालनगर येथे ईद मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. रिमझिम पावसाच्या सरीत रंगलेल्या मुशायऱ्यातून हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाला हिंदू-मुस्लिम बांधवांची मोठी उपस्थिती लाभली.

यावेळी मंगरूळपीरचे नगराध्यक्ष अशोक परळीकर, चंदू परळीकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे वाशिम जिल्हाध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. अशोक परळीकर आणि चंद्रकांत ठाकरे यांनी अशा सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची समाजाला गरज असून,

त्यातून हिंदू-मुस्लिम बांधवांमध्ये आपुलकी वाढण्यासोबतच राष्ट्रीय एकात्मतेला बळ मिळते, असे प्रतिपादन केले. मुशायऱ्यात अकबर ताज खंडवा, मुस्तकीम अर्शद पुणे, साबीर बसमती, फुरखान नजर, खालीद अन्सारी बऱ्हाणपूर, इकबाल निजामी, इस्माईल अता अकोला, अब्दुल समद, जकी खालेक, सहर शकील अहमद, शकील मेहताब आलम खान, मेहताब आदी कवींनी आपल्या कविता व शायरीच्या माध्यमातून सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध कवी अकील अहमद 'आकिल' यांनी केले, तर आभार प्रदर्शन मीर आशिक अली यांनी केले. उपस्थित मुस्लिम बांधवांना मिठाईचे वाटप करून एकतेचा गोडवा निर्माण करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते मीर आशिक अली यांच्या पुढाकारातून झालेल्या या उपक्रमाचे शहरातून कौतुक होत आहे. कार्यक्रमाला अब्दुल्ला पटेल, जमील कुरेशी, अफसर अन्सारी, जमील खान, शब्बीर खान, अझहर मिर्झी, शफी खान मनियार, आर. के. राठोड, अकबर पटेल, ॲड. जुनेद खान, जकी काजी, काशिफभाई, पिंटूभाई, वहीद शेख तसेच पत्रकार अशोक राऊत, संतोष चव्हाण, राजेश वानखडे, संदीप कांबळे, गझनफर हुसेन, नाना देवळे, अव्हाडे, काशिफ अली, मोहसिन खान आदींची उपस्थिती होती.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येणार..?

जळगावात शरद पवारांच्या उपस्थितीत मोठी राजकीय घडामोड!

जळगाव : राष्ट्रवादी काँग्रेसमधील शरद पवार आणि अजित पवार या दोन्ही गटांच्या संभाव्य एकत्रीकरणाच्या चर्चेला जळगाव जिल्ह्यात रविवारी नवी दिशा मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा आमदार एकनाथ खडसे यांच्या कोथळी (ता. मुक्ताईनगर) येथील अमृत महोत्सवी सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचे रविवारी सकाळी जळगाव विमानतळावर आगमन झाले. यावेळी त्यांच्या स्वागतासाठी शरद पवार गटासोबतच अजित पवार गटाचे पदाधिकारी आणि कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामुळे दोन्ही गटांच्या संभाव्य एकत्रीकरणाच्या चर्चेला पुन्हा एकदा उधाण आले आहे.

शरद पवार यांच्या स्वागतासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे पदाधिकारी एकाच ठिकाणी उपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात या घडामोडीची विशेष चर्चा रंगली. पक्षात फूट पडून दोन्ही गट वेगवेगळ्या राजकीय आघाड्यांमध्ये असले तरी स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांमधील संबंध कायम असल्याचे या निमित्ताने दिसून आले. विशेष म्हणजे, यापूर्वी अजित पवार जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असतानाही दोन्ही गटांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले होते. त्यामुळे जळगावमध्ये राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांमध्ये असलेले वैचारिक आणि राजकीय संबंध पुन्हा चर्चेत आले आहेत.

'दोन्ही गटांची विचारधारा एकच'

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे जळगाव जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील यांनी या घडामोडीवर पत्रकारांशी बोलताना महत्त्वपूर्ण भाष्य केले. दोन्ही पक्ष वेगळे झाले असले तरी आजही त्यांची मूळ विचारधारा एकच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्या तर त्याचे स्वागतच आहे. दोन्ही गटांची विचारधारा बहुजन हिताची आहे. सध्या ते यूपीएसोबत तर आम्ही एनडीएसोबत आहोत. त्यामुळे राजकीयदृष्ट्या दोन्ही गट वेगळ्या मार्गावर असले तरी वैचारिक पातळीवर आमच्यात साम्य आहे, असे प्रमोद पाटील यांनी सांगितले. पाटील यांच्या या वक्तव्यामुळे भविष्यात राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या संभाव्य एकत्रीकरणाबाबत स्थानिक पातळीवरही हालचाली होऊ शकतात का, याबाबत राजकीय चर्चांना सुरुवात झाली आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे जळगाव जिल्हाध्यक्ष संजय पवार यांनी शरद पवार यांच्या स्वागतामागील भावना स्पष्ट करताना पक्षांतर्गत भावनिक नाते अधोरेखित केले. शरद पवार आमच्यासारख्या अनेक कार्यकर्त्यांचे विठ्ठल आहेत. त्यामुळे ते जळगाव जिल्ह्यात येत असताना त्यांचे स्वागत करणे हे आमचे कर्तव्य आहे, असे संजय पवार यांनी सांगितले. त्याचबरोबर त्यांनी दोन्ही राष्ट्रवादीच्या संभाव्य एकत्रीकरणाबाबतही सूचक विधान केले. भारतात मंगळग्रह मंदिर केवळ जळगाव जिल्ह्यात असल्याचा उल्लेख करत दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणा संदर्भात भविष्यात जे काही होईल, ते जळगाव जिल्ह्यातूनच होईल, असे त्यांनी नमूद केले.

'समृद्धी'वर मध्यरात्री पुन्हा लुटीची मालिका

सिन्नर: समृद्धी महामार्गावर गुरुवारी मध्यरात्री सिन्नर तालुक्यात लुटमारीच्या घटनांची मालिका घडल्याचे समोर आले आहे. नांदेडचे कार व्यावसायिक मोहम्मद फरान आणि छत्रपती संभाजीनगरचे ॲड. श्रीकांत मिश्रा यांच्यानंतर गंभीर रुग्णाला मुंबईला उपचारासाठी घेऊन जाणाऱ्या हिंगोलीतील प्रवाशांची कारही दरोडेखोरांनी अडवली. रस्त्यावर टणक वस्तू फेकून कार थांबविल्यानंतर चालकासह दोघांना मारहाण करून रोख रकमेसह सोन्याची अंगठी असा सुमारे एक लाख रुपयांचा ऐवज लुटण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. रुग्णाची प्रकृती लक्षात घेऊन प्रवाशांनी प्रथम त्याला मुंबईला नेले. उपचाराची व्यवस्था केल्यानंतर शनिवारी वावी पोलिस ठाण्यात येऊन फिर्याद दिली.

लिव्ह इन पार्टनरने अपहरण करुन झाडाला बांधलं अन्....

मुंबई - सोशल मीडिया जगतातून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर मनजीत कौरहिचा २६ ऑगस्ट रोजी निधन झाले आहे. चंदीगडच्या पीजीआयमध्ये तिचा उपचारादरम्यान, मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली आहे. वयाच्या २८ व्या वर्षी तिने अखेरचा श्वास घेतला. मिळालेल्या माहितीनुसार, मनजीतचे चंडीगढयेथून अपहरण करण्यात आले होते. यानंतर आरोपींनी मनजीतला मोरिंडा येथे घेऊन गेले. तसेच तिला एका झाडाला बांधण्यात आले. यासह झाडासोबत तिला पेटवण्यात आले. याघटनेची माहिती मिळताच तिला उपचारासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले. दरम्यान, ५४ दिवस आयुष्यासाठी लढा दिल्यानंतर तिने अखेर श्वास सोडला. आई कांता देवी यांनी तातडीने पोलीस ठाण्यात धाव घेतली. तक्रारीच्या आधारे चंडीगढ पोलिसांनी अपहरण आणि हत्येचा गुन्हा दाखल केला आणि तपासाला सुरुवात केली.

शहरात स्वाइन फ्लूच्या रुग्णांमध्ये वाढ

पुणे : शहरात 'स्वाइन फ्लू'च्या (एच१ एन१) रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे. जुलैत स्वाइन फ्लूचे ३५ रुग्ण होते, ती संख्या ऑगस्टमध्ये २२५ झाली आहे. त्यामुळे नागरिकांनी गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळून आवश्यक ती खबरदारी घेण्याचा सल्ला वैद्यकीय तज्ज्ञांनी दिला आहे. पुणे महापालिकेच्या आकडेवारीनुसार, या वर्षाच्या पहिल्या तिमाहीत केवळ दोन रुग्ण आढळून आले होते. जानेवारी आणि मार्चमध्ये रुग्णसंख्या शून्य होती.मे महिन्यापासून रुग्णसंख्या वाढू लागली. स्वाइन फ्लूमध्ये सुरुवातीला केवळ ताप, खोकला आणि घसादुखी होते. नंतर अनेक रुग्णांमध्ये या आजाराचे रूपांतर न्यूमोनियात होत असून, शरीरातील ऑक्सिजन पातळी ढासळण्याचा धोका निर्माण होत आहे. ज्येष्ठ नागरिक आणि सहव्याधी असलेल्या रुग्णांनी विशेष काळजी घेण्याचा सल्ला वैद्यकीय तज्ज्ञांनी दिला आहे.सध्या देशात सक्रिय असणारा स्वाइन फ्लू सौम्य स्वरूपाचा असल्याचे भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने नुकतेच जाहीर केले. मात्र, सहव्याधी, तसेच वृद्ध नागरिकांनी खबरदारी घेण्याची गरज आहे. त्यामुळे गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे, असे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांनी केले आहे.

शिक्षक भरतीचा दुसरा टप्पा कधी?

पुणे : राज्यातील शाळांतील शिक्षक भरती प्रक्रियेत मुलाखतीशिवाय निवड प्रकारात उमेदवारांच्या शिफारशीनंतर आता मुलाखतीसह निवड प्रकारात १० हजार ३२८ जागांसाठीही लवकरच उमेदवारांची शिफारस करण्यात येणार आहे. या प्रकारातील शिक्षक भरती सप्टेंबरअखेरपर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न असून, त्यानंतर भरतीच्या दुसऱ्या टप्प्यात किमान पाच हजार जागा उपलब्ध होण्याचा शिक्षण विभागाचा अंदाज आहे.राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी अनुदानित शाळांतील शिक्षक भरती पवित्र संकेतस्थळामार्फत राबवण्यात येत आहे. या अंतर्गत या मुलाखतीशिवाय निवड आणि मुलाखतीसह निवड या दोन प्रकारांतील पदांसाठीच्या जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. मुलाखतीशिवाय निवड या प्रकारासाठी उपलब्ध झालेल्या १९ हजार ७५४ जागांसाठी १३ हजार ११९ उमेदवारांची शिफारस करण्यात आली.

शिंदेंचा कार्यक्रम ५ मिनिटात रद्द करा, नाहीतर ....

मनोज जरांगेंचा इशारा, पण जाधवांनी घेतली ठाम भूमिका!

परभणी: अंतरवाली सराटीमध्ये मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा दुसरा दिवस असताना परभणीत आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जाहीर सभा संपन्न होणार होती. मात्र माध्यमांच्या प्रतिनिधीशी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी थेट खासदार संजय जाधव यांना इशारा दिला आहे. 'आमच्या जीवावर तुम्ही निवडून आला आहात आणि आता मराठ्यांच्या उरावर तुम्ही सभा घेणार आहात का? जर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सभा झाली तर मी तिथं येईल आणि मग धिंगाणा होईल. येणाऱ्या काळात तुम्हाला त्याचे परिणाम भोगावे लागतील,' असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी परभणीचे खासदार संजय जाधव यांना दिला आहे. 'उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही सभा घेऊ नये आणि जर घ्यायचीच वेळ आली तर आम्ही त्यांच्या सभेमध्ये घुसू, त्यांना परत मुंबईला जायचं आहे, त्यांनी विचार करावा,' असंही जरांगे यांनी म्हटलं आहे.

परभणीचे खासदार संजय जाधव यांनी काही दिवसांपूर्वी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची साथ सोडत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेमध्ये प्रवेश केला आहे.

आश्रमशाळांतील मृत्यू रोखण्यासाठी 'ॲक्शन प्लॅन'

मुंबई: आदिवासी विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनामुळे खडबडून जागे झालेल्या राज्य सरकारने शनिवारी शासकीय आणि अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमध्ये आजपर्यंत झालेल्या विद्यार्थ्यांच्या मृत्यूंच्या कारणांचा अभ्यास करून तीन महिन्यांत कालबद्ध कृती आराखडा तयार करण्याचा निर्णय घेतला. तसेच आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांमध्ये आता जेवणासाठी 'मेस'ची व्यवस्था केली जाणार आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांनी विविध मागण्यांसाठी पुण्यात आंदोलन सुरू केले होते. ते आता स्थगित केले आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या 'छात्रों की गूंज' या कार्यक्रमातही याचे पडसाद उमटले होते. अमरावतीमधील आदिवासी विद्यार्थ्यांनी तर लॉंग मार्च काढत आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्या यवतमाळमधील घराकडे कूच केले होते. या पार्श्वभूमीवर सकाळी देवेंद्र मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी प्रतिनिधींची बैठक झाली. त्यानंतर संध्याकाळी वरील दोन आदेश जारी करण्यात आले.

वसतिगृहांतील आबाळ संपणार, 'मेस' सुरू होणार

आदिवासी शासकीय वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना भोजनासाठी दिली जाणारी डीबीटीची रक्कम बंद करून आता वसतिगृहांत 'मेस' सुविधा सुरू केली जाणार आहे. राज्यात अशी ४९० शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. शहरांतील वसतिगृहांमध्येही भोजनाचा ठेका देऊन मेस चालविण्यात येईल.

गडचिरोली जिल्ह्यातील आश्रमशाळेत सर्पदंशामुळे तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्यानंतर आदिवासी विद्यार्थी उपोषणाला बसले आहेत. या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला आंदोलक विद्यार्थ्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घेण्याचे निर्देश दिले. आणखी कोणाचा जीव जाऊ नये, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

गणेशोत्सवात कोकणचे बसभाडे चार ते पाच हजार रुपये

मुंबई : गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या मुंबई परिसरातील नोकरदारांची धावपळ सुरू झाली आहे. रेल्वेच्या विशेष गाड्यांचे आरक्षण संपल्याने आता एसटी आणि खासगी बसशिवाय पर्याय नाही. मात्र खासगी बसच्या प्रवासासाठी प्रत्येकी ४ ते ५ हजार रुपये मोजावे लागणार आहेत.

दरवर्षी कोकणात गणपतीसाठी मुंबई महानगर क्षेत्रातून सुमारे १२ ते १३ लाख जण जातात. सुमारे तीन ते साडेतीन हजार खासगी बसेस धावतात. प्रवाशांची गर्दी लक्षात घेता बसच्या तिकिटात भरमसाट वाढ करण्यात आली आहे. हंगामात एसटी तिकिटाच्या दीडपट दरवाढ करण्याची खासगी ट्रॅव्हल्स बसला मंजुरी आहे. मात्र प्रत्यक्षात तिकीट दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. एरवी एक हजारांचे असणारे तिकीट आता ४ ते ५ हजारांच्या घरात पोहोचले आहे.

नोकरदारांच्या सोयीसाठी विशेष गाड्या चालविण्यात येतात. यंदा मुंबईहून सुटणाऱ्या विशेष रेल्वे गाड्यांमध्ये १ लाख १३ हजार ४२८ प्रवाशांनी तिकीट आरक्षित केले असून यातून रेल्वेला ७.७७ कोटी रुपये महसूल मिळाला. मध्य रेल्वे २७ ऑगस्ट ते २६ सप्टेंबरदरम्यान २०० विशेष आरक्षित आणि ६२ अनारक्षित फेऱ्या चालवणार आहे. आतापर्यंत आरक्षित रेल्वेमधून १ लाख १० हजार ५२३ प्रवाशांनी नोंदणी केली असून ६.२३ कोटी रुपये महसूल मिळाला आहे. दरम्यान, पश्चिम रेल्वे ७ सप्टेंबर ते २६ सप्टेंबरदरम्यान ५४ आरक्षित विशेष फेऱ्या चालवणार आहे. आतापर्यंत २,९०५ प्रवाशांनी तिकिटे आरक्षित केली आहेत.

यंदा एसटी महामंडळाने ५२०० गणपती स्पेशल गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत ६१२ एसटीचे आरक्षण फुल्ल झाले आहे.

राज्यातील आणखी एक परीक्षा रद्द!

गोंधळाच्या तक्रारींनंतर उच्च न्यायालयाचा निर्णय

नवी दिल्ली - उच्च न्यायालया च्या या निर्णयामुळे राज्यातील हजारो उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे. भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणि उच्च दर्जाचे निकष कायम ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. मुंबई उच्च न्यायालयाने राज्यातील लिपीक भरती प्रक्रियेतील टायपिंग परीक्षेसंदर्भात एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. परीक्षा केंद्रांवर झालेला तांत्रिक गोंधळ आणि उमेदवारांच्या आंदोलनानंतर १६ ऑगस्ट रोजी झालेली टायपिंग परीक्षा पूर्णपणे रद्द करण्यात आली असून, ही परीक्षा आता नव्याने घेतली जाणार आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या आस्थापनेवरील १,३६२ लिपीक पदांच्या भरतीसाठी ही प्रक्रिया राबवली जात आहे. यामध्ये मुंबई मुख्य पीठासाठी ८३०, नागपूर खंडपीठासाठी १६६ आणि छत्रपती संभाजीनगर खंडपीठासाठी ३६६ पदांचा समावेश आहे. सुमारे १३ हजार उमेदवार या परीक्षेसाठी पात्र ठरले होते.

१६ ऑगस्ट रोजी घेतलेल्या टायपिंग परीक्षेदरम्यान राज्यातील अनेक केंद्रांवर प्रचंड तांत्रिक सावळागोंधळ पाहायला मिळाला. सर्व्हर डाऊन होणे, हार्डवेअरमधील बिघाड, सॉफ्टवेअरची संथ गती, परीक्षा सुरू असतानाच सिस्टीम अचानक लॉगआऊट होणे आणि वेगवेगळ्या वेळी परीक्षा सुरू होणे, अशा गंभीर समस्यांना उमेदवारांना सामोरे जावे लागले.

या तांत्रिक अडचणींमुळे टायपिंगच्या वेगावर आणि कामगिरीवर थेट परिणाम झाला. टायपिंग परीक्षेत किमान १० गुण मिळवणे अनिवार्य असून, त्यात अपयशी ठरल्यास उमेदवारांना प्रक्रियेतून थेट बाहेर पडावे लागते. यामुळे उमेदवारांचे भवितव्य धोक्यात आले होते.

संतापलेल्या उमेदवारांनी परीक्षा केंद्रांबाहेर ठिय्या आंदोलन करत परीक्षा रद्द करून ती पुन्हा घेण्याची जोरदार मागणी केली होती. राजकीय नेते आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही या मागणीला पाठिंबा दिला होता.

सुरुवातीला या तांत्रिक त्रुटींची तपासणी केली जाईल असे प्रशासनाने म्हटले होते. मात्र, उमेदवारांचा रोष आणि निष्पक्षतेचा विचार करता, अखेर उच्च न्यायालयाच्या कुलसचिवांनी अधिकृत अधिसूचना काढून १६ ऑगस्टची परीक्षा रद्द केल्याचे जाहीर केले.

नवी टायपिंग परीक्षा कधी आणि कुठे होणार, याबाबतची सविस्तर माहिती आणि वेळापत्रक लवकरच मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाईल. त्यामुळे उमेदवारांनी अधिकृत अपडेट्ससाठी उच्च न्यायालयाच्या वेबसाईटवर लक्ष ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

समृद्धी महामार्गाने प्रवास करणाऱ्यांसाठी महत्त्वाची बातमी!

मुंबई : हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर प्रवास करण्यासाठी एक महत्त्वाची माहिती प्रशासनाकडून जारी करण्यात आली आहे. समृद्धी महामार्गावर आयटीएमएस अंतर्गत सीसीटीव्हीकरीता गॅन्ट्री बसविण्यासाठी ३१ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर पर्यंत सिन्नर इंटरचेंज ते इगतपुरी इंटरचेंज दरम्यान टप्याटप्याने वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार आहे.

महामार्ग पोलिसांकडूत प्राप्त परवानगीनुसार ३१ ऑगस्ट, १ सप्टेंबर आणि २ सप्टेंबर रोजी सिन्नर इंटरचेंज ते भरवीर इंटरचेंज दरम्यान दुपारी १२ ते १ वाजेपर्यंत मुंबई दिशेने आणि दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत नागपूर दिशेने वाहतूक बंद राहील. तसेच ४, ५ आणि ७ सप्टेंबर रोजी भरवीर इंटरचेंज ते इगतपुरी इंटरचेंज दरम्यान दुपारी १२ ते १ वाजेपर्यंत मुंबई दिशेने आणि दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत नागपूर दिशेने वाहतूक बंद राहील.

पहिला टप्पा - सिन्नर ते भरवीर

३१ ऑगस्ट, १ सप्टेंबर आणि २ सप्टेंबर अशा तीन दिवस सिन्नर इंटरचेंज ते भरवीर इंटरचेंज दरम्यान हे काम होणार आहे.

या दिवशी दुपारी १२ ते १ वाजेपर्यंत मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक बंद राहील, तर दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत नागपूरच्या दिशेने जाणारी वाहतूक बंद ठेवण्यात येईल.

दुसरा टप्पा - भरवीर ते इगतपुरी

४, ५ आणि ७ सप्टेंबर रोजी भरवीर इंटरचेंज ते इगतपुरी इंटरचेंज या घाट विभागात गॅन्ट्री बसवण्याचे काम होईल.

३१ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यान टप्याटप्याने वाहतूक ब्लॉक

याही दिवशी वेळ तीच असणार आहे. दुपारी १२ ते १ या वेळेत मुंबईकडे जाणारी तर दुपारी ३ ते ४ या वेळेत नागपूरकडे जाणारी वाहतूक थांबवली जाईल. ६ सप्टेंबर रोजी कोणताही ब्लॉक असणार नाही.

समृद्धी महामार्गावर अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी ध्कश्ए म्हणजेच घtelligent Traffic Management System बसवले जात आहे.

यामध्ये अत्याधुनिक सीसीटीव्ही, वेग मोजणारे कॅमेरे, आणि स्वयंचलित चलन प्रणालीचा समावेश आहे. गॅन्ट्री ही या कॅमेऱ्यांना आधार देणारी मोठी लोखंडी संरचना असते, जी महामार्गाच्या एका बाजूने दुसऱ्या बाजूपर्यंत असते.

या कामादरम्यान क्रेन आणि मोठ्या यंत्रसामुग्रीचा वापर होणार असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव वाहतूक बंद ठेवणे आवश्यक आहे.

शातीर चोरट्याने खड्डा खोदून गाड्या लपवल्या; हर्सूल पोलिसांकडून 'पंडा' गजाआडया पार्श्वभूमीवर समृद्धी महामार्गावरून प्रवास करणाऱ्या सर्व प्रवाशांनी वरील वेळेचा विचार करून आपल्या प्रवासाचे नियोजन करावे. ब्लॉकच्या वेळेत अडकू नये म्हणून प्रवाशांनी एक तास आधी किंवा नंतर प्रवास सुरू करावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

समृद्धी महामार्गावरील सर्व प्रवाशांना आवाहन करण्यात आले आहे की, वरील कालावधीत प्रवासाचे पुरेसे नियोजन करुन प्रवास करावा असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

पिंपरी-चिंचवड! 'डक्ट' अपघातातील मृतांचे तीन मित्र बेपत्ता

पिंपरी : निगडी प्राधिकरणातील भारत संचार निगम लिमिटेडच्या (बीएसएनएल) फायबर ऑप्टिक 'डक्ट'मध्ये गुदमरून मृत्यू झालेल्या दोघांबरोबर असलेले त्यांचे तीन मित्र बेपत्ता असून, त्यांचे मोबाइलही बंद आहेत. पथकांकडून त्यांचा शोध घेण्यात येत आहे. त्यांच्याकडे चौकशी केल्यानंतर नेमका काय प्रकार घडला, हे स्पष्ट होईल. मृत्यूप्रकरणी जबाबदारी निश्चित होत नसल्याने गुन्हा दाखल केला नसल्याचे पोलिसांनी सांगितले. मनोज बाबूराव शिंदे (वय २६) आणि अमोल अशोक शिंदे (वय २०, मूळ – सिद्धेश्वर, ता. औंढा, जि. हिंगोली) अशी मृत्युमुखी पडलेल्या मजुरांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मनोज त्याच्या भावाबरोबर नाशिक येथे केबल दुरुस्तीचे काम करत होता. तो बुधवारी सकाळी नाशिक येथून मित्र अमोलकडे आला होता. त्यांना या डक्टमध्ये उतरण्यास कोणी सांगितले, हे अद्याप स्पष्ट झाले नाही. बीएसएनएल अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, कंपनीच्या वायफाय व टेलिफोन केबलचे जाळे शहरभर आहे. त्यासाठी ठरावीक अंतरावर आठ बाय दहा फूट अंतराचे डक्ट तयार करण्यात आले आहेत. नवीन जोडणी टाकणे, जुनी जोडणी बंद करणे, तांत्रिक अडथळा सोडविणे अशी कामे या 'डक्ट'मधून केली जातात.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २७४ ■ सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

झोपडपट्टीधारकांना पट्टे देऊन थांबणार नाही, मूलभूत सुविधाही देणार - मुख्यमंत्री

'फूटप्रिंट्स ऑफ डिग्निटी' पुस्तकाचे प्रकाशन

नागपूर जनमाध्यम : झोपडपट्टीतील रहिवाशांना मोठ्या प्रमाणात मालकी हक्काचे पट्टे देणारे नागपूर हे देशातील एकमेव शहर आहे. मात्र, केवळ मालकी हक्काचे पट्टे देऊन शासन थांबणार नाही, तर झोपडपट्टी वसाहतींमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देत तेथील रहिवाशांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नागपूर शहरातील झोपडपट्टीधारकांना मालकी हक्काचे पट्टे मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेले प्रयत्न आणि शासनाने घेतलेल्या निर्णयांवर आधारित सीएफएसडीच्या लीना बुद्धे यांनी लिहिलेल्या 'फूटप्रिंट्स ऑफ डिग्निटी : बिल्डिंग टेन्युअर राइट्स इन अर्बन स्लम्स ऑफ इंडिया' या पुस्तकाचे प्रकाशन रविवारी सकाळी 'रामगिरी' येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

झोपडपट्टीधारकांना मालकी हक्क मिळणे अत्यंत आवश्यक होते. पट्टे मिळाल्याने त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल झाला असून, त्यांच्या सर्वसमावेशक विकासासाठी शासन प्रयत्नशील आहे. झोपडपट्टी विकासासाठी हे पुस्तक दिशादर्शक ठरेल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

मी नागपूरचा महापौर असतानाच या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आले होते. आमदार म्हणूनही हा विषय लावून धरला. मुख्यमंत्री झाल्यानंतर मालकी पट्टे देण्याचा निर्णय घेतला. खासगी जागांवरील झोपडपट्ट्यांच्या नियमितीकरणासाठीही शासनाने निर्णय घेतला. या संपूर्ण प्रक्रियेचे दस्तावेजीकरण या पुस्तकातून झाले आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

लेखिका लीना बुद्धे यांनी नागपूरमध्ये १२ ते १५ हजार मालकीपट्ट्यांचे वाटप झाल्याचे सांगत, या संपूर्ण प्रक्रियेचे श्रेय मुख्यमंत्री फडणवीस यांना दिले. यावेळी मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर, डॉ. सुहास बुद्धे तसेच सीएफएसडीतील सहकारी व आप्त उपस्थित होते.

वाघ शेतात, शेतकरी घरात; आष्टी तालुक्यात उलटीच व्यवस्था

गावाच्या उंबरठ्यावर चार वाघ, थार-बोरखेडी-चामला-बांबरडा परिसरात दहशत

आष्टी शहीद जनमाध्यम : वाघ जंगलात आणि शेतकरी शेतात, ही निसर्गाची व्यवस्था. मात्र आष्टी तालुक्यात या व्यवस्थेलाच आता तडा गेला आहे. जंगलातील वाघ शेताच्या बांधावर आले असून शेतकरी जीव मुठीत घेऊन घरात बसण्याची वेळ आली आहे. थार, बोरखेडी, चामला आणि बांबरडा परिसरात गेल्या काही दिवसांपासून वाघांचा वाढता वावर नागरिकांच्या काळजाचा ठोका चुकवत आहे. रविवार, ३० ऑगस्ट रोजी चामला-बांबरडा मार्गावर एकाच वेळी चार वाघ दिसल्याचा दावा नागरिकांनी केल्याने गावाच्या उंबरठ्यावरच दहशतीचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

या परिसरातील शेतकरी, शेतमजूर आणि गवळी समाजाच्या उदरनिर्वाहाचा प्रमुख आधार शेती आणि दुग्ध व्यवसाय आहे. मात्र वाघांच्या भीतीने शेतात जाणे धोक्याचे झाले आहे. शेतमजूरही कामावर येण्यास धजावत नसल्याने शेतीची कामे खोळंबण्याची शक्यता आहे. गायी-म्हशी चरायला नेणेही जीवघेणे ठरत आहे. शेतात जायचे नाही, जनावरे चरायला न्यायची नाहीत आणि दूध व्यवसायही धोक्यात; मग शेतकऱ्याने जगायचे कसे आमचा मुख्य व्यवसाय शेती आणि दूध आहे. शेतात जाता येत नसेल आणि जनावरे सुरक्षित नसतील तर आम्ही जगायचे कसे असा प्रश्न सरपंच लता कडताई यांनी उपस्थित केला.

माणूस मेल्यावर २५ लाख; आधी जीव वाचवा

वाघाच्या हल्ल्यात मनुष्यहानी झाल्यानंतर शासनाकडून नुकसानभरपाई दिली जाते. मात्र माणूस गेल्यानंतर मिळणारे लाखो रुपये त्याचा जीव परत आणू शकतात का असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. काय एका जीवाची किंमत २५ लाख रुपये झाली आहे का आधी जीव वाचवा, नंतर नुकसानभरपाई द्या, असा आक्रोश परिसरातून व्यक्त होत आहे.

आमदार साहेब, शेतकऱ्याचा बळी गेल्यावर जागे होणार का

गावालगत वाघांचा वावर असल्याची भीती असताना प्रशासन आणखी कोणत्या दुर्घटनेची वाट पाहत आहे, असा सवाल आता उपस्थित होत आहे. शेतकऱ्याचा जीव गेल्यानंतर पंचनामा करण्यापेक्षा त्याआधीच सुरक्षा देण्याची जबाबदारी कोणाची? आमदार साहेब, या भयभीत शेतकऱ्यांकडे लक्ष कधी देणार, असा सवाल नागरिक विचारत आहेत.

वनविभागाने परिसरात विशेष पथके तैनात करून २४ तास गस्त वाढवावी. कॅमेरा ट्रॅप, ड्रोनद्वारे निगराणी, वाघांच्या हालचालींचे ट्रॅकिंग आणि आवश्यक त्या ठिकाणी पिंजरे लावण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी आहे.

गवळी समाजाच्या दुधाच्या धंद्यावरही संकट

गवळी समाजाचा मुख्य व्यवसाय दुग्ध व पशुपालन आहे. वाघ आता गावाच्या शिवेवर दिसत असल्याने समाजबांधव भयभीत झाले आहेत. घरातील कर्त्या व्यक्तीचा वाघाच्या हल्ल्यात जीव गेल्यावर संपूर्ण कुटुंब उघड्यावर येईल. त्यामुळे वनविभागाने तातडीने वाघाचा बंदोबस्त करावा, अशी मागणी भाग्यश्री चेले, जिल्हा उपाध्यक्ष, गवळी समाज संघटना यांनी केली. चार वाघ गावाच्या उंबरठ्यावर येत असल्याचा दावा होत असताना प्रशासन आणखी किती मोठ्या संकटाची वाट पाहणार? जंगलात वाघांचा मुक्त संचार आणि शेतकऱ्यांचा घरात बंदिवास अशी परिस्थिती निर्माण होणे हीच प्रशासनासाठी धोक्याची घंटा आहे.

स्कूल बसला रापमची जोरदार धडक, तीन विद्यार्थी, दोन महिला अटेंडंट जखमी

नालवाडीतील अपघाताने वाहतूक सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

वर्धा जनमाध्यम : रस्त्याच्या कडेला विद्यार्थ्यांना घेण्यासाठी उभी असलेल्या स्कूल बसला नागपूरहून वर्ध्याकडे धावणाऱ्या रापमच्या बसने मागून जोरदार धडक दिल्याची धक्कादायक घटना वर्धा-नागपूर मार्गावरील नालवाडी परिसरात घडली. या अपघातात तीन विद्यार्थी आणि दोन महिला अटेंडंट असे पाच जण जखमी झाले. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली.

देवळी येथील रहिवासी राहुल अशोक समर्थ हे नागठाणा येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कूलच्या स्कूल बसचे चालक आहेत. नेहमीप्रमाणे ते विद्यार्थ्यांना घेण्यासाठी नालवाडी येथे आले होते. ऑटो स्टँडजवळ त्यांनी स्कूल बस रस्त्याच्या कडेला उभी केली होती. बसमध्ये लेडी अटेंडंट स्वाती घोडखांदे, मिनाक्षी देशमुख तसेच विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, नागपूरकडून वर्ध्याकडे येणाऱ्या रापमच्या बसने स्कूल बसला मागून धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की बसमधील विद्यार्थ्यांमध्ये एकच गोंधळ उडाला. या घटनेत अंशूल सुरेंद्र आवळे, अंश सुरेंद्र आवळे, भाव्या कपिल शर्मा तसेच लेडी अटेंडंट स्वाती घोडखांदे आणि मिनाक्षी देशमुख जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती शाळा प्रशासनालाही देण्यात आली. पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून परिस्थितीची पाहणी करण्यात आली. जखमींची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, स्कूल बस चालक राहुल समर्थ यांच्या तक्रारीवरून शहर पोलिसांनी रापम बस चालक निलेश बोंदरे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या स्कूल बसच्या सुरक्षेचा प्रश्न या घटनेमुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे.

रानडुकराचा शेतकऱ्यावर हल्ला, आष्टीत वन्यप्राण्यांची दहशत आणखी वाढली

वाघ, बिबट्या, अस्वलानंतर आता रानडुकराचेही संकट

आष्टी शहीद जनमाध्यम : आष्टी तालुक्यात वन्यप्राण्यांची दहशत दिवसेंदिवस वाढत असतानाच आता रानडुकराने थेट शेतकऱ्यावर हल्ला केल्याने ग्रामीण भागात खळबळ उडाली आहे. वाघ, बिबट्या आणि अस्वलाच्या वावराने आधीच भयभीत झालेल्या शेतकऱ्यांच्या चिंतेत रानडुकराच्या हल्ल्याने आणखी भर पडली आहे. वन्यप्राणी जंगलात की शेतकरी घरात, अशी परिस्थिती निर्माण होण्याची वेळ आली आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकरी व्यक्त करीत आहेत.

आष्टी, कारंजा व आर्वी तालुक्यांच्या सीमेवर असलेल्या बोर व्याघ्र प्रकल्पामुळे वन्यप्राण्यांचा वावर लगतच्या गावांच्या शेतशिवारात वाढत आहे. त्यातच आबादकिन्ही येथे ३० ऑगस्ट रोजी शेतकरी गणेश बहिरट यांच्यावर रानडुकराने अचानक हल्ला केल्याने वन्यप्राण्यांचा प्रश्न किती गंभीर बनला आहे, हे पुन्हा अधोरेखित झाले.

गणेश बहिरट हे दोन मजुरांसोबत शेताकडे जात असताना झुडपात दबा धरून बसलेल्या रानडुकराने अचानक त्यांच्यावर झडप घातली. काही कळण्याच्या आत रानडुकराने त्यांना जखमी केले. हल्ल्यामुळे परिसरात काही क्षण अक्षरश थरार निर्माण झाला.

गणेश बहिरट यांच्यावर रानडुकराचा हल्ला सुरू असल्याचे लक्षात येताच सोबत असलेल्या दोन्ही मजुरांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता धाडसाने रानडुकराला पिटाळून लावण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे बहिरट यांची तावडीतून सुटका झाली.

जखमी अवस्थेतील गणेश बहिरट यांना दोन्ही मजुरांनी तत्काळ पोलीस पाटील लता झामडे यांच्या घरी नेले. त्यांचे पती ज्ञानेश्वर झामडे यांनी क्षणाचाही विलंब न करता कारमधून त्यांना आष्टी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तेथे त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे बिट गार्ड बुरे यांनी गस्ती पथकासह घटनास्थळी धाव घेत पाहणी केली.

वाघानंतर रानडुकराचीही दहशत

आष्टी तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून वाघांचे दर्शन सातत्याने होत आहे. अनेक ठिकाणी बिबट्या आणि अस्वलाचा वावरही नागरिकांच्या निदर्शनास येत आहे. आता रानडुकराने थेट शेतकऱ्यावर हल्ला केल्याने शेतकरी आणि शेतमजुरांच्या जीवित सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

शेतातील झुडपे, नाले, बांध आणि दाट गवतामध्ये दबा धरून बसलेल्या वन्यप्राण्यांमुळे शेतकऱ्यांना प्रत्येक पाऊल सावधपणे टाकावे लागत आहे.

शेतात जायचे तरी कसे

शेतीचा हंगाम असल्याने शेतकऱ्यांना घरात बसून चालणार नाही. पिकांची निगा राखण्यासाठी रोज शेतात जावेच लागते. मात्र एका बाजूला वाघ, दुसरीकडे बिबट्या-अस्वल आणि आता रानडुकराचा हल्ला मग शेतकऱ्यांनी शेती करायची तरी कशी असा प्रश्न उपस्थित होत आहे.

वनविभागाने घटना घडल्यानंतर केवळ पाहणी करून थांबू नये. वन्यप्राण्यांच्या हालचालींचे नियमित सर्वेक्षण, संवेदनशील भागात वाढीव गस्त, कॅमेरा ट्रॅप आणि शेतकऱ्यांना तातडीची सूचना देण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याची मागणी होत आहे.

वन्यप्राण्यांचा वाढता वावर हा आता केवळ जंगलाचा विषय राहिलेला नाही. तो शेतकऱ्यांच्या रोजीरोटीबरोबरच त्यांच्या जीवित सुरक्षेचा प्रश्न बनला आहे. आणखी एखादी दुर्घटना घडण्याची वाट वनविभाग पाहणार का, असा प्रश्न आबादकिन्ही परिसरातील शेतकरी विचारत आहेत.

देवळीत दहीहंडीला ब्रेक, आता हास्याचा बॉम्ब फुटणार

देवळी जनमाध्यम : श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या स्थापना दिनानिमित्त देवळीत यंदा दहीहंडी फोड स्पर्धेला फाटा देत हास्याचा धडाका उडणार आहे. रविवार, ६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता विदर्भ केसरी माजी खासदार रामदास तडस इंडोअर स्टेडियममध्ये 'चला हवा येऊ द्या' या हास्य-सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

गेल्या १३ वर्षांपासून दहीहंडी फोड स्पर्धेची परंपरा सुरू होती. यंदा प्रथमच प्रतिकात्मक दहीहंडी पूजन करून हास्य आणि मनोरंजनाचा नवा प्रयोग करण्यात आला आहे.

'चला हवा येऊ द्या' फेम अंकुश वाढवे, भारत गणेशपुरे, अभिनेत्री हेमांगी कवी यांच्यासह तडस व मोहन जोशी उपस्थित राहणार आहेत. महिला, विद्यार्थी, मुले-मुली आणि ज्येष्ठ नागरिकांसह पाच हजार प्रेक्षकांची व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांनी सहकुटुंब उपस्थित राहावे, असे आवाहन राहुल चोपडा, दिनेश क्षीरसागर, गोल्डी बग्गा, मोहन जोशी व वैभव झाडे यांनी केले.

रिपरिप पावसाने रस्त्यांची केली चिखलात चित्तरकथा

मांगली-परसोडी मार्ग बनले जीवघेणे

सिंदी रेल्वे जनमाध्यम : संततधार पावसाने शहरासह परिसरातील रस्त्यांची अक्षरशः वाट लागली आहे. शनिवारी सकाळी ६ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत अवघ्या १२ तासांत ३२ मि.मी. पावसाची नोंद झाली. रिपरिप पावसामुळे मांगली आणि परसोडी मार्गावर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले असून वाहनधारकांची अक्षरशः परीक्षा सुरू आहे.

नागपूर जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीत कामासाठी जाणाऱ्या नागरिकांसाठी मांगली मार्ग महत्त्वाचा आणि जवळचा आहे. मात्र, जिल्हा सीमेपर्यंत रस्त्याची अवस्था इतकी दयनीय झाली आहे की चारचाकी वाहने चालविणेही धोक्याचे ठरत आहे. मांगली-दुधा शिवारासह आसोला आणि परसोडी मार्गावरही चिखलाचे थर साचल्याने शेतकरी, कामगार आणि विद्यार्थ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

दरवर्षी पावसाळ्यात हीच परिस्थिती निर्माण होत असतानाही कायमस्वरूपी उपाययोजना का होत नाहीत, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांना चिखलातून वाट काढावी लागत आहे.

मांगली मार्गावरील काही भागात नगरसेवक जगदीश बोरकर व त्यांच्या मित्रांनी फरशी अंथरून तात्पुरता मार्ग सुकर केला. त्यांच्या या प्रयत्नाचे शेतकऱ्यांनी कौतुक केले. मात्र, तात्पुरत्या मलमपट्टीऐवजी कायमस्वरूपी रस्त्याची गरज आहे. आमदार समीर कुणावार यांनी या नेहमीच्या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन रस्त्याचा प्रश्न कायमचा निकाली काढावा, अशी मागणी नागरिकांतून जोर धरत आहे.

देवळीतील एसएमडब्ल्यू इस्पात प्रकल्पास उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत यांची भेट

वर्धा जनमाध्यम : उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत यांनी देवळी एमआयडीसीतील एसएमडब्ल्यू इस्पात प्रा. लि.(संगम) प्रकल्पास भेट देऊन प्रकल्पाची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रकल्पाची सद्यस्थिती जाणून घेत व्यवस्थापनाशी संवाद साधत प्रकल्पाच्या कामकाजासंदर्भातील अडीअडचणी जाणून घेतल्या.

वर्धा येथे आयोजित जिल्हा गुंतवणूक परिषदेत एसएमडब्ल्यू इस्पात प्रा. लि. कंपनीने ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यासाठी सामंजस्य करार केला आहे. या गुंतवणुकीमुळे देवळी परिसरातील औद्योगिक विकासाला चालना मिळण्यासोबतच स्थानिक युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

जिल्ह्यात उद्योगांना पोषक वातावरण निर्माण होत असून स्थानिक उद्योजकांकडून मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीला प्रतिसाद मिळत असल्याचे यावेळी उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत यांनी नमूद केले. एसएमडब्ल्यू इस्पात प्रा. लि. कंपनीने केलेल्या ५०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या निर्णयाचे त्यांनी कौतुक केले.

गुन्हेगारीचा माज उतरवला; तिघांवर मोक्का

चाकूचा धाक, मारहाण अन् जीवे मारण्याची धमकी

वर्धा शहर पोलिसांची कारवाई

वर्धा जनमाध्यम : शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तीला लगाम घालण्यासाठी वर्धा शहर पोलिसांनी मोठी कारवाई करत तीन आरोपींविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम अर्थात मोक्का अंतर्गत कारवाई केली आहे. सोहेल उर्फ आफताब उर्फ मोंडा अखिल खान (२६), रा. स्टेशन फैल, आयुष अजय नगराळे (२२), रा. सिद्धार्थ नगर, बोरगाव मेघे आणि शादाब खान उर्फ बैंड मुक्त्यार खान पठाण (३२), रा. बोरगाव मेघे अशी कारवाई झालेल्या आरोपींची नावे आहेत.

शहर पोलिस ठाण्यात अपराध क्रमांक १३०९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेतील कलम ७६, ३३३, ११५ (२), २९६, ३५१ (३), ३ (५) तसेच आर्म्स ॲक्टच्या कलम ४ व २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, फिर्यादीच्या मुलाचा आरोपी आयुष नगराळे याच्यासोबत वाद झाला होता. याच वादातून आयुष नगराळे, शादाब पठाण आणि सोहेल मोंडा यांनी फिर्यादीच्या घरात प्रवेश करून हल्ला केल्याचा आरोप आहे. यावेळी शादाब पठाण याने चाकूचा धाक दाखवत फिर्यादीसोबत गैरवर्तन व छेडछाड केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

फिर्यादीची मुले निरज आणि सुरज हे मध्यस्थीसाठी धावून आले असता आरोपींनी त्यांनाही चाकूचा धाक दाखवून मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. एवढ्यावरच हा प्रकार थांबला नाही. सार्वजनिक रस्त्यावर अश्लील शिवीगाळ करीत फिर्यादीच्या कुटुंबीयांना धमकावण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

या गंभीर प्रकरणाची दखल घेत पोलिसांनी आरोपींच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची माहिती संकलित करून तिघांविरुद्ध मोक्का कायद्यांतर्गत कारवाईचा प्रस्ताव तयार केला. पोलिस निरीक्षक नागेशकुमार चतरकर यांनी हा प्रस्ताव तयार करून पोलिस अधीक्षकांकडे सादर केला. त्यानंतर विशेष पोलिस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर संदीप पाटील यांनी प्रस्तावावर शिक्कामोर्तब केले. गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी उचललेल्या या कठोर पावलामुळे शहरातील गुन्हेगारी टोळ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

वर्ध्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

अवघ्या २१ वर्षे १० दिवसांत ओजस राऊत हे जिल्ह्यातील पहिले आर्बिटर आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ पंच

वर्धा जनमाध्यम : बुद्धिबळाच्या पटावर वर्धा जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. युवा बुद्धिबळपटू तथा बुद्धिबळ प्रशासनात सक्रिय असलेले ओजस राऊत यांनी आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघ अर्थात इफ्ड्रेचा 'FIDE ARiter' (FA) हा प्रतिष्ठेचा किताब मिळविला आहे. विशेष म्हणजे, अवघ्या २१ वर्षे १० दिवसांच्या वयात हा मान मिळवून त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या यशामुळे ओजस राऊत हे वर्धा जिल्ह्यातील पहिले इफ्ड्रेंगू ठरले आहेत.

FIDE ARiter हा आंतरराष्ट्रीय स्तरावरील बुद्धिबळ स्पर्धांच्या संचालन आणि निर्णयनासाठी अत्यंत महत्त्वाचा अधिकृत किताब मानला जातो. FIDE च्या नियमांनुसार स्पर्धांचे संचालन, खेळाडूंच्या सामन्यांचे निर्णयन, FIDE रेटिंग प्रणाली, स्विस पेअरिंग प्रणाली तसेच स्पर्धेतील विविध तांत्रिक बाबींची अंमलबजावणी करण्याचे ज्ञान या भूमिकेसाठी आवश्यक असते.

ओजस राऊत मागील काही वर्षांपासून बुद्धिबळ क्षेत्रात सक्रिय आहेत. खेळाडू म्हणून सहभाग नोंदवितानाच त्यांनी विविध बुद्धिबळ स्पर्धांचे आयोजन, व्यवस्थापन आणि प्रशासकीय कामकाजातही योगदान दिले आहे. या सातत्यपूर्ण सहभागातून त्यांनी स्पर्धा प्रशासनातील बारकावे आत्मसात केले. त्याच अनुभवाच्या आणि तांत्रिक ज्ञानाच्या बळावर त्यांनी FIDE ARiter होण्याचा मान संपादन केला.

अवघ्या २१ वर्षे १० दिवसांच्या वयात मिळविलेला हा आंतरराष्ट्रीय किताब त्यांच्या कमी वयातील उल्लेखनीय वाटचालीची साक्ष देणारा ठरला आहे. खेळाडू म्हणून बुद्धिबळ क्षेत्रात योगदान देतानाच आता आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांच्या संचालन आणि निर्णयनाची जबाबदारी पार पाडण्याची संधी त्यांना मिळणार आहे.

ओजस राऊत यांच्या या यशामुळे वर्धा जिल्ह्यातील बुद्धिबळपटू, प्रशिक्षक आणि युवा खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. वर्धा जिल्ह्यातून प्रथमच FIDE ARiter घडणे ही जिल्ह्याच्या बुद्धिबळ क्षेत्रासाठी अभिमानाची बाब असून, त्यांच्या या कामगिरीमुळे जिल्ह्यातील अनेक युवा बुद्धिबळपटूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर पुढे जाण्याची प्रेरणा मिळणार आहे.

ओजस राऊत यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल बुद्धिबळप्रेमी, खेळाडू, प्रशिक्षक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

अल्पदृष्टीने सलाम

राहुल गांधी यांच्यामध्ये ज्यांना महात्मा गांधी दिसू लागले आहेत, त्यांच्या लघुदृष्टीला सलाम करून राहुल यांनी सुरू केलेल्या 'छात्रों की गुंज' या कार्यक्रमाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करण्याची वेळ आता आली आहे. राजस्थानातील कोटा या 'कोचिंग क्लासची राजधानी' म्हटल्या जाणाऱ्या शहरापासून त्यांनी या कार्यक्रमाची सुरुवात केली आणि डेहरादूनमार्गे पुण्यात पोहोचले. कोट्यात त्यांनी 'कोचिंग क्लास संस्कृती आणि भारताच्या शिक्षण व्यवस्थेतील प्रश्न' हा विषय घेतला होता, तर डेहरादूनमध्ये त्यांचा विषय 'परीक्षा पद्धती आणि पेपर फुटी' असा होता. पुण्यासाठी त्यांनी खास 'महिलांचे भारतीय समाजातील स्थान' हा विषय घेतला होता. पहिल्या दोन सत्रांचे विषय हे थेट विद्यार्थी शिक्षणाशी संबंधित होते, तर तिसऱ्या सत्राचा विषय विद्यार्थिनींना भावेल या अपेक्षेने निवडण्यात आला होता. पुण्याचा कार्यक्रमच त्यांनी खास विद्यार्थिनींसाठी आयोजित केला होता. जिथे तरुण विशेषतः महाविद्यालयीन तरुण तरुणी जमतात, तिथे ऊर्जा असतेच. ही त्या वयोगटाचीच देणगी आहे. त्यामुळे, पुण्याच्या कार्यक्रमात उर्जेची काही कमी नव्हती. त्यापलीकडे त्यात काही उत्स्फुर्त, उसळते असे नव्हते. संपूर्ण कार्यक्रम पूर्वनियोजित, विचारपूर्वक आखलेला होता. तो उत्स्फूर्त वाटावा यासाठी कुठे काय पेरले होते, तेही स्पष्टपणे दिसत होते. त्यामुळे व्यासपीठावर आलेल्या विद्यार्थिनी आणि तरुणींनी केलेली वक्तव्ये, सांगितलेल्या कथा आधीच आखलेल्या (आणि रेखलेल्याही!) होत्या. त्यावरची राहुल यांची भाष्यही ठरलेली होती, हे स्पष्ट दिसत होते. 'कपिल शर्मा शो' जेवढा उत्स्फूर्त वाटतो, तेवढाही हा 'शो' उत्स्फूर्त वाटला नाही. कारण? साधे होते. 'कशशो'साठी ज्या दर्जाचे कौशल्य, सर्जनशीलता उपयोगात आणली जाते, तिची पुण्याच्या शोमध्ये वानवा होती. राहुल यांचा पेहराव, त्याचे रंग, फिटिंग- यापासून सगळ्या गोष्टी विचारपूर्वक केलेल्या होत्या. त्या लगेच जाणवाव्यात, यातच त्यातला उथळपण आणि प्राथमिक पातळीवरची कल्पकता अधोरेखित होत होती.राहुल गांधी हे राजकीय नेते आहेत. काँग्रेसचे अधिकृत अध्यक्ष कोणीही असो, नेते राहुल असतात. लोकसभेचे विरोधी पक्ष नेत्याचं पद त्यांच्याकडे आहे. काँग्रेसची सूत्रे त्यांच्याकडे येऊन आता दहा वर्षांपेक्षा थोडा अधिक काळ लोटला आहे. पण, या काळात काँग्रेसच्या संघटनात्मक ढाच्यात काही फरक पडला नाही. पूर्वीपेक्षा तो अधिक दुबळा झाला. देशात प्रत्येक मतदारसंघात काँग्रेसचा मतदार आहे. पण, काँग्रेसचे नेतृत्व आणि मतदार यांच्यातला दुवा असणारी पक्ष संघटना राहुल यांच्या काळात नामशेष झाली आहे. भारतीय जनता पक्षासारखा संघटित सत्ताधारी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यासारखे धुरंधर राजकारणी समोर असताना विरोधी बाकावरच्या कोणत्याही पक्षाला तग धरणे कठीणच आहे, हे खरे असले तरीही भाजपपेक्षा कितीतरी जुना, कित्येक दशके देशाशी सूत्र हाती असलेला पक्ष राहुल यांच्या हाती आपोआप आला आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे. त्यात धुगधुगी राखणे फार कठीण नव्हते. पण, राहूल त्यात सपशेल अपयशी ठरले आहेत. संघटनेचे महत्त्व त्यांना मान्य आहे, संघटना बांधणीसाठी ते पक्षातल्या नेत्यांना, कार्यकर्त्यांना काही किंमत देत आहेत, असेही दिसत नाही. देशव्यापी पदयात्रा त्यांची एकट्याची होती, आता 'छात्रों की गुंज' ऐकायलाही ते एकटे आहेत. फक्त राहुल यांचे प्रतिमासंवर्धन, राष्ट्रीय नेता म्हणून त्यांच्याभोवती वलय तयार करण्याचा हा प्रयत्न आहे. ज्यांनी या कार्यक्रमासाठी घाम गाळला, त्यांना प्रेक्षकांतल्या खुर्त्यांवर उभे राहून कार्यक्रम संपल्यानंतर स्वतःच अस्तित्व दाखवून देण्याची धडपड करावी लागली. इतक्या आत्मकेंद्री, एककल्ली व्यक्तीमध्ये ज्यांना महात्मा गांधींच्या उंचीचा भास होतो आहे, त्यांच्या प्रचार अंधत्वाला दंडवतच घातले पाहिजे ! लोकसभेत विरोधी पक्षनेता असूनही राहुल कधी समस्त विरोधी पक्षाचे नेते म्हणून भूमिका निभावताना दिसले? त्यांचा समन्वय फारफार तर त्यांच्या बहिणीशी दिसतो. त्यापलिकडे राहुल विरोधी पक्षाच्या सगळ्या नेत्यांना घेऊन विरोधकांची एकत्रित ताकद दाखवताना एकदाही दिसलेले नाहीत. इंडिया आघाडीतले अनेक पक्ष त्यामुळेच त्यांच्यापासून अंतर राखून असतात. अनेक पक्ष तर आपले अंतर वाढवू लागले आहेत. विद्यार्थ्यांच्या संघटित झालेल्या असंतोषाचा फायदा घेण्याचा प्रयत्न ते सर्वतोपरी करत असले, तरी या अननुभवी विद्यार्थ्यांना 'कॉक्रोच' ना ताकद देताना ते कुठे दिसत नाहीत. उलट, ज्या विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा, शिक्षण व्यवस्थेचा प्रश्न देशाच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आणला, केवळ उत्स्फुर्त, निर्भिड निदर्शनांनी देशाच्या शिक्षणमंत्र्याला राजीनामा देणं भाग पाडले, त्या सगळ्यावर पाणी फिरवण्यासाठी हे महाशय स्त्री स्वातंत्र्य आणि मनुस्मृतीचा विषय केंद्रस्थानी आणू पाहात आहेत ! स्त्री स्वातंत्र्यासाठी संघर्ष केलेल्यांनी जे मुद्दे गेल्या शतकात मांडून झाले आहेत, त्याची उजळणी राहुल यांच्यासाठी नवी असेल, समाजासाठी नाही !! पक्षाचे नांव, झेंडा, चिन्ह लपवून काँग्रेसला ताकद देण्याचा, पक्षाला पुढे घेऊन जाण्याचा हा मार्ग किती फसवा आहे, हे अगदी थोड्या दिवसांत कळेल. आज उदोउदो करणाऱ्यांचे डोळे तेव्हां उघडतील. एकीकडे देशासमोर राजकीय आव्हान उभे ठाकलेले असताना, पक्षाची ताकद वाढवण्याऐवजी केवळ स्वयंचलित वलय निर्माण करण्यात मग्न असणाऱ्या राजकारणावर यातून गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

रौद्र संकटाचा इशारा

नेपाळमधील जलप्रलयाची दुर्घटना भारतासह संपूर्ण दक्षिण आशियासाठी बदलत्या जोखमीचा गंभीर इशारा आहे. भविष्यात अशा घटनांची वारंवारता आणि तीव्रता वाढण्याची शक्यता तज्ज्ञ वर्तवत आहेत. संपूर्ण हिमालयीन पट्टा एकाच पर्यावरणीय जोखमीखाली येतो. या पार्श्वभूमीवर संयुक्त निरीक्षण यंत्रणा, सीमापार माहिती देवाणघेवाण, हिमालयीन वस्त्यांचे पुनर्नियोजन आणि प्रादेशिक सहकार्याच्या ठोस संस्थात्मक चौकटीची गरज आहे.

जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलांमुळे घडणाऱ्या अकल्पित आपत्तींनी मानवी समूहापुढे उभे केलेले आव्हान किती भयावह आहे, याची प्रचिती नेपाळमधील जलप्रलयामुळे आली आहे. हिमालयीन पर्यावरणव्यवस्थेत घडत असलेल्या खोलवरच्या बदलांचे ठळक निदर्शक म्हणून त्याकडे पाहावे लागेल. ल्होंदे खोला आणि भोटे कोशी नदी प्रणालीतून प्रचंड वेगाने खाली आलेल्या पाणी, गाळ आणि शिळांच्या प्रवाहाने काही तासांत नागरी वसाहती, पूल, रस्ते, जलविद्युत प्रकल्प आणि दळणवळणाच्या पायाभूत सुविधांना विध्वंसक तडाखा दिला. या हाहाकारात ४०० हून अधिक जणांचा मृत्यू झाला आणि २८८ भारतीयांसह १५०० हून अधिक बेपत्ता झाले आहेत; मात्र या आकड्यांपलीकडे जाऊन विचार केला, तर ही घटना हवामान बदल, पायाभूत सुविधांचे नियोजन, सीमापार जलव्यवस्थापन आणि आपत्ती सज्जता या चार पातळ्यांवर गंभीर प्रश्न उभे करते.

या दुर्घटनेनंतर सुरुवातीला भूकंप झाल्याचा समज पसरला होता. तिबेटमध्ये ४.४ रिश्टर स्केलचा भूकंप नोंदवला गेल्याचे प्राथमिक अहवाल आले; मात्र अमेरिकेच्या भूवैज्ञानिक सर्वेक्षण संस्थेने (यूएसजीएस) उपग्रह छायाचित्रे आणि भूकंपीय लहरींच्या सखोल विश्लेषणानंतर हे हादरे भूकंपामुळे नव्हे, तर हिमनदीचा भाग कोसळून झालेल्या भूस्खलनामुळे निर्माण झाले होते, असे स्पष्ट केले. ही भूवैज्ञानिक ऊर्जा ५.२ इतकी नोंदवण्यात आली.

यावरून आपत्तीचा आवाका लक्षात येतो. हिमालयीन प्रदेशातील निरीक्षण यंत्रणेच्या मर्यादाही या दुर्घटनेने स्पष्ट केल्या. भूकंपमापक यंत्रणा आणि हिमनदी निरीक्षण यंत्रणा यांच्यातील समन्वयाचा अभाव यातून समोर आला. सुरुवातीपासूनच हिमनदी कोसळल्याचे निश्चित झाले असते, तर बचावकार्याची दिशा आणि पुढील धोक्याचे आकलन अधिक जलद आणि अचूक झाले असते. याचा अर्थ, भविष्यात अशा घटना घडल्यास तत्काळ आणि अचूक निदान करणारी बहुस्तरीय संनिरीक्षण (मल्टिहॅझर्ड मॉनिटरिंग) यंत्रणा उभारणे हे प्राधान्याचे काम ठरते.

आंतरराष्ट्रीय एकात्मिक पर्वतीय विकास केंद्राच्या (आयसीआयएमओडी) तज्ज्ञांच्या मते, सुमारे ५,२०० मीटर उंचीवरील एक हिमकडा (आईस रॉक अव्हॅलांच) कोसळून तो ल्होंडे खोला या भोटेकोशीच्या उपनदीत घुसला. घटनेपूर्वीच्या २४ तासांत त्या भागातील हिमनद्यांवरील बर्फाचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटले होते. बर्फ वितळल्याने मोठ्या प्रमाणात पाणी हिमनदीच्या तळाशी झिरपले. त्यामुळे तळाचा भाग निसरडा होऊन हिमनदीचा तळ ढासळला. येथे लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे, ही प्रक्रिया अचानक घडलेली नाही, तर दीर्घकाळ चाललेल्या तापमानवाढीचा तो परिणाम आहे.

हिमालयीन प्रदेशातील डोंगराळ वस्त्यांपुढील धोका आता झपाट्याने वाढत आहे. जी गावे शतकानुशतके सुरक्षित मानली जात होती, ती आता उंचावरील हिमकड्यांच्या अस्थिरतेमुळे असुरक्षित बनली आहेत. त्यामुळे तात्कालिक बचावकार्य करतानाच दीर्घकालीन पुनर्वसन आणि रिस्क मॅपिंग आधारित नियोजन आवश्यक आहे. या दुर्घटनेचा सर्वात ठळक भूराजकीय पैलू म्हणजे तिचा सीमापार परिणाम. भोटेकोशी आणि त्रिशूली नद्यांमधून वाहणारे हे अतिरिक्त पाणी अखेरीस गंडक (नारायणी) नदीमार्गे भारताच्या बिहार आणि उत्तर प्रदेश राज्यांपर्यंत पोहोचण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

त्यानुसार वाल्मीकीनगर येथील गंडक बॅरेजचे सर्व ३६ दरवाजे खबरदारीचा उपाय म्हणून उघडण्यात आले, कारण अंदाजे अडीच लाख क्युसेक्स इतका प्रवाह येण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. सध्याच्या सुमारे ८० हजार क्युसेक्सच्या तुलनेत हा प्रवाह तिपटीहून अधिक आहे. १४ जुलै २०२६ रोजी गंडक नदीचा सर्वाधिक प्रवाह २ लाख २४ हजार क्युसेक्स नोंदवला गेला होता, तर सप्टेंबर २०२४ मध्ये हा प्रवाह ५ लाख ६२ हजार ५०० क्युसेक्सपर्यंत पोहोचला होता.

यावरून हे स्पष्ट होते की, हिमालयातील एका दुर्गम खोऱ्यात घडणारी घटना काही तासांतच शेकडो किलोमीटर दूर असलेल्या भारतीय मैदानी प्रदेशातील लाखो लोकांच्या सुरक्षिततेवर परिणाम करू शकते. ही वस्तुस्थिती दक्षिण आशियातील जलव्यवस्थापनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज अधोरेखित करते. नेपाळ, भारत आणि चीन या तिन्ही देशांमध्ये हिमालयातून उगम पावणाऱ्या नद्यांबाबत रिअल-टाईम माहितीची देवाणघेवाण करणारी संयुक्त यंत्रणा अद्याप पुरेशी विकसित झालेली नाही. प्रत्येक देश आपापल्या परीने सतर्कता बाळगत असला, तरी एकत्रित आणि तत्काळ माहिती-प्रवाह यंत्रणेचा अभाव स्पष्टपणे जाणवतो.

या संकटाला भारताने तत्परतेने प्रतिसाद दिला. भारताने लष्करी विमानांद्वारे मदतसाहित्य पाठवण्याची आणि शोध-बचावकार्यात सहभागी होण्याची तयारी दर्शवली. मात्र ही मदत मुख्यत्वे प्रतिक्रियात्मक (रिॲक्टिव्ह) स्वरूपाची आहे - म्हणजे आपत्ती घडल्यानंतर दिली जाणारी. हिमालयीन प्रदेशातील वाढत्या क्रायोस्फिअर धोक्यांचा सामना करण्यासाठी दीर्घकालीन, पूर्वनियोजित (प्रोॲक्टिव्ह) आणि संस्थात्मक स्वरूपाचे सहकार्य आवश्यक आहे. यामध्ये संयुक्त हिमनदी-निरीक्षण केंद्रे, सामायिक इशारा यंत्रणा आणि सीमापार नदी-आयोगांचे बळकटीकरण यांचा समावेश असायला हवा. आयसीआयएमओडीसारख्या प्रादेशिक संस्था याबाबत आवाज उठवत असल्या, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी भारत, चीन, नेपाळ या देशांची राजकीय इच्छाशक्ती आणि निधीची गरज आहे.

भारतातील उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि सिक्कीम या राज्यांतही याच प्रकारच्या हिमालयीन क्रायोस्फिअर धोक्यांचा सामना करावा लागू शकतो, हे मागील काही वर्षांतील घटनांवरून स्पष्ट झाले आहे. २०२१ मध्ये उत्तराखंडमधील चमोली येथे रोंती शिखरावरून झालेल्या हिमकडा-दुर्घटनेने ऋषीगंगा-धौलीगंगा खोऱ्यात २०० हून अधिक जणांचा बळी घेतला होता. २०१३ मधील केदारनाथ दुर्घटनेतही ढगफुटी आणि चोराबारी हिमनदी वितळण्याचा एकत्रित परिणाम कारणीभूत ठरला होता. त्यात सुमारे ५,७०० जण दगावले होते. या दोन्ही घटनांची पुनरावृत्ती नेपाळमध्ये वेगळ्या स्वरूपात झाली आहे. याचाच अर्थ संपूर्ण हिमालयीन पट्टा - मग तो नेपाळचा असो, भारताचा असो वा तिबेटचा - एकाच पर्यावरणीय जोखमीखाली येतो. यामुळे भारताने केवळ बिहार-उत्तर प्रदेशातील पूरस्थितीवर लक्ष केंद्रित न करता, हिमालयीन राज्यांतील हिमनद्या आणि सरोवरांच्या स्थितीचे सातत्यपूर्ण उपग्रह-आधारित निरीक्षण अधिक भक्कम करणे आवश्यक आहे आणि प्रादेशिक सहकार्याच्या ठोस संस्थात्मक चौकटीची. जोपर्यंत हिमालयीन देश एकत्रितपणे या संकटाकडे पाहत नाहीत, तोपर्यंत अशा दुर्घटना वारंवार घडत राहतील आणि प्रत्येक वेळी किंमत मोजावी लागेल ती निष्पाप नागरिकांच्या जिवांची.

जलविद्युत विकासापुढे नवे प्रश्न

हिमालयीन नद्यांच्या प्रचंड उताराम्ुळे त्यांच्यात जलविद्युतनिर्मितीची मोठी क्षमता आहे. नेपाळच्या विकासाच्या दृष्टीने ही नैसर्गिक संपदा अत्यंत महत्त्वाची आहे; मात्र याच नदीखोऱ्यांत जलविद्युत प्रकल्प, रस्ते, पूल, वीज वाहिन्या, पर्यटन सुविधा आणि वस्त्या एकवटल्याने आपत्तीतील 'एक्स्पोजर'ही वाढत आहे. रासुवा पुरात जलविद्युत प्रकल्पांना बसलेला फटका याच समस्येचे निदर्शक आहे. यातून जलविद्युत विकास नाकारण्याचा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही; मात्र हिमालयातील पायाभूत सुविधांचे नियोजन जुन्या नोंदींच्या आधारावरच करणे पुरेसे राहिलेले नाही. एखाद्या नदीने गेल्या ५० किंवा १०० वर्षांत अनुभवलेला सर्वाधिक पूर भविष्यातील कमाल जोखमीचा अचूक निर्देशक असेलच असे नाही. हिमनदीचे आकुंचन, नवीन सरोवरांची निर्मिती, पर्माफ्रॉस्टमधील बदल, भूस्खलन आणि अतितीव्र पर्जन्य यांचा संयुक्त विचार प्रकल्पांच्या जोखीम मूल्यांकनात समाविष्ट करावा लागेल.

नेपाळची भौगोलिक रचना जोखीम वाढवणारी

नेपाळची भूरचना आकस्मिक पुराचा परिणाम अनेक पटींनी वाढवते. उंच पर्वतांमधून खाली उतरणाऱ्या नद्या खोल आणि अरुंद दऱ्यांतून वाहतात. अशा ठिकाणी अचानक मोठ्या प्रमाणावर पाणी आले, तर त्याला विस्तारासाठी पुरेशी जागा नसते. नदीपात्राची अरुंद रचना प्रवाहाला अधिक वेग देते. त्यात तीव्र उतारामुळे गुरुत्वाकर्षणाची ऊर्जा जोडली जाते. खाली येताना प्रवाह नदीकाठची माती, खडक, वृक्ष आणि मोठ्या शिळाही सोबत वाहून आणतो. परिणामी, नुकसान केवळ पाण्याच्या प्रमाणामुळे होत नाही, तर प्रवाहाची गतिज ऊर्जा आणि त्यातील घन पदार्थांची मात्रा त्याची विध्वंसक क्षमता वाढवते. नेपाळच्या थामे परिसरात २०२४ मध्ये खडकांच्या स्खलनाने एका हिम सरोवरात मोठी लाट निर्माण केली. त्यानंतर पाणी दुसऱ्या सरोवरात पोहोचले आणि पुढील नैसर्गिक बांध फुटल्याने प्रवाहाची ऊर्जा वाढत गेली. अखेरीस पाणी आणि गाळाचे मिश्रण तयार झाले आणि मोठ्या शिळा सुमारे ८० किलोमीटरपर्यंत वाहून गेल्याचे आयसीआयएमओडीच्या अभ्यासात नोंदविण्यात आले होते.

चीनचा धोका

नेपाळमधील महाप्रलयाने भारताच्या सीमेजवळ चीन उभारत असलेल्या महाकाय धरणाबाबतची चिंता पुन्हा ऐरणीवर आणली आहे. नेपाळचे म्हणणे आहे की, चीनच्या केरुंग भागातील एक तलाव फुटल्याची पूर्वसूचना न दिल्यानेच सुमारे दोन कोटी घनमीटर पाणी अचानक नेपाळमध्ये घुसले. वेळेवर इशारा मिळाला असता, तर एवढा विध्वंस टाळता आला असता. या पार्श्वभूमीवर अरुणाचल प्रदेशच्या सीमेपासून अवघ्या ३० किलोमीटर अंतरावर चीनकडून उभारण्यात येणाऱ्या जगातील सर्वांत मोठा जलविद्युत प्रकल्पाचा विचार महत्त्वाचा ठरणार आहे. यारलुंग त्सांगपो नदीच्या एका मोठ्या वळणावर न्यिंगची भागात जुलै २०२५ पासून या प्रकल्पाचे बांधकाम सुरू झाले आहे. हीच नदी पुढे अरुणाचल प्रदेशात सियांग आणि आसाममध्ये ब्रह्मपुत्रा या नावाने ओळखली जाते.

सुमारे २५० किलोमीटर लांबीच्या खोऱ्यात पाच धरणे बांधली जाणार असून, जवळपास दोन हजार मीटर उंचीवरून पाणी सोडून वीजनिर्मिती केली जाईल. २०३३ पर्यंत पूर्ण होणाऱ्या या प्रकल्पाची क्षमता ६० गिगावॅट असेल आणि वर्षाला सुमारे ३०० अब्ज युनिट वीजनिर्मिती अपेक्षित आहे. यासाठी १३७ ते १७० अब्ज डॉलर इतका प्रचंड खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पाबाबतची खरी चिंता त्याच्या आकारापेक्षा त्याच्या स्थानाची आहे. हा भाग मेडोग फॉल्ट झोनजवळ येतो, जिथे भारतीय आणि युरेशियन टेक्टोनिक प्लेटस् एकमेकांना भिडतात. त्यामुळे हा प्रदेश भूकंपाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील आहे. नेपाळमधील ताज्या दुर्घटनेने हे स्पष्ट केले आहे की, हिमालयातून उगम पावणाऱ्या नद्यांबाबत चीनकडून वेळेवर माहिती न मिळणे हे मोठे संकट ठरू शकते.

डॉ.योगेश प्र.जाधव

मुंबई-गोवा महामार्गावरील खासगी बसचालकांची मुजोरी

मुंबई ते गोवा या अत्यंत महत्त्वाच्या महामार्गावरून प्रवास करताना खासगी बस प्रवाशांच्या वाट्याला येणाऱ्या यातना आणि मानहानीची मालिका आता असह्य झाली आहे. महामार्गावरील विशिष्ट हॉटेल मालकांशी साटेलोटे करून एकाच वेळी २५ ते ३० खासगी बसेस एकाच हॉटेलसमोर थांबवल्या जातात. परिणामी, एकाच वेळेस दीड हजारांहून अधिक प्रवासी तिथे उतरतात आणि तिथे सुरू होते खरी प्रवाशांची कुचंबना. स्वच्छतागृहांची भयानक दुरवस्था, जेवणासाठी बसण्याच्या जागेची चणचण आणि खाद्यपदार्थ मागवल्यानंतर ते वेळेत न मिळणे हे नित्याचेच झाले आहे. या सर्व व्यवस्थापनात सर्वात मोठा प्रश्न असतो तो खाद्यपदार्थांची चव, गुणवत्ता आणि प्रमाणाचा. त्यातच जे प्रवाशांसाठी घरून स्वतःचे अन्नपदार्थ घेऊन येतात, त्यांना हॉटेलचालकांकडून अत्यंत हीन व अपमानकारक वागणूक दिली जाते. अस्वच्छ टेबल्स, पंख्यांचा अभाव, घुमटलेली उष्णता आणि एकाद्या मिणमिणत्या ट्युबलाईटच्या प्रकाशात बसावे लागते. हॉटेलच्या इतर सुरक्षित ठिकाणी बसण्यास सक्त मनाई असते. बस चालक आणि वाहक यांची खाण्यापिण्याची सोय हॉटेल मालकाकडून मोफत किंवा सवलतीत होत असल्याने त्यांना प्रवाशांच्या हालअपेष्टांशी काहीही देणे-घेणे नसते. प्रवाशांच्या मूलभूत अधिकारांची पायमल्ली करणाऱ्या या मनमानी कारभारावर तत्काळ कडक नियंत्रण प्रस्थापित करणे गरजेचे आहे.

मयुर ढोलम

नैसर्गिक जीवनसृष्टी मानवी हस्तक्षेपामुळे धोक्यात

नुकतेच नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी महापुराने हिमालयाच्या संवेदनशीलतेकडे पुन्हा एकदा जगाचे लक्ष वेधले आहे. रसूबागढी परिसरात भोटकासी नदीच्या महापुराने मोठी जीवित आणि वित्तहानी झाली आहे.पर्यटनासाठी गेलेले भारतासह तीस देशांतील शेकडो लोक अचानकपणे आलेल्या या जलप्रकोपामध्ये वाहून गेले. त्यातील अनेक लोकांचे मृतदेह सुरक्षायंत्रणेला सापडले. पण तरीही अजूनही शेकडोंच्या संख्येने लोक बेपत्ता आहेत. नेपाळ-चीनला जोडणारा शतकानुशतकेचा जुना महत्त्वाचा मार्ग या जलप्रलयात उदध्वस्त झाला. ही केवळ एक नैसर्गिक आपत्ती म्हणून पाहून चालणार नाही. तर ती मानवाने निसर्गाच्या मर्यादा ओलांडल्याचा हा गंभीर इशारा आहे. हिमालय हा केवळ बर्फाच्छादित पर्वत रांगांचा समूह नाही. तर तो आशियातील असंख्य नद्यांचा उगम, जैवविविधतेचा मोठा आधार आणि कोट्यवधी लोकांच्या जीवनाचा आधारस्तंभच आहे. मात्र, विकासाच्या नावाखाली रस्ते, पूल, बांधकामे, पर्यटन सुविधा आणि अन्य प्रकल्पांसाठी डोंगर फोडले जात आहेत. त्यासाठी हजारो झाडांची कत्तल होत आहे. त्यामुळे पर्वतांचे नैसर्गिक संतुलन बिघडून मानव हे स्वतःहून स्वतःवर अरिष्ट ओढवून घेत आहे. अशा परिस्थितीत अतिवृष्टी, भूस्खलन, ढगफुटी आणि हिमकडा कोसळण्यासारख्या घटनांचे परिणाम अधिक विध्वंसक ठरत आहेत.नेपाळपासून तिबेटपर्यंत घोंघावलेल्या महापुराने किंवा जलप्रलयाने हिमालयीन पर्वतीय प्रदेशातील वाढत्या मानवी हस्तक्षेपायाचे आणि ढासळत्या पर्यावरणीय संतुलनाचे भयावह संरक्षण म्हणजेच वसुंधरेचे संवर्धन होय जीवसृष्टीचे भविष्य सुरक्षित राहिले तरच भविष्यातील विनाश टाळता येतील.

प्रा. मधुकर चुटे
नागपूर

संवाद

मंडळांनी डीजे, लेझरचा वापर टाळावा

लाडक्या गणपती बाप्पांचे आगमन आता काही दिवसांवर येऊन ठेपले आहे. अशावेळी सार्वजनिक गणेशोत्सव शांततेत, शिस्तीत आणि कोणत्याही तक्रारीविना पार पडावा यासाठी पोलिस प्रशासनाने मिरवणुकांमध्ये होणाऱ्या तीव्र आवाजाच्या व आरोग्याला घातक ठरणाऱ्या त्रासामुळे लेझर लाईट्सच्या वापरावर पूर्ण बंदी आणि डीजेच्या आवाजावर कठोर मर्यादा लागू केल्या आहेत. विशेषतः 'प्लाझ्मा' स्पीकर्स, 'प्रेशर मिड' यंत्रणा आणि धोकादायक लेझर लाइट्स यांसारख्या अति तीव्रतेच्या ध्वनी व प्रकाश यंत्रणांवर १०० टक्के कडक बंदी घालण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो स्वागतार्ह आहे. गेल्या काही वर्षांत विसर्जन मिरवणुकांमध्ये लावण्यात येणाऱ्या उच्च क्षमतेच्या डीजेच्या कानठळ्या बसवणाऱ्या आवाजामुळे अनेक वृद्ध, लहान मुले आणि आजारी व्यक्तींना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागले आहे. तसेच लेझर किरणांमुळे मिरवणुकीत जाणाऱ्या अनेक तरुणांच्या डोळ्यांना गंभीर इजा झाल्याच्या आणि काहींची दृष्टी कायमची गेल्याच्या घटना समोर आल्या आहेत. खरे तर पारंपारिक ढोल, ताशा पथके, लेझिम आणि भजनांच्या गजरातही तितकाच उत्साह, प्रसन्नता आणि चैतन्य असते. त्यामुळे यंदाच्या गणेशोत्सवात सर्व सार्वजनिक मंडळांनी स्वतःहून डीजे, लेझरचा वापर टाळावा आणि पर्यावरणपूरक, सुरक्षित, शांततेत आणि आनंदात उत्सव साजरा करावा हीच त्या गणरायाच्या चरणी प्रार्थना!

-प्रदीप मोरे

जाहिरातींमधून भारतीय परंपरेचे चित्र

रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीच्या प्रेम, आपुलकी आणि परस्पर रक्षणाच्या भावनेचे प्रतीक असलेला पवित्र सण आहे. मात्र अलीकडच्या काळात विविध जाहिरातींमधून हिंदु सणांचे सादरीकरण करताना त्यांच्या पारंपरिक स्वरूपात बदल होत असल्याचे दिसून येत आहे. एका प्रसिद्ध दागिन्यांच्या आस्थापनाच्या रक्षाबंधनावरील विज्ञापनात अभिनेत्री क्रिती सानोन हिने सणाचे सादरीकरण केले आहे; या विज्ञापनात पाश्चात्त्य वेशभूषेचा वापर करण्यात आला असून, भावाला राखी बांधण्यापूर्वी पाळीव कुत्र्याला राखी बांधल्याचे दाखवण्यात आले आहे. त्यामुळे रक्षाबंधनाच्या पारंपरिक संकल्पनेविषयी प्रश्न उपस्थित केले जात आहेत. परंतु सणाच्या मूळ भावनेत बदल करणारे चित्रण कितपत योग्य आहे,जाहिरातींच्या माध्यमातून सण, संस्कृती आणि परंपरा यांचा वापर उत्पादनांच्या विक्रीसाठी केला जात असल्याचे अनेक उदाहरणांमधून दिसून आले आहे. काही विज्ञापनांमध्ये विवाहविधी, व्रत-परंपरा किंवा धार्मिक प्रतीकांचे आधुनिक पद्धतीने पुनर्सादरीकरण केले जाते. हिंदु सण हे केवळ उत्सव नसून ते समाजजीवन, कुटुंबव्यवस्था आणि संस्कार यांचे प्रतीक आहेत.

-रमा देशमुख नागपूर

सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

पुसद नगर परिषद मधून घंटा गाडी हद्दपार; महिन्याकाठी चालतो लाखोचा अपहार.!

काही सामाजिक तथा राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांचा आंदोलनाचा इशारा.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. ३० : नगर परिषदेने शहरतील व्यापार पेठ व नगर प्रभागातील घरोघरी जावून कचरा संकलनासाठी घंटागाड्या उपलब्ध करून घेतल्या असुन घंटा गाडीव्दारे कचरा जमा करण्यांचे काम ठेका(कंत्राटी)पध्दतीने दिलेले आहे. परंतु शहरामध्ये व्यापारी पेठेत तसेच नगरातील प्रभागामध्ये क्वचित प्रसंगी घंटागाडी दिसते. दररोज कचरा जमा करतांना घंटा गाडी कुठेही दिसत नाही याबाबत घंटा गाडी येत नसल्याच्या नागरीकांच्या अनेक तक्रारी येत असुन नागरीकांमध्ये रोष निर्माण झाला आहे.

पर्यायाने नागरीक जिथे जागा दिसेल तिथे रोडवर कचरा टाकत असल्याचे चित्र दिसत आहे, त्यामुळे शहरात सर्वत्र `घाणीचे साम्राज्य पसरले आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे साथीचे रोग पसरत आहेत डेंग्युचे अनेक रुग्ण परिसरात आढळून येत असुन मागील काळात डेंग्युमुळे जिवीत हानी झालेली आहे. प्रत्यक्षात शहरातील घंटागाड्यांचे फिरणे कचरू जमा करण्याचे काम सध्या आठवड्यातून एक दोन दिवस असल्याचे दिसत आहे. सदर कामाचा ठेका इतर व्यक्तींच्या नावे अधिकृतरित्या दिले असले तरी प्रत्यक्षात काम करणारी व करवून घेणारे नगर सेवक कमी तर ठेकेदार जास्त असल्यामुळे घंटा गाड्या पुसद शहरात फिरो या न फिरो देयके मात्र महिन्याकाठी लाखो रुपये २२ते२३ घंटा गाड्यासाठी देण्यांत येत आहेत. आरोग्य विभागामार्फत फिरणारी ही घंटागाडी कागदावर प्रत्येक प्रभागात दिवसाकाठी ४ वेळा फिरते परंतु प्रत्यक्षात प्रभागात आठ दिवसातून एक ते दोनवेळाही दिसत नाही. या शिवाय २५-३० कंत्राटी सफाई कामगारांचे देयक(बिल) तसेच कचरा संकलन करुन प्रक्रिया करण्यांचेही बिल अदा करण्यात येत असल्याची माहिती समोर येतआहे. मात्र त्यावर कुछलीही प्रक्रिया केल्याचे दिसुन येत नाही. त्यांचे देयके कोणतीही शहानिशा न करता नियमितपणे अदा केलेले असल्यामुळे.असाच प्रकार इतर विभागातही मोठ्या प्रमाणावर निर्माण झाला असुन नगर परिषदेचे आर्थिक नियोजन पूर्णतःविस्कळले असुन संबंधिताचा वचक राहिला नसल्यामुळे सर्वत्र बोगस बिलांना उत आला आहे.

यापुढे पुसद शहरातील घंटा गाड्या परिस्थिती चार दिवसात सुधारली नाही तर तिव्र आंदोन छेडण्यात येईल. संपूर्ण जबाबदारी ही प्रशासनाची राहील असा इशारा काही सामाजिक कार्यकर्ते तथा राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने दिला आहे.

मृत कुत्रा उचलला, पण निर्जंतुकीकरणाचा 'पत्ता' नाही!

घाटंजी ग्रामीण रुग्णालय परिसरातील प्रकार, आरोग्य विभागाच्या कारभारावर नगरसेवक संघपाल कांबळेंचा संताप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



घाटंजी, दि. ३० : शहरातील ग्रामीण रुग्णालय परिसरातील बजरंगबली मंदिरासमोरील पलंगावर मृत कुत्रा पडून असल्याचा धक्कादायक प्रकार रविवारी समोर आला. विशेष म्हणजे सकाळी साडेसात वाजताच नगर परिषद ग्रुपवर तसेच आरोग्य निरीक्षकांना याबाबत माहिती देण्यात आली होती. मात्र, तब्बल ११.३० पर्यंत कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने नगर परिषद प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

नगरसेवक संघपाल भीमराव कांबळे यांनी लेखी तक्रार केल्यानंतर अखेर नगर परिषदेच्या मृत जनावरे उचलण्याचा ठेका असलेल्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून मृत कुत्रा उचलून नेला. मात्र, ज्या पलंगावर मृत कुत्रा पडून होता, तसेच आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण करण्यात आले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. ग्रामीण रुग्णालय परिसरात दररोज रुग्ण, त्यांचे नातेवाईक तसेच नागरिकांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे अशा संवेदनशील ठिकाणी मृत प्राणी दीर्घकाळ पडून राहणे आणि त्यानंतर केवळ मृतदेह हटवून निर्जंतुकीकरणाकडे दुर्लक्ष करणे, ही बाब सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने गंभीर मानली जात आहे. सकाळी ७.३० वाजता माहिती देऊनही साडेअकरापर्यंत कारवाई झाली नाही. लेखी तक्रारीनंतर कुत्रा उचलला; मात्र निर्जंतुकीकरण झाले नाही. नगर परिषद प्रशासन नेमक्या कोणत्या स्वच्छतेची वाट पाहत आहे?" असा सवाल नगरसेवक संघपाल कांबळे यांनी उपस्थित केला. दरम्यान, "नगर परिषदेचा आरोग्य विभाग अक्षरशः व्हेंटिलेटरवर आहे. आरोग्य विभागाचा अतिरिक्त प्रभार देण्यात आला असून नियमित आरोग्य निरीक्षक यवतमाळ येथे कार्यरत असल्याची स्थिती आहे. घाटंजी शहराचे आरोग्य सुधारायचे असेल तर कायमस्वरूपी आरोग्य निरीक्षकाची नियुक्ती करणे गरजेचे आहे," अशी प्रतिक्रिया वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष तथा नगर परिषद घाटंजीचे स्वीकृत सदस्य नगरसेवक संघपाल कांबळे यांनी दिली. या प्रकाराची चौकशी करून कारवाईतील विलंबास जबाबदार असणाऱ्यांची निश्चिती करावी, तसेच ग्रामीण रुग्णालय परिसराचे तातडीने निर्जंतुकीकरण करून घाटंजी नगर परिषदेत कायमस्वरूपी आरोग्य निरीक्षक नियुक्त करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

सेलू (बुद्रुक) येथिल अवैध वरळी मटक्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर..! पोलीस प्रशासनावर हप्ता वसुचा आरोप.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. ३० : शहर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या सेलू (बु.)येथे वरळी मटक्याचा काळाबाजार गेल्या अनेक महिन्यापासून चालू असल्यामुळे बीट जमादार सह पोलीस प्रशासनावर हप्ते वसुलीचा स्थानिक नागरिकाकडून आरोप करत गावातील शांतता भंग होण्याचे सांगण्यात येत आहे.

सविस्तर माहिती अशी की पुसद पासून अवघ्या ५(पाच) किलोमीटर अंतरावर असलेल्या मौजा सेलू (बु.)येथे उमरखेड रोड लगत बसस्टँड जवळील अनेक ठिकाणच्या हॉटेल, घर,व धार्मिक स्थळा जवळ वरळी मटक्याचे अनेक काउन्टर सुरू असून मटका खावालांना पोलीस प्रशासनाचा व कायद्याचा कोणताही धाक नसल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर निर्माण झालेला आहे यामुळे या ठिकाणी कधीही धार्मिक तेढ निर्माण होऊन शांतताभंग होण्याची नागरिकाकडून चर्चा ऐकायला मिळत आहे.

पुसद शहरापेक्षा या ठिकाणी मटका लावण्यासाठी वेणी,लोणदरी, खडकदरी, कोंढई, कोपरा, कृष्णनगर, दहिवड,व सेलू या ठिकाणचे शेकडो शेतकरी, मजूर व महिला वरळी मटका लावण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी होत आहे. त्यामुळे सेलू (बु.) येथील अवैध वरळी मटका बंद करण्याचे पुसद शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार क्षीरसागर यांच्यासमोर आव्हान असल्यामुळे या अवैध धंद्यावर लगाम लागतील का असे नागरिकाकडून प्रश्न उपस्थित होत आहे. या परिसरात वरळी-मटक्याच्या धंद्यामुळे येथील पुसद-उमरखेड राज्य मार्गावर सकाळपासून ते सायंकाळपर्यंत एवढी मोठ्या प्रमाणात गर्दी असते की नांदेड-उमरखेड कडे जाणारे प्रवाशांना व शाळेतील विद्यार्थ्यांना रोडने जाता-येता मोठा त्रास सहन करावा लागत असल्यामुळे विद्यार्थ्यांवर विपरीत परिणाम होऊन त्यांचे भविष्य धोक्यात आले आहे, सेलू (बु.) परिसरातील शेतकरी व मजूर हे आपले शेतीच्या औषधीचे व मजुरीचे पैसे या ठिकाणी वरळी मटक्यात टाकत असल्यामुळे त्यांचे संसार उद्धवस्त होत आहे. तसेच येथील मटका गेल्या अनेक महिन्यापासून सुरू असल्यामुळे बीट जमादार यांचे आर्थिक दुर्लक्ष होत असल्याने कायदा सुव्यवस्था व शांतता अबाधीत राहण्यासाठी नविन रुजू झालेले पुसद शहरचे ठाणेदार क्षीरसागर यांनी गांभीर्य लक्षात घेऊन येथील खुलेआम सुरू असलेला वरळी मटका कायमस्वरूपी बंद करण्यात यावे अशी सेलू (बु.) परिसरातील नागरिकांकडून मागणी जोर धरत आहे.

न्यायाधीश असल्याचे भासवून बेरोजगारांना गंडा..! ग्रामसेविकेसह पतीविरुद्ध गुन्हा

नोकरीच्या आमिषाने दोघांकडून तब्बल ६९ लाख रुपये उकळल्याचा आरोप; वडकी पोलिसांत गुन्हा दाखल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

राळेगाव, दि. ३० : राळेगाव पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रातील आष्टोणा ग्रामपंचायतीच्या तत्कालीन ग्रामसेविका आरती ज्ञानेश्वर वडुळे आणि त्यांचे पती मारोती किसन मुलुक यांनी न्यायाधीश असल्याचे भासवून सुशिक्षित बेरोजगारांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

नोकरीचे आमिष दाखवून दोघांकडून तब्बल ६९ लाख रुपये घेतल्याचा आरोप असून, या प्रकरणी वडकी पोलिसांनी दोघांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, आरती वडुळे या सन २०२४ मध्ये आष्टोणा ग्रामपंचायतीत ग्रामसेविका म्हणून कार्यरत होत्या. पती मारोती मुलुक हे छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयात न्यायाधीश असल्याचे सांगून त्यांनी बेरोजगारांना न्यायालयातील लिपिक पदांच्या रिक्त जागांवर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखविल्याचा आरोप आहे. या नोकरीसाठी प्रति उमेदवार ४५ लाख रुपये मागितल्याचे तक्रारीत नमूद आहे. रिधोरा येथील दीपक पंढरीनाथ पवार यांच्या मुलीच्या नोकरीसाठी १७ डिसेंबर २०२४ रोजी टोकन म्हणून दोन उमेदवारांचे मिळून २० लाख रुपये देण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर ३ एप्रिल २०२५ रोजी मारोती मुलुक यांच्या वर्धा येथील कॅनरा बँक खात्यावर आरटीजीएसद्वारे ३ लाख ५० हजार रुपये, तर मे २०२५ मध्ये ७ लाख ५० हजार रुपये रोख आणि त्यानंतर आणखी ७ लाख रुपये रोख, असे एकूण २८ लाख रुपये घेतल्याचा आरोप आहे. तसेच वाघोली, ता. हिंगणघाट येथील सौरभ राजेश भुते यांच्याकडून १७ मार्च २०२५ रोजी १० लाख, २० मार्च रोजी ११ लाख आणि २९ जुलै २०२५ रोजी आणखी १० लाख रुपये आरटीजीएसद्वारे तसेच इतर रकमेच्या स्वरूपात घेतल्याचे तक्रारीत नमूद आहे. अशाप्रकारे दोन्ही तक्रारदारांकडून मिळून ६९ लाख रुपये घेतल्यानंतरही नोकरी न लागल्याने संशय बळावला. नोकरीबाबत वारंवार हुलकावणी मिळाल्यानंतर तक्रारदारांनी चौकशी केली असता मारोती मुलुक हे छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात न्यायाधीश नसल्याचे समोर आल्याचा दावा करण्यात आला. त्यामुळे फसवणुकीचा प्रकार उघडकीस आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी आरती वडुळे आणि मारोती किसन मुलुक यांच्याविरुद्ध वडकी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून, ठाणेदार सुखदेव भोरकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, नोकरीच्या आमिषाने आणखी किती जणांची फसवणूक झाली आहे, याचा तपास होणे महत्त्वाचे ठरणार आहे.

थोडक्यात

३५ वर्षांनंतर महागावच्या हनुमान मंदिरात व्यंकटेशस्वामी महाराजांचे आगमन!

'एक लाख शिवलिंग' निर्मितीचा महासंकल्प

महागाव : श्रावण महिन्याच्या पावन पर्वावर तब्बल ३५ वर्षांनंतर श्री हनुमान मंदिर संस्थान (जुने गाव), महागाव येथे प.पू. महामंडलेश्वर गिरीराज श्री चैतन्यजी व्यंकटेशस्वामी महाराजांचे आगमन झाले. महाराजांच्या आगमनाने महागाव नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली. उमरखेड रोडवरील श्री दत्त मंदिराजवळ महाराजांचे आगमन होताच ढोल-ताशांच्या गजरात व फटाक्यांच्या आतषबाजीत भव्य स्वागत करण्यात आले. संभाजी चौकातून मिरवणूक श्री हनुमान मंदिरात पोहोचली. यावेळी महाराजांनी श्रावण महिन्याचे धार्मिक महत्त्व विशद करत शिवभक्ती, नामस्मरण व उपासनेचा संदेश दिला. दरम्यान, पिंपळगाव (माळकिनी) येथे रविवार, ६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता 'एक लाख शिवलिंग' निर्मिती व पूजनाचा महासंकल्प करण्यात आला आहे. या धार्मिक सोहळ्यास परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाराजांनी केले. दर्शन सोहळ्यानंतर आरती व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

तांड्यापासून दिल्लीपर्यंत तिजचा जागर.. बंजारा आरक्षणासाठी जनजागृतीची हाक

यवतमाळ : बंजारा समाजाचा पारंपरिक व सांस्कृतिक वारसा जपणारा तिज उत्सव आता केवळ धार्मिक परंपरेपुरता मर्यादित न राहता सामाजिक परिवर्तन आणि हक्कांच्या लढ्याचे प्रभावी व्यासपीठ बनला पाहिजे. तिज महोत्सवाचा संदेश तांड्यापासून मुंबईमार्गे दिल्लीपर्यंत पोहोचला पाहिजे, असे प्रतिपादन युवक काँग्रेसचे यवतमाळ जिल्हा महासचिव बबलू उर्फ अतुल अंबादासजी राठोड यांनी केले. श्रावण महिन्यात साजऱ्या होणाऱ्या तिज उत्सवात समाजातील कुमारीकांचा सहभाग महत्त्वाचा असतो. नारळी पौर्णिमेच्या मुहूर्तावर काळी माती आणून बांबूच्या टोपलीत गव्हाची पेरणी करण्यापासून सुरू होणारी ही परंपरा दहा दिवस चालते. या काळात नाईक-कारभारी, डाव यांच्या माध्यमातून गाणी, नृत्य आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांतून समाजप्रबोधन केले जाते. संत सेवालाल महाराज तसेच स्व. वसंतरावजी नाईक यांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी तिज महोत्सवाचा प्रभावी वापर व्हावा. बालक आणि तरुणांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, असे राठोड यांनी सांगितले. बंजारा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी प्रत्येक तांड्यावर तिज उत्सवाच्या माध्यमातून जनजागृती करावी. व्यसनमुक्ती, शिक्षण, आरोग्य, सामाजिक ऐक्य, संस्कृती संवर्धन तसेच शाळा, रस्ते, वीज, पाणी आणि वाचनालयांसारख्या मूलभूत सुविधांच्या प्रश्नांवरही प्रबोधन व्हावे. तिज उत्सवातून उभी राहिलेली जनजागृतीची चळवळ तांड्यापासून दिल्लीपर्यंत पोहोचली पाहिजे, अशी भूमिका राठोड यांनी मांडली.

अडेगावात सात तरुणांसह दोन महिलांकडून अवैध दारूविक्री

झरी : अडेगाव गावात अवैध दारूविक्रीचा व्यवसाय दिवसेंदिवस वाढत असून, गावात सात तरुणांसह दोन महिलांकडून अवैध दारूविक्री केली जात असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकारामुळे गावातील शांतता भंग होत असून, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. गावात एक-दोन ठिकाणी दारूविक्री होत नसून अनेक ठिकाणी अवैधरीत्या दारू विक्री सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामध्ये काही तरुणांसह महिलांचाही सहभाग असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढून अनेक कुटुंबांवर त्याचा परिणाम होत असल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले आहे.

अवैध दारूविक्रीबाबत गावातील नागरिकांनी तसेच ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी संबंधित पोलिस ठाण्यात तक्रारी केल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, पोलिसांकडून अपेक्षित कारवाई होत नसल्याची नाराजी नागरिकांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, परवानाधारक देशी दारूच्या दुकानातून अवैध विक्री करणाऱ्यांना दारूचा पुरवठा होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी करून अवैध दारूविक्रीला आळा घालावा आणि संबंधितांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अवैध दारूविक्रीचा वाढता व्यवसाय रोखण्यासाठी पोलिस प्रशासनाने कठोर पावले उचलावीत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

पांढरकवडा उपजिल्हा रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती..

पांढरकवडा : पांढरकवडा उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय सेवांचा प्रश्न ऐरणीवर आणत युवा टायगर फोर्सने केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. ३० जुलै रोजी आरोग्य उपसंचालक, अकोला यांच्याकडे केलेल्या मागणीची दखल घेत रुग्णालयात MBBS, MD (Medicine) तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी डॉ. शेखर दोरखंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे पांढरकवडा व परिसरातील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. उपजिल्हा रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता, रिक्त पदे आणि आवश्यक वैद्यकीय सुविधांचा अभाव यामुळे नागरिकांना उपचारासाठी इतर शहरांची धाव घ्यावी लागत होती. या पार्श्वभूमीवर युवा टायगर फोर्सचे संस्थापक अध्यक्ष मदन जिद्देवार यांनी ३० जुलै रोजी आरोग्य उपसंचालक डॉ. सुशील वाकचौरे यांच्याकडे तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती, रिक्त पदे भरणे तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. या मागणीसाठी संजय झोटिंग यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. यावेळी संयोजक अंकित नैताम, गणेश बोरकुटे, संजय आत्राम व वाजिद कुरेशी उपस्थित होते. तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती झाली असली तरी रुग्णालयातील उर्वरित रिक्त पदे आणि सुविधांचा प्रश्न अद्याप कायम आहे. हे प्रश्नही तातडीने मार्गी लागावेत, यासाठी युवा टायगर फोर्सचा पाठपुरावा सुरूच राहणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

नेरमध्ये 'कायदा मोडाल तर कारवाई अटळ!'

परिविक्षाधीन डीवायएसपी जयेश सोळंकींच्या धडक कारवाईने अवैध धंदे हादरले

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

नेर, दि. ३० : नेर-नबाबपूर शहरात परिविक्षाधीन जिल्हा पोलीस उपअधीक्षक जयेश सोळंकी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या सुमारे २० दिवसांपासून सुरू असलेल्या धडक कारवाईने शहरातील कायदा-सुव्यवस्थेच्या चर्चेला नवे वळण मिळाले आहे. कार्यालयीन आदेशांपुरते मर्यादित न राहता स्वतः पोलिस पथकासोबत रस्त्यावर उतरून कारवाई करण्याच्या त्यांच्या कार्यपद्धतीची शहरात जोरदार चर्चा सुरू आहे.

मुख्य बाजारपेठ व राष्ट्रीय महामार्गालगतचे अतिक्रमण, रस्त्यावर उभ्या राहणाऱ्या हातगाड्या, अस्ताव्यस्त पार्किंग आणि वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या वाहनांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. वाहन चालविताना मोबाईलवर बोलणाऱ्यांवरही कारवाई होत असल्याने वाहतूक शिस्तीला चालना मिळत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यासोबतच सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री, गोवंश मांस विक्री, गांजा तसेच रेती तस्करीसारख्या कथित अवैध प्रकारांविरोधातही पोलिसांनी मोहीम सुरू केली आहे. त्यामुळे पूर्वी उघडपणे सुरू असल्याची चर्चा असलेले काही प्रकार आटोक्यात आल्याचे नागरिक सांगतात. रात्री उशिरापर्यंत सार्वजनिक ठिकाणी होणारी गर्दी आणि अनावश्यक जमावावरही पोलिसांचे लक्ष आहे. या कारवाईमुळे काही नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असतानाच, अतिक्रमण हटाव व व्यवसायांवरील कारवाईमुळे काही व्यापारी आणि छोट्या व्यावसायिकांमध्ये नाराजीचा सूरही उमटत आहे. सोळंकी यांच्या बेधडक कार्यपद्धतीमुळे नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून, पोलिसांचा ताफा कारवाईसाठी जाताना पाहण्यासाठी काही ठिकाणी नागरिकांची गर्दी होत आहे. आता ही मोहीम सातत्याने सुरू राहते का आणि कारवाईसोबत छोट्या व्यावसायिकांच्या अडचणींचाही विचार केला जातो का, याकडे नेरकरांचे लक्ष लागले आहे.

'ज्ञान सन्मान'मध्ये रोटरी उमरखेडचा चौकार!

शिक्षण, महिला सक्षमीकरण, आरोग्यसेवेसह सामाजिक कार्याची दखल.. चार मानाचे पुरस्कार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

उमरखेड, दि. ३० : सामाजिक बांधिलकी आणि सेवाभावी कार्याचा ठसा उमटविणाऱ्या रोटरी क्लब उमरखेडने 'ज्ञान सन्मान' पुरस्कार सोहळ्यात दमदार कामगिरी करत तब्बल चार पुरस्कारांवर नाव कोरले. रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० अंतर्गत नाशिक येथे झालेल्या या सोहळ्यात शिक्षण, महिला सक्षमीकरण, डोळ्यांची काळजी व देखभाल आणि विशेष प्रोत्साहन या विभागांत क्लबचा गौरव करण्यात आला.

सन २०२५-२६ मध्ये क्लबने शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, पर्यावरण, रक्तदान, पोलिओ निर्मूलन व सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रम राबविले. दहावीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक ॲपचे वितरण करून संपूर्ण डिस्ट्रिक्टमध्ये सर्वाधिक विद्यार्थ्यांपर्यंत ते पोहोचविण्याचा मान क्लबने मिळविला. आरोग्य क्षेत्रात पाच दिवसीय कायरो थेरपी शिबिरात सुमारे ३५० रुग्णांनी लाभ घेतला. रक्त तपासणी, रक्तदान, कर्करोग निदान व उपचार तसेच नेत्र तपासणी आणि शस्त्रक्रिया शिबिरेही घेण्यात आली. गो. सि. गावंडे महाविद्यालयातील १०० विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी व २०० विद्यार्थ्यांची ओरल चेकअप करण्यात आली. महिला सक्षमीकरणासाठी १२५ महिलांना ४० दिवसांचे शिलाई प्रशिक्षण देण्यात आले, तर गरजू महिलांना १४ शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. गरजू एमबीबीएस विद्यार्थ्यांला ₹ लाखांची शैक्षणिक मदतही करण्यात आली. पुरस्कार अध्यक्ष श्रीराम सारडा, सचिव डॉ. विशाल माने व कोषाध्यक्ष गजानन लेकेपिल्लेवार यांनी स्वीकारले. या यशामुळे उमरखेडच्या सेवाभावी कार्याची व्यापक दखल घेतली गेली आहे.

चिमुकल्यांच्या हातून 'रक्षणकर्त्यां'ना राखी, झाडांनाही बांधले प्रेमाचे बंधन!

माउंट लिट्रा झी स्कूलचा संस्कारक्षम उपक्रम.. पोलिसांकडून चिमुकल्यांना रक्षणाचे वचन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

महागाव, दि. ३० : रक्षाबंधन म्हणजे केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नव्हे, तर प्रेम, कृतज्ञता आणि रक्षणाची भावना जपणारा संस्कार. याच भावनेला सामाजिक आणि पर्यावरणीय संदेशाची जोड देत माउंट लिट्रा झी स्कूलच्या चिमुकल्यांनी अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे केले.

३ ते ५ वयोगटातील विद्यार्थ्यांनी थेट पोलीस स्टेशन गाठून पोलिस बांधवांना स्वतःच्या हाताने तयार केलेल्या राख्या बांधल्या आणि त्यांच्याकडून रक्षणाचे वचन घेतले. 'पोलीस हे आपले मित्र' हा संदेश देत चिमुकल्यांनी पोलिसांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी पोलिसांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले. शाळेतील सुरक्षा रक्षक तसेच स्कूल बस चालकांनाही विद्यार्थ्यांनी राखी बांधून त्यांच्या सेवेला सलाम केला.

दरम्यान, शाळेत हस्तनिर्मित व निसर्गरम्य राखी बनविण्याची स्पर्धाही घेण्यात आली. इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून आकर्षक राख्या तयार केल्या. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरातील झाडांनाही राखी बांधत 'झाडे वाचवा, निसर्ग जपा' असा संदेश दिला. पोलिस, सुरक्षा कर्मचारी, बसचालक आणि निसर्गाशी रक्षाबंधनाचे नाते जोडणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकी व पर्यावरण संवर्धनाचे संस्कार देणारा ठरला.

जि.प. पतसंस्थेचा सभासदांना 'लाभांशाचा बूस्टर'..! तब्बल १४ टक्के लाभांशाची घोषणा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ३० : जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., यवतमाळच्या सभासदांसाठी यंदाची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आर्थिक दिलासा देणारी ठरली. संस्थेच्या सभासदांच्या भागभांडवलावर तब्बल १४ टक्के लाभांश देण्याची घोषणा अध्यक्ष महेश सोनेकर यांनी केली. ५ सप्टेंबर शिक्षक दिनापासून संस्थेचे मुख्य कार्यालय तसेच पुसद, वणी, दारव्हा, आर्णी व पांढरकवडा शाखेत लाभांशाचे वाटप सुरू होणार आहे.

वणी येथील शेतकरी भवनात झालेल्या सभेत विषयपत्रिकेवरील ११ विषयांवर चर्चा होऊन सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेला १० कोटी ७३ लाख ९३ हजार ९३२ रुपयांचा निव्वळ नफा झाला असून, त्यापैकी १४ टक्के दराने ५ कोटी २ लाख ६४ हजार रुपयांचा लाभांश सभासदांना देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. सभासदांच्या हितासाठी कर्जाच्या व्याजदरात अर्धा टक्का कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, गृहकर्ज ९ टक्के तर मालमत्ता तारण कर्ज १० टक्के दराने उपलब्ध होणार आहे. तसेच ५० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज एका दिवसात देण्याची सुविधा असल्याचे संस्थेने नमूद केले. कुटुंब आधार योजनेंतर्गत २८ मृत सभासदांच्या वारसांना २ कोटी २८ लाख रुपये वितरित करण्यात आले. संस्थेचे भागभांडवल ३३ कोटी ९६ लाख, गुंतवणूक १८८ कोटी, कर्जवाटप २३७ कोटी १० लाख, तर राखीव निधी ४२ कोटी १५ लाख रुपये असल्याची माहिती देण्यात आली. यावेळी २२ वर्षांहून अधिक काळ कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी निस्वार्थ सेवा करणारे समाजसेवक प्रा. सतीश मुस्कुंदे यांचा विशेष नागरी सत्कार करण्यात आला. संस्थेचे सचिव संजय विहाडे यांनी अहवालवाचन केले. हजारो सभासदांच्या उपस्थितीत झालेल्या सभेत संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करण्यात आले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त

शेतकऱ्यांना मिळणार जैविक निविष्ठा निर्मितीचे प्रशिक्षण

आसेगाव पूर्णा - रासायनिक निविष्ठांचा वाढता खर्च तसेच जमिनीच्या आरोग्यावर होणारे परिणाम लक्षात घेता शेतकऱ्यांनी स्थानिक पातळीवर जैविक निविष्ठांची निर्मिती करून त्यांचा योग्य वापर करण्याकडे वळणे गरजेचे आहे. या उद्देशाने कृषी अभ्यासक, युवा शेतकरी व कृषी लेखक मिलिंद जि.गोदे यांच्या पुढाकारातून शेतकऱ्यांना जैविक निविष्ठा निर्मितीचे शास्त्रशुद्ध व प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रकल्प संचालक आत्मा, कृषी विभागाच्या वतीने हैदराबाद येथील राष्ट्रीय वनस्पती आरोग्य व्यवस्थापन संस्था (NIPHM) येथे आयोजित प्रशिक्षणात मिलिंद जि. गोदे यांनी जैविक कीटकनाशक व बुरशीनाशक निर्मितीच्या विषयावर प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणादरम्यान विविध जैविक निविष्ठांची निर्मिती, त्यासाठी आवश्यक कच्चा माल, निर्मितीची शास्त्रीय पद्धत, गुणवत्ता टिकविण्याच्या बाबी तसेच विविध पिकांमध्ये जैविक निविष्ठांचा योग्य वापर याबाबत सखोल माहिती व प्रात्यक्षिके घेण्यात आली.मिलिंद जि. गोदे हे आधुनिक, शाश्वत व पर्यावरणपूरक शेती पद्धतींबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करीत आहेत. NIPHM हैदराबाद येथून घेतलेल्या प्रशिक्षणाचा उपयोग स्थानिक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन देण्यासाठी करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणामुळे शेतकऱ्यांना जैविक शेतीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकता येणार असून, मातीचे आरोग्य, उत्पादन खर्चात बचत आणि पर्यावरणपूरक शेती या तिन्ही बाबींना प्राधान्य मिळणार आहे.

श्री मुंगसाजी माऊली जन्मोत्सवाला प्रारंभ

नांदगाव खंडेश्वर - स्थानिक श्री मुंगसाजी महाराज मंदिर श्रद्धा धाम येथे श्री मुंगसाजी माऊलीचा जन्मोत्सवाला प्रारंभ झाला असून या दरम्यान ५ सप्टेंबर पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ५ सप्टेंबर सकाळी महाअभिषेक नंतर १० वाजता ह भ प भूषण महाराज गिरी यांचे काल्याचे किर्तन दुपारी १ ते ४ दरम्यान महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून सायंकाळी ५ वाजता श्रीच्या ग्रंथाच्या मिरवणुकीने कार्यक्रमाची सांगता होणार,तरी या धार्मिक कार्यक्रमाचा नागरिकांनी सहभाग नोंदवून आनंद घ्यावा,असे आव्हान श्री मुंगसाजी बहुद्देशीय मित्र मंडळ यांच्या वतीने करण्यात आले.

इको-फ्रेंडली गणेश निःशुल्क कार्यशाळा

अमरावती - श्री आर्ट कला वर्ग व कला बहुउद्देशीय संस्था संचलित श्री आर्ट कला वर्ग व कला निर्मिती यांच्या वतीने पी.आर.पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी इको-फ्रेंडली गणेशा निःशुल्क कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. सुप्रसिद्ध मूर्तिकार शिवशंकर वालकर यांनी प्रात्यक्षिकाद्वारे गणेशमूर्ती तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.यावेळी श्री आर्ट कला वर्ग व कला निर्मितीचे विद्यार्थी आशिष तिरमारे, विक्रम वैद्य, पूर्वा जैन,सात्विक चांडक, समृद्धी टोगसे,दिव्या पाचडे यांनी ही विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मार्गदर्शन करून मूर्ती साकारण्यात मदत केली.कार्यशाळेला शाळेचे प्राचार्य सचिन दुर्गे, उपप्राचार्य सोनल निस्ताने, इव्हेंट इन-चार्ज नीलिमा केने, शिक्षिका वैशाली अंबरते तसेच शिक्षक अक्षय काळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच श्री आर्ट कला वर्ग व कला निर्मिती मध्ये गणपती मुर्ती रंगविणे स्पर्धा व प्रदर्शन व विक्री सुध्दा ६ तारखेपासुन सुरू होणार आहे. शिक्षक दिनानिमित्त भारताचे सुप्रसिद्ध रांगोळी कलाकार महादेव गोपाळे यांचे व्यक्ती चित्र विषयावर रांगोळीचे प्रात्यक्षिक पण ठेवले आपण सर्वांनी श्री आर्ट कला वर्ग व कला निर्मिती खडैलवल मार्केट साई नगर अकोली रोड अमरावती ठेवले आहे.तसेच महाराष्ट्र शासनाच्या एलिमेंटरी व इंटरमिजीएट परिक्षेचे सुध्दा निशुऊ मार्गदर्शन व प्रशिक्षण विद्यार्थीना दिले जाते.

बेसखेड्यात आज बालब्रह्मचारी श्री चंद्रपुरी महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव

चांदूरबाजार/वार्ताहर

चांदूरबाजार तालुक्यातील श्री क्षेत्र बेसखेडा येथे दरवर्षी श्रावणातील तिसऱ्या सोमवारी साजरा होणारा बालब्रह्मचारी श्री चंद्रपुरी महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव यंदा ३१ ऑगस्ट रोजी भक्तिभावाने साजरा होणार आहे. यानिमित्त श्री क्षेत्रात दर्शन,पूजन तसेच महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, हजारो भाविक सहभागी होणार आहेत.

बेसखेडा येथील श्री बालब्रह्मचारी चंद्रपुरी महाराजांची ही परंपरा अनेक दशकांपासून सुरू आहे. श्रावणातील तिसऱ्या सोमवारी गावात दोडक्याच्या भाजीचा सुगंध आणि रोडग्याचा धूर दरवळतो. नोकरदार, व्यापारी, शेतकरी तसेच विविध क्षेत्रांतील भाविक या दिवशी आपली कामे बाजूला ठेवून महाराजांच्या पुण्यतिथी सोहळ्यासाठी बेसखेडा येथे उपस्थित राहतात.

बालब्रह्मचारी श्री चंद्रपुरी महाराजांनी प्लेगच्या भीषण साथीने त्रस्त गावाला वाचवण्यासाठी गोसाव्याच्या रूपाने बेसखेडा येथे आगमन केले,अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यांनी देवीसमोर प्रार्थना करून साथ संपल्यास जीवंत समाधी घेण्याचा प्रण केला होता. समाधीपूर्वी महाराजांनी गावकऱ्यांना दोडक्याची भाजी आणि रोडग्याचा प्रसाद वाटण्याची परंपरा सुरू केली, जी आजही अखंडपणे सुरू आहे. त्यामुळे या दिवशी बेसखेड्यात श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचे अनोखे दर्शन घडते.

■ 'श्री क्षेत्र बेसखेडा हे हजारो भाविकांच्या श्रद्धेचे स्थान आहे. महाप्रसादाच्या वेळी पावसामुळे भाविकांची गैरसोय होऊ नये आणि तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास व्हावा,यासाठी ५कोटी रुपयांच्या निधीतून सभा मंडप व इतर विकासकामे करण्यात आली आहेत. भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे हा या विकासकामांचा मुख्य उद्देश आहे.'

-आ. बच्चू कडू

आदिवासी विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी वीरेंद्र जगताप मैदानात

मांजरखेड ते सातेफळ फाटा विद्यार्थ्यांसोबत पायी प्रवास;खा.बळवंत वानखडे यांचा विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला ठाम पाठिंबा

चांदूर रेल्वे/वार्ताहर

आदिवासी विद्यार्थ्यांच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी आदिवासी विद्यार्थी संघटनेच्या वतीने सुरू असलेल्या आंदोलनाला काँग्रेस नेत्यांनी पाठिंबा दिला. यवतमाळच्या दिशेने पायी निघालेल्या विद्यार्थ्यांच्या रॅलीत माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप यांनी प्रत्यक्ष सहभागी होत मांजरखेड कसबा ते सातेफळ फाटा असा विद्यार्थ्यांसोबत पायी प्रवास केला.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबाबत सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करत वीरेंद्र जगताप यांनी सरकारवर टीका केली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे महासचिव परीक्षित दादा जगताप हेदेखील विद्यार्थ्यांसोबत पायी सहभागी झाले.'आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या रास्त आहेत. मात्र हे सरकार डोळे असूनही आंधळे झाले आहे. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे तातडीने लक्ष देऊन त्या मान्य कराव्यात,' अशी प्रतिक्रिया वीरेंद्र जगताप यांनी दिली.'छात्रों की गुंज' कार्यक्रमात एका आदिवासी विद्यार्थिनीने शासकीय वसतिगृहात विद्यार्थिनींच्या प्रेग्नन्सी टेस्टच्या माध्यमातून मानसिक छळ होत असल्याची व्यथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासमोर मांडली होती. या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही वीरेंद्र जगताप यांनी केली.परीक्षित जगताप यांनीही वीरेंद्र जगताप यांच्यासोबत मांजरखेड कसबा ते सातेफळ फाटा असा पायी प्रवास करत आंदोलनात सहभाग घेतला.

खा.बळवंत वानखडे यांचा आंदोलनाला पाठिंबा

सातेफळ फाटा येथे अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे यांनी आदिवासी विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्या आंदोलनाला ठाम पाठिंबा दिला. यावेळी त्यांनी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्यावर टीका करत गंभीर आरोप केले.

'अशोक उईके हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि RSSचे हस्तक म्हणून काम करत आहेत. आदिवासी समाजातील विद्यार्थी शिक्षण घेऊन पुढे गेलेला त्यांना चालत नाही. आदिवासी विद्यार्थ्यांच्या अधिकारांवर गदा आणण्याचे काम सरकारकडून केले जात आहे,' असा आरोप खासदार बळवंत वानखडे यांनी केला.आदिवासी विद्यार्थ्यांच्या रास्त मागण्या तातडीने मान्य करून त्यांना न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

प्रशासनाशी चर्चा; मात्र मंत्री न आल्याने विद्यार्थी पुढे रवाना सातेफळ फाटा येथे मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. जिल्हाधिकारी आशिष येरेकर,अमरावतीचे जिल्हा पोलीस अधीक्षक,आदिवासी विकास विभागाचे आयुक्त तसेच इतर अधिकारी व कर्मचारी आंदोलनकर्त्यांशी चर्चा करण्यासाठी उपस्थित होते.आंदोलनकर्त्यांशी चर्चा

करताना मंत्री अशोक उईके येथे येऊन विद्यार्थ्यांशी चर्चा करतील, असे प्रशासनाकडून सांगण्यात येत होते. मात्र बराच वेळ उलटूनही मंत्री उपस्थित न झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली. प्रशासनाकडून आंदोलनकर्त्यांची अडवणूक होत असल्याचा आरोप करत आंदोलकांनी खासदार बळवंत वानखडे व माजी आ.प्रा. वीरेंद्र जगताप यांच्या उपस्थितीत पुढील मार्गाने पायी प्रस्थान केले.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्या

६ ऑगस्ट २०२६ आणि १४ ऑगस्ट २०२६ रोजीच्या शासन निर्णयांमधील विद्यार्थ्यांच्या हितास बाधक तरतुदी असलेले GR तात्काळ रद्द करावेत.वसतिगृह प्रवेशासाठी आलेले व येणारे अर्ज तात्काळ मंजूर करून विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.महाडीबीटी शिष्यवृत्ती वेळेत जमा करावी तसेच रखडलेली शिष्यवृत्ती तातडीने द्यावी.पंडित दीनदयाल योजनेतील मागील DBTची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात तात्काळ जमा करावी व लाभार्थी संख्या वाढवावी.वसतिगृह आणि पंडित दीनदयाल उपाध्याय योजनेसाठी स्वतंत्र ऑनलाइन संकेतस्थळ सुरू करावे.गडचिरोली आश्रमशाळेतील मृत्यूमुखी पडलेल्या मुलींच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १ कोटी मदत द्यावी व दोषींवर कठोर कारवाई करावी.आदिवासी आश्रमशाळेतील सेंट्रल किचन योजना बंद करावी.ई-स्कोड, प्रोजेक्ट आणि सहलींसाठी निधी व सुविधा वाढवाव्यात.आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृहांची क्षमता १,००० वरून २,००० करावी.पोलीस भरतीदरम्यान मृत्यू झालेल्या विकास प्रेमलाल मावस्कर यांच्या कुटुंबीयांना तात्काळ आर्थिक मदत द्यावी.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप यांनी विद्यार्थ्यांसोबत प्रत्यक्ष पायी चालत आंदोलनाला पाठिंबा दिला. परीक्षित दादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली चांदूर रेल्वे शहर काँग्रेस कमिटीने विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांच्या प्रवासादरम्यान चहा-नाश्ता व भोजनाची व्यवस्था केली.खा.बळवंत वानखडे यांनीही सातेफळ फाटा येथे विद्यार्थ्यांची भेट घेऊन आंदोलनाला पाठिंबा दिला. शासनाने आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्व न्याय्य मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा; अन्यथा विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी काँग्रेस पक्ष त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहील, असा इशारा यावेळी देण्यात आला.

संस्कार इंटरनॅशनल स्कूलला ब्रिटिश कौन्सिलची

'इंटरनॅशनल डायमेन्शन स्कूल' मान्यता प्राप्त..

अचलपूर/वार्ताहर

परतवाडा येथील संस्कार इंटरनॅशनल स्कूलने शिक्षण क्षेत्रात आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठत ब्रिटिश कौन्सिलकडून सन २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी 'इंटरनॅशनल डायमेन्शन स्कूल' ही प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त केली आहे. या उल्लेखनीय यशाचे औचित्य साधून शाळेच्या वतीने संस्था संचालक संजय चोबे, विनोद गडोदिया, मुकेश अग्रवाल, मुख्याध्यापिका प्रज्ञा आगवणे यांनी विशेष पत्रकार परिषद घेऊन हि माहिती दिली.ही मान्यता शाळेची आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण, जागतिक नागरिकत्व, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि देश-विदेशातील सहकार्याप्रती असलेली बांधिलकी निर्माण करणारी आहे. विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन व्यापक व्हावा, विविध संस्कृतींचे आकलन व्हावे आणि

जागतिक पातळीवर विचार करण्याची क्षमता विकसित व्हावी, यासाठी शाळेने राबविलेल्या विविध उपक्रमांची ही महत्त्वपूर्ण पावती मानली जात आहे.

याप्रसंगी शाळा व्यवस्थापनाने या यशाबद्दल आनंद व्यक्त करत शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे कौतुक केले. ही मान्यता केवळ एक सन्मान नसून विद्यार्थ्यांना आत्मविश्वासू, जबाबदार आणि जागतिक स्तरावर जागरूक नागरिक बनविण्याच्या शाळेच्या ध्येयाचे प्रतीक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.शाळेच्या वतीने आंतरराष्ट्रीय बंधुभाव, सांस्कृतिक देवाणघेवाण, विविध देशांच्या संस्कृतींची ओळख तसेच जागतिक समस्यांबाबत जनजागृती करणारे विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात आले आहेत. या उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना भौगोलिक सीमांच्या पलीकडे जाऊन व्यापक विचार करण्याची संधी मिळाली असून त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासालाही चालना मिळत आहे.

विद्यार्थी यती राठी, जियान पारेख, स्वराली बरडिया, श्लोक पोटे, वंश अग्रवाल, अदित्री देशमुख, हार्दिक गावंडे, मानस अग्रवाल, माही ठाकरे,अधीरा इंगळे, ओनीश अग्रवाल, तवीश बोंडे, इशान खान, सान्वी चौधरी, अन्विशा गिरी, आस्था तिवारी, सदावी मार्कोड, सावी कविटकर, आयु गावंडे, वंशिका अग्रवाल, अभय खवले, निधीश खापरे, आराध्या निभोकर, देवांशी महाजन, अर्णव वैराळे, निधी चंदेल, दक्षा अग्रवाल, अनुष्का घोम, अन्वेषा धोटे आणि अन्वी तांबी यांनी विविध उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत पत्रकारांना प्रभावी पणे माहिती दिली. ब्रिटिश कौन्सिलकडून मिळालेली सन २०२६ ते २०२९ या कालावधीची ही मान्यता संस्कार इंटरनॅशनल स्कूलच्या गुणवत्तापूर्ण व जागतिक दृष्टिकोन असलेल्या शिक्षणपद्धतीच्या प्रवासात महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. हि शाळा संस्था अध्यक्ष डॉ. कमल अग्रवाल व संचालकांच्या मार्गदर्शनात चालविल्या जाते. यावेळी समन्वयक मीना जळमकर व स्मिता कांचनपूरे, तसेच शिक्षिका सोनल गिरी आणि जयश्री मेटकर यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी, पालक व पत्रकार मंडळी उपस्थितीत होते .

सीताबाई संगई विद्यालयात क्रीडा स्पर्धांचा थरार

अंजनगाव सुर्जी/वार्ताहर

अंजनगाव सुर्जी येथील सीताबाई संगई हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात आणि क्रीडामय वातावरणात साजरा करण्यात आला.विद्यार्थ्यांमध्ये खेळाची गोडी निर्माण व्हावी, शारीरिक तंदुरुस्ती वाढावी तसेच संघभावना, शिस्त, नेतृत्वगुण आणि खिलाडूवृत्ती विकसित व्हावी या उद्देशाने या दिनाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य श्री. राकेश डोणगावकर होते. यावेळी पर्यवेक्षक डॉ. निलेश डाहाळे, ज्येष्ठ शिक्षक पराग चवरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शारीरिक शिक्षण शिक्षक विशाल भेलांडे यांनी केली. त्यांनी राष्ट्रीय क्रीडा दिनाचे महत्त्व विशद केले. 'विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासच नव्हे तर नियमित खेळ आणि व्यायामाला देखील आपल्या दैनंदिन जीवनात महत्त्वाचे स्थान द्यावे,' असे आवाहन त्यांनी यावेळी केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या जीवनकार्याला अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पारस फुलंबरकर, अमेय देवळे,अच्युतम लांजे, प्रसन्न घाटे व भावेश ढोले या विद्यार्थ्यांनी मेजर ध्यानचंद यांच्या थोर क्रीडा कारकीर्दीवर, देशासाठी दिलेल्या अतुलनीय योगदानावर आणि त्यांच्या असामान्य क्रीडाप्रतिभेवर प्रकाश टाकणारी भाषणे केली.अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्राचार्य राकेश डोणगावकर म्हणाले, 'शिक्षणाबरोबरच खेळाला विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात अनन्यसाधारण महत्त्व आहे.भाषणानंतर विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये व्हॉलीबॉल, खो-खो, कबड्डी, कॅरम, लंगडी, मल्लखांब, बॅडमिंटन आणि दोरीवरील उड्या अशा विविध देशी-विदेशी खेळांचा समावेश होता.

नारायणदास लड्ढा हायस्कूलमध्ये आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

अमरावती/का.प्र

श्री ब्रजलाल बियाणी शिक्षा समितीचे संस्थापक अध्यक्ष स्व. सेठ श्री. नारायणदासजी लड्ढा यांच्या जयंतीनिमित्त नारायणदास लड्ढा हायस्कूल, अमरावती येथे आंतरशालेय विद्यार्थी व शिक्षक वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. अमरावती शहरातील विविध शाळांमधील १५ विद्यार्थी व १५ शिक्षकांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री ब्रजलाल बियाणी शिक्षा समितीचे अध्यक्ष ओमप्रकाशजी लड्ढा होते. यावेळी शाळा समितीचे अध्यक्ष ॲड. अशोकजी राठी, प्रमुख अतिथी व सुप्रसिद्ध उद्योजक तसेच शाळेचे माजी विद्यार्थी भूषणजी बुब, ॲड. आशिषजी राठी, परीक्षक प्रा. गोकुल बजाज, कल्पना देशमुख आणि मुख्याध्यापिका सौ. सुषमा अ. माळवे उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन, दीपप्रज्वलन व स्व. नारायणदासजी लड्ढा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी रेवा राजेंद्र नागतोडे हिच्या विश्वविक्रमाचीही विशेष दखल घेऊन तिचा गौरव

करण्यात आला. रेवा हिने एका दिवसात विविध विषयांवरील ५१ क्रेयॉन चित्रे रंगवून आंतरराष्ट्रीय विश्वविक्रमाची नोंद केली आहे.

वक्तृत्व स्पर्धेतील विजेते विद्यार्थी गट : प्रथम - युगांती नितीन बुरघाटे (श्री शिवाजी बहुउद्देशीय माध्यमिक शाळा), द्वितीय – आराध्या प्रवीण वानखडे (श्री समर्थ विद्यालय), तृतीय – नेत्रा राजेंद्र ठोंबरे (शारदा विद्यालय), उत्तेजनार्थ – वंशिका किशोर पांडे (गोल्डन किड्स हायस्कूल).शिक्षक गट : प्रथम – विस्मय दिगंबर ठाकरे (श्री शिवाजी बहुउद्देशीय माध्यमिक शाळा), द्वितीय – डॉ. संदीप जुनघरे (विकास विद्यालय), तृतीय – कविता ललित लड्ढा (श्री गणेशदास राठी विद्यालय), उत्तेजनार्थ – आरती काकडे (तोमोय हायस्कूल).विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

प्रमुख अतिथी भूषणजी बुब यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत उद्योजकतेकडेही सकारात्मक दृष्टीने पाहावे, असे आवाहन केले. प्लास्टिक पुनर्वापरातून पर्यावरण संवर्धनासाठी योगदान देता येते, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. ॲड. अशोकजी राठी यांनी वक्तृत्व स्पर्धेचे विषय वर्तमान परिस्थितीशी सुसंगत असून विद्यार्थ्यांच्या वैचारिक जडणघडणीस उपयुक्त असल्याचे सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. हर्षा काशीकर व सौ. पौर्णिमा कुराडा यांनी केले. विद्यार्थ्यांनी स्व. नारायणदासजी लड्ढा यांच्या प्रतिमेची सुंदर स्केचेस साकारून त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

धारणी तालुक्यात अपघातांची मालिका

रस्त्यांवरील वाढलेली झाडी आणि दुर्लक्षामुळे वाढला धोका

धारणी/वार्ताहर

धारणी तालुक्यातील विविध प्रमुख व ग्रामीण रस्त्यांवर मागील काही महिन्यांपासून अपघातांची मालिका सुरू असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तालुक्यातील विविध मार्गांवर दररोज एक ते दोन, तर काही ठिकाणी दोन ते तीन दुचाकी व चारचाकी वाहनांचे अपघात घडत असल्याची माहिती नागरिकांकडून मिळत आहे. मागील दोन ते तीन महिन्यांपासून ही परिस्थिती अधिक गंभीर बनली असून, स्थानिक अंदाजानुसार या कालावधीत जवळपास ८० ते ९० लहान-मोठ्या दुर्घटना घडल्या असाव्यात.

भोकरवाडी–परतवाडा, धारणी–बैरागड, धारणी–कुटंगा, धारणी–राणेगाव आणि धारणी–ढाकणा आदी रस्त्यांवर अपघातांचे प्रमाण वाढल्याचे चित्र दिसून येत आहे.नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रस्त्यांच्या देखभालीसाठी पूर्वी काम करणारे मैल कुली सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या जागी नवीन कर्मचारी किंवा रोजंदारी कामगारांची नियुक्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे रस्त्यालगत वाढणारी झाडी-झुडपे, झाडांच्या फांद्या आणि इतर अडथळे वेळेवर हटविले जात नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे

पावसाळ्यात ही समस्या अधिक गंभीर बनते. डोंगराळ आणि वनक्षेत्रातून वाहून येणारे पावसाचे पाणी रस्त्यावर माती, गाळ आणि चिखल आणते. काही ठिकाणी रस्त्यावर घसरडा थर निर्माण होत असल्याने दुचाकी वाहनचालकांचे वाहनावरील नियंत्रण सुटते. नागमोडी वळण, घसरडा रस्ता आणि रस्त्यालगतची दाट झाडी या तिन्ही गोष्टी एकत्र आल्याने अनेक रस्ते सध्या अपघातप्रवण बनल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री कर्तव्यदक्ष मंत्री म्हणून ओळखले जातात. त्यामुळे त्यांनीही या वाढत्या दुर्घटनांची गंभीर दखल घेऊन संबंधित विभागांना तातडीच्या उपाययोजना करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. जिल्हाधिकारी यांनीही संबंधित बांधकाम विभागांची तातडीची बैठक घेऊन रस्त्यांवरील धोकादायक परिस्थिती दूर करण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

नागरिकांचा आता एकच प्रश्न आहे की, आणखी किती अपघात झाल्यानंतर आणि किती नागरिकांचे जीव धोक्यात आल्यानंतर प्रशासन जागे होणार? रस्त्यालगतची वाढलेली झाडी काढणे आणि नियमित देखभाल करणे हे काम वेळेत झाले, तर अनेक अपघात टाळता येऊ शकतात. आता सर्व संबंधित अधिकारी, जिल्हा प्रशासन आणि पालकमंत्री या गंभीर प्रश्नावर नेमक्या कोणत्या ठोस उपाययोजना करतात, याकडे संपूर्ण धारणी तालुक्याचे लक्ष लागले आहे.

राजकीय दाव्यांचे 'पितळ उघडे': 'छात्रों की गूंज' ते 'झूट की गुंज'

आपण जे काही बोलतो तेच अंतिम सत्य आहे आणि त्यावर कुणीही प्रतिदावा करणार नाही, या अविर्भावात जगणाऱ्यांसाठी 'पितळ उघडे पडणे' हा शब्दप्रयोग अगदी योग्य ठरतो. एखादी व्यक्ती आपल्याकडे अथांग ज्ञान, बुद्धिमत्ता किंवा कौशल्याचा साठा असल्याचा आव आणते, तेव्हा ती समाजात कौतुकास पात्र ठरण्याचा प्रयत्न करत असते. परंतु, जेव्हा एखाद्या चर्चेत किंवा व्यासपीठावर तज्ज्ञांसमोर तिचे वास्तव समोर येते, तेव्हा तिचा फुगा क्षणांत फुटतो.हे केवळ वैयक्तिक संवादापुरते मर्यादित राहिलेले नाही; तर आजच्या डिजिटल आणि माहितीच्या युगात राजकारणातील दावे आणि प्रतिदाव्यांच्या खेळातही याचे प्रत्यंतर वारंवार येत आहे.

गेल्या काही वर्षांत भारतीय राजकारणात एक नवीन राजकीय तंत्र मूळ धरताना दिसते.'खोटे बोला, रेटून बोला आणि सातत्याने बोला!' जर एखाद्या दाव्याला तात्काळ आणि प्रभावी प्रतिदावा मिळाला नाही, तर लोक हळूहळू त्या असत्यालाच सत्य मानू लागतात, असा या रणनीतीमागचा मुख्य उद्देश असतो.

नीट परीक्षांमधील कथित गैरव्यवहारांच्या पार्श्वभूमीवर आणि दिल्लीतील जंतर-मंतर येथील आंदोलनांनंतर देशातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सुमारे ३० टक्क्यांहून तरुण लोकसंख्या असलेल्या 'जेन झी' या नव्या मतदारांना आकर्षित करण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांची चढाओढ सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिल्ली, कोटा आणि पुणे यांसारख्या प्रमुख शैक्षणिक हबमध्ये 'छात्रों की गूंज' या संवाद मोहिमेचे आयोजन केले होते. केंद्र सरकारवर टीका करताना त्यांनी विविध आकडेवारी आणि संदर्भांचा भडीमार त्यांनी केला आहे. परंतु, राजकीय नेत्यांनी जाहीर राजकारणात कोणताही दावा करताना त्याला तितकाच सडेतोड प्रतिदावा येऊ शकतो, याचे भान ठेवणे आवश्यक असते.

राहुल गांधी यांच्या मोहिमेतील दाव्यांची सत्यता तपासण्यासाठी तामिळनाडूतील 'आयआयटी' च्या एका विद्यार्थिनीने 'झूट की गुंज' या नावाने एक डिजिटल पोर्टल सुरू केले. 'फोर रॅलीज, फोर्टी क्लेम्स, वन आन्सर की' (चार सभा, ४० दावे आणि एक उत्तरपत्रिका) या शीर्षकाखाली या पोर्टलने राहुल गांधी यांच्या गुंज भाषणांचे तथ्य-परीक्षण समोर आणले.

या विश्लेषणात मांडलेले निष्कर्ष अत्यंत धक्कादायक आहेत. राहुल गांधी यांनी केलेल्या ४० प्रमुख दाव्यांपैकी २९ दावे पूर्णपणे चुकीचे तर ११ दावे अत्यंत दिशाभूल करणारे असल्याचा दावा या पोर्टलवर करण्यात आला आहे. हे निष्कर्ष हवेत न मांडता, Periodic Labour Force Survey (PLFS) या सरकारी रोजगार अहवालासह एकूण १३४ अधिकृत स्त्रोतांचा आधार घेऊन हे विश्लेषण तयार करण्यात आल्याचे स्पष्ट केले गेले.

एकीकडे 'कॅम्ब्रोच जनता पार्टी'सारख्या उपरोधिक डिजिटल आंदोलनांमधून तरुणाईचा राजकारणाकडे पाहण्याचा वेगळा दृष्टिकोन समोर येत असताना, दुसरीकडे 'झूट की गुंज' सारख्या मोहिमांमुळे राजकीय नेत्यांच्या अभ्यासहीन दाव्यांचे पितळ उघडे पडत आहे.

आजचा तरुण हा केवळ घोषणांवर किंवा भावनिक आवाहनांवर विश्वास ठेवणारा राहिलेला नाही. तंत्रज्ञानाच्या या युगात, नेत्यांनी व्यासपीठावरून सांगितलेली प्रत्येक आकडेवारी काही सेकंदांत मोबाईलच्या एका क्लिकवर तपासली जाऊ शकते. राजकीय नेत्यांना वाटत असेल की ते व्यासपीठावरून काहीही बोलून निसटून जाऊ शकतात, तर तो त्यांचा गैरसमज ठरत आहे.

ज्ञान, बुद्धिमत्ता आणि अभ्यासाचा आव आणून जेव्हा नेते मंडळी अर्धवट माहिती मांडतात, तेव्हा 'झूट की गुंज' सारखी माध्यमे त्यांच्या विधानांची पोलखोल करतात. अखेर, सत्याला पुराव्याची गरज असते आणि असत्याचा बुरखा फार काळ टिकत नाही. व्यासपीठावर आव आणणे सोपे असते, पण तथ्यांच्या कसोटीवर उतरणे कठीण; आणि जिथे तथ्ये अपुरी पडतात, तिथे 'पितळ उघडे पडल्याशिवाय' राहत नाही!

- अविनाश देशपांडे

भाषासक्तीने भाषाप्रेम वाढेल, की भाषाभेद ?

भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती व्यक्तीच्या अस्मितेची आणि संस्कृतीची प्रतीक असते. भारतासारख्या बहुभाषिक देशात भाषेचा विषय अत्यंत संवेदनशील मानला जातो. विशेषतः जेव्हा एखादी भाषा 'सक्तीने' शिकवली जाते, तेव्हा अनेक प्रश्न उभे राहतात - त्या भाषेचे प्रेम वाढेल का? की उलट भाषाभेद आणि मनभेद? प्रत्येक व्यक्ती आपल्या मातृभाषेशी भावनिकदृष्ट्या जोडलेली असते. ती भाषा त्याच्या आयुष्याचे अनेक पैलू व्यापते - घरातील लहानसे बोलणे, पहिली कविता, पहिले पुस्तक आणि भावनांचे सूक्ष्म रंग. त्यामुळेच कोणतीही दुसरी भाषा शिकवताना ती आदर आणि समजुतीने शिकवली गेली पाहिजे, नव्हे तर तिचे सौंदर्य उलगडून दाखवले पाहिजे.

भारतात हिंदी ही राजभाषा आहे; परंतु ती राष्ट्रभाषा नाही. भारतीय संविधान, कलम ३४३ नुसार, देवनागरी लिपीतील हिंदी ही भारताची अधिकृत भाषा आहे; परंतु याचा अर्थ असा नाही की ती राष्ट्रभाषा आहे, असे राज्यघटनेचे अभ्यासक सांगतात. ही बाब अनेकदा गृहीत धरली जाते. हिंदीचा प्रचार-प्रसार सरकारी पातळीवर सतत चालतो, पण अलीकडे काही निर्णयांनी वादाच्या ठिणग्या पेटल्या. अलीकडील उदाहरण : २०२५ च्या सुरुवातीलाच केंद्र सरकारच्या एका समितीने 'हिंदीला संपूर्ण देशात प्राथमिक शिक्षणाची भाषा बनवावी' अशी शिफारस केली. तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये हिंदीला प्राधान्य देण्याच्या प्रस्तावांमुळे दक्षिण भारत, ईशान्य भारतातील भाषिक गटांत अस्वस्थता वाढली. तामिळनाडू, केरळ, कर्नाटकसारख्या राज्यांत 'हिंदी सक्तीविरोधी' आंदोलने उभारली गेली. सोशल मीडियावर StopHindiImposition हा हॅशटॅग ट्रेंड झाला. या साऱ्याचा अर्थ असा नव्हता की लोकांना हिंदी नको आहे, तर त्यांच्या मातृभाषेच्या हक्कावर गदा येते आहे असे त्यांना वाटू लागले.

सक्ती की प्रेम?- भाषा सक्तीने शिकवली की ती 'ओझे' वाटते, पण प्रेमाने शिकवली गेली की 'संपत्ती' वाटते. जर हिंदी भाषेचा प्रचार चित्रपट, गाणी, साहित्य, क्रीडा यांच्याद्वारे केला गेला, तर ती लोके आपोआप आत्मसात करतात - हे बॉलिवूडने अनेक दशकांत दाखवून दिले आहे. पण तीच भाषा जेव्हा 'शिका किंवा पर्याय नाही' या दृष्टिकोनातून शिकवली जाते, तेव्हा ती दडपणाची भाषा होते.

भाषाभेद कसा निर्माण होतो?- जेव्हा एका भाषेला दुसऱ्यांपेक्षा श्रेष्ठ ठरवले जाते किंवा तिचा आग्रह धरला जातो, तेव्हा इतर भाषिक लोक असुरक्षित वाटू लागतात. त्यांना आपली मातृभाषा, आपली संस्कृती धोक्यात आली आहे असे वाटू लागते आणि अशा मानसिकतेतून निर्माण होतो 'भाषाभेद' जो समाजाच्या ऐक्याला बाधा पोहोचवतो. भाषा श्रेष्ठ-हीनतेच्या दृष्टिकोनातून पाहिली गेली की, भाषाभेद सुरू होतो. मग 'आपण मागे पडतोय' ही भावना निर्माण होते. अशा वेळी एकोपा तुटतो आणि समाजात तणाव वाढतो. एक भाषा दुसऱ्यावर थोपवल्याने संवाद वाढत नाही, उलट संवाद तुटतो. भाषा शिकवताना सक्ती न करता तिचे सौंदर्य, उपयोग आणि व्यापकता दाखवून देणे आवश्यक आहे. शाळांमध्ये बहुभाषिकतेला प्रोत्साहन द्यावे, विविध भाषांमधील साहित्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावे. संवादाच्या माध्यमातून एकमेकांच्या भाषेचा सन्मान शिकवला पाहिजे. भाषासक्ती नको भाषाभक्ती असावी. भाषा ही मनाच्या गाभ्यातून शिकली जाते. सक्तीने ती केवळ तोंडी राहते. भारतासारख्या विविधतेच्या देशात, भाषा केवळ शिकवण्याची गोष्ट नाही ती जपण्याची आणि सन्मानाने स्वीकारण्याची गोष्ट आहे. भाषा टिकते आदराने, वाढते प्रेमाने आणि संपते सक्तीने.

- निशा वर्तक

हिंदी महासागरातील खोल बुडी



सोमनाथपासून ते कन्याकुमारीपर्यंत आणि चेन्नईपासून ते अंदमानपर्यंत विविध समुद्रकिनाऱ्यांवर आजवर उभा राहिलो. 'आसिंन्धुसिन्धुपर्यन्ता यस्य भारतभूमिका' ही स्वा.सावरकरांची ओळ आठवली नाही असे एकदाही झाले नाही. मातृभू आणि पितृभू असलेल्या भारताला पुण्यभू बनविण्यात तिन्ही दिशांना असलेल्या या सागरांचा मोठा वाटा आहे. संजीव सन्याल यांचे 'दि ओशन ऑफ चर्न' यांचे पुस्तक समुद्रांवरच्या वर्चस्वामुळे पुण्यभू बनत गेलेल्या, समृद्ध झालेल्या आपल्या भारताची कथा आहे. हिंदी महासागराने घडविलेल्या मानवी इतिहासाची ही कथा आहे.

आफ्रिकेच्या किनारपट्टीपासून ते ओमानपर्यंत आणि अंदमानपासून आग्नेयेकडील बेटांसह चीन, जपानपर्यंत समुद्राच्या साथीने वावरणाऱ्या मानवसमुहांची ही कथा आहे. देशोदेशीचे व्यापारी, बदलणारे तंत्रज्ञान, अर्थकारण आणि त्यामुळे बदललेले सत्ताकारण, समुद्री प्रवासाचे ताणेबाणे, उदयास आलेल्या आणि अस्तंगत होत गेलेल्या सत्ता या सगळ्यांचा साक्षीदार हा हिंदी महासागर आहे.

हजारो वर्षांपूर्वी समुद्रात झालेली स्थित्यंतरे, सरकलेले भूभाग, पर्यावरणीय बदल आणि मानवी आकांक्षा यामुळे माणसाची स्थित्यंतरे सुरू झाली. पुस्तकाची कथा येथून सुरू होते आणि दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस समुद्रावर राज्य करण्याच्या इंग्रजी साम्राज्याच्या अस्तापर्यंत येऊन थांबते. या दरम्यान, आपल्याला शतकानुशतके समुद्र ओलांडून जाणारे हिंदू व्यापारी, राज्यकर्ते भेटतात. त्यांनी व्यापारातून कमावलेली प्रचंड संपत्ती, आग्नेय आशियात निर्माण केलेले राजकीय आणि सांस्कृतिक साम्राज्य यांची विस्तृत माहिती मिळत जाते. 'भारतात समुद्र ओलांडून जाणे निषिद्ध होते' हे वाक्य अत्यंत सरधोपटपणे वापरले जाते. मात्र, भारतीयांनी समुद्री व्यापार कैक शतके अत्यंत प्रभावीपणे केला, याचे दाखले पानोपानी हे पुस्तक देते. पल्लव, खारवेल, चोल, पांड्य, डचांना दे माय ठरणीठाय करणारा त्रावणकोरचा मार्तंड वर्मा, हे आणि असे असंख्य उदाहरणं आपल्याला नवी माहिती देत जातात. जी बाब लढाईंची, तीच व्यापारांची, मुत्सद्देगिरीची, तंत्रज्ञानाची आणि भारतीय बुद्धिमत्तेची. सन्याल अत्यंत रंजकपणे ही गोष्ट सांगतात.

पुस्तकात सगळ्या संस्कृती डोकावत असल्या तरी पुस्तकाची खरी चव ही भारतीय मसाल्यांचीच आहे. पण, ते केवळ भारताबद्दलच बोलते असे नाही. युरोप, अरब, इंडोनेशियासहित आग्नेयेकडची बेटे, चीन, जपान या सगळ्यांचे असंख्य ऐतिहासिक संदर्भ या पुस्तकात येतात. तमिळ प्रभाव असलेली ब्राह्मी लिपी आग्नेयेकडच्या अनेक देशांनी त्यांच्या भाषेकरिता स्वीकारला हा संदर्भ भारतीयांच्या बहुमुखी प्रभावाचे जागते उदाहरण. मद्रासचा इंग्लिश गव्हर्नर एलिहु येल याला भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली इस्ट इंडिया कंपनीने काढून टाकले होते. याच भ्रष्टाचाराच्या पैशातून त्याने अमेरिकेतील प्रसिद्ध विद्यापीठाला प्रचंड पैसा दिला. त्याचेच नाव या विद्यापीठाला मिळाले, ते विद्यापीठ म्हणजे प्रख्यात 'येल युनिव्हर्सिटी'. हिंदी महासागरातील पैसा कुठवर पोहोचला, ते बघा!

वेळ आणि समुद्रातीत वातावरण कधीही बदलू शकते. भारतीय महासागराने काळाच्या या प्रचंड तुकड्यात अनेकांची वेळ बदलताना पाहिली आहे. यानंतर, ज्या ज्यावेळी समुद्राच्या काठावर उभे राहील त्या त्या वेळी संजीव सन्याल यांनी केलेले हे समुद्रमंथन सातत्याने आठवत राहील. भारतीय समुद्राकडे अधिक डोळसपणे बघता येईल.

मंदार मोरोणे,
नागपूर
७७७५०९५९८६

क्रीडा क्षेत्राचा दीपस्तंभ सुधीर मोरे

'खेळाडू हाच माझा केंद्रबिंदू' केवळ हे ब्रीदवाक्य न ठेवता, आपल्या ३१ वर्षांच्या प्रदीर्घ शासकीय सेवेत ते प्रत्यक्षात उतरवणारे व्यक्तिमत्त्व म्हणजेच क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्याचे सहसंचालक अमरावतीचे सुपुत्र सुधीर मोरे. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी ते आपल्या पदावरून सेवानिवृत्त होत आहेत. एक मित्र आणि क्रीडा क्षेत्रातील त्यांचा सहकारी म्हणून त्यांच्या या थक्क करणाऱ्या जीवनप्रवासाचा धावता आढावा घेणारा हा लेख...

सुधीर सरांचा जीवनप्रवास अत्यंत खडतर आणि संघर्षातून आकाराला आहे. प्रसिद्ध स्वातंत्र्यसंग्राम सैनिक भाऊरावजी आणि सुशीलाबाई मोरे यांच्या पोटी जन्मलेल्या सात भावंडांमध्ये सुधीर हे सर्वात लहान. घरातूनच देशसेवा आणि शिस्तीचे बाळकडू मिळालेले असले, तरी संघर्ष आणि परिस्थितीशी दोन हात करत त्यांना पुढे जावे लागले.

अमरावतीच्या ऐतिहासिक हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे सुधीर सरांच्या जीवनात सर्वोच्च स्थान आहे. त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाची जडणघडण याच संस्थेत झाली. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांना पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, प्रा.वसंत हरणे, स्वर्गीय डॉ.सुरेश देशपांडे, डॉ. विजय वैद्य आणि स्वर्गीय वालिया यांसारख्या महर्षींचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या दिग्गजांच्या छायेत सुधीर यांच्यातील खेळाडू आणि संघटक घडत गेला.

सुधीर मोरे हे जिम्नॅस्टिक खेळाचे अत्यंत उत्कृष्ट खेळाडू होते. त्यांनी आपल्या कौशल्याच्या जोरावर अमरावती विद्यापीठ आणि महाराष्ट्र राज्याचे जिम्नॅस्टिकमध्ये अनेकदा प्रतिनिधित्व केले. खेळातील हीच आवड त्यांना पुढे पटियाला (पंजाब) येथे घेऊन गेली, जिथून त्यांनी क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च मानली जाणारी 'एन.आय.एस.' (NIS) कोचिंग पदविका अत्यंत यशस्वीपणे पूर्ण केली. व्यायाम शाळेमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेत असताना क्रीडा प्रशिक्षक म्हणून त्यांनी भूमिका निभावली. या काळात त्यांनी अनेक राष्ट्रीय दर्जाचे जिम्नॅस्टिक खेळाडू घडविले. एक हाडाचा प्रशिक्षक म्हणून खेळाडू करता जे जे करता येईल ते त्यांनी केले.

१९९५ मध्ये त्यांची शासकीय सेवेत जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणून नांदेड येथे पहिली नियुक्ती झाली. त्यानंतर नागपूर अकोला,वाशिम,धुळे, नाशिक, बुलढाणा अशा विविध जिल्ह्यांमध्ये त्यांनी काम केले. ते ज्या जिल्ह्यामध्ये गेले, तिथे त्यांनी 'खेळाडू केंद्रित' काम केले. खेळाडूंना चांगल्या सुविधा मिळाल्या पाहिजेत, या ध्यासातून त्यांनी अकोला येथील भव्य जिल्हा स्टेडियम, बुलढाणा येथील स्टेडियम आणि नाशिक येथील विभागीय क्रीडा संकुलाची उभारणी करण्यात महत्त्वाचे योगदान दिले. ही क्रीडा संकुले आज हजारो खेळाडू घडवत आहेत.

सुधीर मोरे सरांची ख्याती केवळ राज्यापुरती मर्यादित राहिली नाही. त्यांनी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये एक सक्षम आणि अनुभवी अधिकारी म्हणून मोलाचे योगदान दिले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे,अनेक स्पर्धा यशस्वी करत असताना त्यांनी कधीही स्वतःच्या प्रसिद्धीची हाव धरली नाही. अनेकदा आपला चेहरा पाठीमागे ठेवून, प्रसिद्धीच्या झोतात न येता, त्यांनी पडद्यामागून अनेक स्पर्धांना आणि खेळाडूंना खंबीर पाठबळ दिले. कोणतीही स्पर्धा निर्विघ्नपणे पार पडणे आणि खेळाडूंचा गौरव होणे यातच त्यांना खरा आनंद मिळायचा. त्यांच्या सहसंचालक पदाच्या कार्यकाळामध्ये महाराष्ट्र राज्य शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राच्या संघांनी विविध खेळांमध्ये प्राविण्य प्राप्त केलेले आहे.

आपल्या कामातील तत्परता आणि खेळाडूंविषयीची तळमळ यांमुळे त्यांनी उपसंचालक आणि त्यानंतर सहसंचालक या वरिष्ठ पदांपर्यंत मजल मारली. संपूर्ण महाराष्ट्रात एक शिस्तप्रिय, पारदर्शक आणि उत्कृष्ट प्रशासक म्हणून त्यांची मोठी ख्याती आहे. 'आपण सर्वजण खेळाडूंसाठी काम करतो, त्यामुळे खेळाडूला त्रास होता कामा नये,' ही त्यांची भूमिका असायची. क्रीडा क्षेत्रातील सर्व घटकांना सोबत घेऊन त्यांनी राज्यात क्रीडा संस्कृती वाढवण्यासाठी मोठे योगदान दिले. ऑलिंपिक मध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी जास्तीत जास्त पदके जिंकावीत यासाठी राज्य सरकारने सुरू केलेल्या मिशन लक्षवेध योजनेच्या अंमलबजावणीत सुधीर मोरे यांची महत्त्वाची भूमिका आहे. त्यांच्या कारकीर्दीत महाराष्ट्राला राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद तसेच खेलो इंडिया स्पर्धेमध्ये सुद्धा सर्वसाधारण विजेतेपद मिळालेले आहे.

एक अधिकारी म्हणून ते जितके कडक होते, तितकेच मित्र आणि कुटुंबासाठी ते अत्यंत संवेदनशील आणि धावून जाणारे आहेत. अनेक मित्रांना त्यांनी अडचणीच्या काळात, वेळप्रसंगी पडद्यामागे राहून मोठी मदत केली आहे. कामाच्या व्यस्ततेतही त्यांनी कौटुंबिक आणि सामाजिक जबाबदाऱ्या नेहमीच हसतमुखाने पार पाडल्या.३१ ऑगस्ट रोजी सुधीर मोरे सर शासकीय सेवेतून निवृत्त होत असले, तरी क्रीडा क्षेत्राशी असलेली त्यांची नाळ कधीच तुटू शकत नाही. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या च्या संस्कारातून तयार झालेला हा हिरा यापुढेही नव्या पिढीला मार्गदर्शक ठरत राहील. त्यांना पुढील भावी आयुष्यासाठी आणि आरोग्यासाठी मनापासून हार्दिक शुभेच्छा!

प्राचार्य डॉ सुभाष प्र गावंडे
श्री. शिवाजी शारीरिक शिक्षण
महाविद्यालय, अमरावती

भटक्या-विमुक्तांच्या मुक्तीपासून सन्मानाच्या वाटचालीपर्यंत

३१ ऑगस्ट हा दिवस भटके-विमुक्त समाजाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा आणि भावनिक दिवस आहे. हा केवळ एखादा स्मृतिदिन नाही, तर अन्याय, कलंक, उपेक्षा आणि सामाजिक बहिष्काराच्या दीर्घ इतिहासातून स्वाभिमान, समानता आणि मानवी प्रतिष्ठेकडे वाटचाल करण्याचे प्रतीक आहे. महाराष्ट्र शासनाने ३१ ऑगस्ट हा दिवस 'भटके विमुक्त दिवस' म्हणून साजरा करण्यास २०२५ मध्ये अधिकृत मान्यता दिली. त्यामुळे हा दिवस साजरा करताना केवळ औपचारिक कार्यक्रम न करता भटके-विमुक्त समाजाच्या ऐतिहासिक वेदना, वर्तमानातील प्रश्न आणि भविष्यातील संधी यांचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

भारतीय समाजरचनेत भटक्या आणि विमुक्त जमातींचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. उपजीविकेच्या पारंपरिक साधनांनुसार, जीवनपद्धतीनुसार आणि भौगोलिक परिस्थितीनुसार अनेक समूहांनी भटकंतीचे जीवन स्वीकारले. काही समूह पारंपरिक कला, लोककला, पशुपालन, हस्तकला, मनोरंजनाचे विविध प्रकार, औषधी वनस्पतींचे ज्ञान, लघु व्यापार, लोहारकाम, दगडकाम, बांधकामाशी संबंधित कौशल्ये किंवा इतर पारंपरिक व्यवसायांवर अवलंबून होते. स्थिर गावव्यवस्थेच्या चौकटीबाहेर राहणाऱ्या या समूहांनी आपल्या ज्ञानाच्या आणि कौशल्याच्या बळावर समाजजीवनात महत्त्वाचे योगदान दिले. मात्र स्थिर वस्ती, जमीन आणि पारंपरिक सामाजिक संस्थांच्या अभावामुळे त्यांना सामाजिक सुरक्षेपासून आणि संस्थात्मक संधींपासून मोठ्या प्रमाणावर वंचित राहावे लागले.

स्वातंत्र्यानंतर भारतीय लोकशाहीसमोर या ऐतिहासिक अन्यायाचे निराकरण करण्याचे आव्हान होते. ३१ ऑगस्ट १९५२ रोजी ब्रिटिशकालीन 'क्रिमिनल ट्राइब्ज ॲक्ट-१८७१' रद्द करण्यात आला आणि त्या कायद्याच्या कक्षेत असलेल्या समुदायांना 'विमुक्त' म्हणून ओळख मिळाली. त्यामुळे ३१ ऑगस्ट हा दिवस या समाजाच्या दृष्टीने एका ऐतिहासिक बंधनातून मुक्ततेचे

प्रतीक ठरला. आज संविधानिक मूल्ये भटके-विमुक्त समाजाच्या प्रश्नांकडे पाहण्यासाठी आपल्याला महत्त्वाची दिशा देतात. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य आणि न्यायाची हमी दिली आहे. त्यामुळे जन्म, जात, जीवनपद्धती किंवा सामाजिक पार्श्वभूमीच्या आधारावर कोणत्याही व्यक्तीकडे संशयाने पाहणे संविधानाच्या समतेच्या भावनेला विरोध करणारे आहे. भटके-विमुक्त समाजाचा प्रश्न हा केवळ एखाद्या विशिष्ट समाजघटकाचा प्रश्न नसून भारतीय लोकशाहीच्या समावेशकतेची कसोटी आहे.

महाराष्ट्र शासनाने ३१ ऑगस्ट हा दिवस अधिकृतपणे 'भटके विमुक्त दिवस' म्हणून मान्य केल्यामुळे या प्रश्नांना नव्याने सामाजिक आणि प्रशासकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. परंतु कोणताही स्मृतिदिन तेव्हाच अर्थपूर्ण ठरतो, जेव्हा त्या निमित्ताने वास्तवातील प्रश्नांवर ठोस कृती होते. कार्यक्रम, भाषणे आणि गौरव सोहळे आवश्यक असले तरी त्यापलीकडे जाऊन शिक्षण, निवास, रोजगार, आरोग्य, कागदपत्रे आणि सामाजिक सुरक्षा या प्रश्नांवर परिणामकारक उपाययोजना होणे अधिक महत्त्वाचे आहे.विशेषतः नव्या पिढीच्या युवकांना या समाजाच्या प्रश्नांशी जोडणे महत्त्वाचे आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण, कौशल्यविकास, उद्योजकता आणि बाजारपेठेपर्यंत पोहोचण्याच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. योग्य प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळाल्यास भटक्या-विमुक्त समाजातील युवक केवळ रोजगार शोधणारे नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे उद्योजक बनू शकतात. पारंपरिक कौशल्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिल्यास सांस्कृतिक वारसा आणि आर्थिक विकास यांची सांगड घालता येऊ शकते.

भटक्या-विमुक्त समाजाची कहाणी ही केवळ एका समाजाची कहाणी नाही; ती भारतीय लोकशाहीच्या सामाजिक न्यायाच्या प्रवासाची कहाणी आहे. ३१ ऑगस्ट १९५२ रोजी एका अन्यायकारक कायद्याची समाप्ती झाली; आता ३१ ऑगस्ट हा दिवस सामाजिक पूर्वग्रह, भेदभाव आणि वंचिततेच्या अदृश्य भिंती मोडण्याच्या नव्या संकल्पाचा दिवस झाला पाहिजे. कायद्याने दिलेली मुक्ती सामाजिक सन्मानात आणि आर्थिक स्वावलंबनात रूपांतरित झाली, तरच 'विमुक्त' ही संज्ञा केवळ इतिहासाची आठवण न राहता वर्तमानाची जिवंत वास्तवता बनेल. म्हणूनच भटके-विमुक्त दिनाचा संदेश स्पष्ट आहे की मुक्ती केवळ बंधनांतून बाहेर पडण्यात नाही; तर समान संधी, सन्मान, स्वाभिमान आणि न्यायासह समाजाच्या मुख्य प्रवाहात प्रतिष्ठेने उभे राहण्यात आहे.

- डॉ. राजेंद्र बगाटे

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सबब

एक कोटींचे नूतनीकरण अन पुन्हा गाजर गवताचा 'दरबार'!

जिजाऊ सभागृहाची दुरवस्था ; सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखभालीचा बोजवारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

तब्बल एक कोटी रुपये खर्च करून नूतनीकरण करण्यात आलेल्या राजमाता जिजाऊ सभागृहाची अवस्था पुन्हा जैसे थे होण्याच्या मार्गावर आहे. सभागृहाच्या परिसरात झाडे-झुडपे आणि गाजर गवताने डोके वर काढले असून, स्वच्छता व नियमित देखभालीचा पूर्णपणे अभाव असल्याचे चित्र आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून वास्तूला नवसंजीवनी द्यायची आणि काम पूर्ण झाल्यानंतर तिच्याकडे ढुंकूनही पाहायचे नाही, असा कारभार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरू असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक तथा गटनेते निलेश देव यांनी केला आहे.

नूतनीकरणासाठी निधी खर्च झाला, काम झाले; मात्र देखभाल कोण करणार, याचे उत्तर प्रशासनाकडे नाही. त्यामुळे शासनाचा पैसा खर्च करून उभारलेल्या वास्तूची अवस्था पुन्हा दयनीय होणार असेल, तर या नूतनीकरणाचा नेमका उपयोग काय, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

राजमाता जिजाऊ सभागृहाच्या दुरवस्थेविरोधात वंचित बहुजन आघाडीने यापूर्वीही आवाज उठविला होता. दोन वर्षांपूर्वी राजमाता जिजाऊ जयंतीच्या दिवशी प्रा. अंजली आंबेडकर आणि युवा नेते सुजात आंबेडकर यांनी हातात झाडू घेऊन परिसरातील स्वच्छतेचा मुद्दा ऐरणीवर आणला होता. यानंतर २०२४ मध्ये शिवजयंतीच्या दिवशी ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते सुमारे एक कोटी रुपयांच्या निधीतून सभागृहाच्या नूतनीकरणाच्या कामाचे भूमिपूजन झाले. सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर सभागृहाच्या नूतनीकरणाला गती मिळाली आणि वास्तूला नवसंजीवनी मिळाली.

मात्र, नूतनीकरणाला काही काळ उलटत नाही तोच परिसरात पुन्हा गाजर गवत, झाडे-झुडपे आणि अस्वच्छतेने पाय पसरायला सुरुवात केली आहे. त्यामुळे नूतनीकरणाचा गाजावाजा करणाऱ्या यंत्रणेने देखभालीचे काय नियोजन केले होते, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

जिजाऊंच्या नावाची वास्तू 'प्रेरणास्थळ' होणार की गाजर गवताचे कुरण?

राजमाता जिजाऊंच्या नावाने असलेली ही वास्तू केवळ चार भिंतींचे सभागृह न राहता इतिहास, संस्कार, स्त्रीशक्ती आणि स्वराज्याच्या विचारांचे प्रेरणास्थळ बनणे अपेक्षित आहे. मात्र, एका बाजूला लाखो-कोट्यवधींचा निधी खर्च करून नूतनीकरण करायचे आणि दुसऱ्या बाजूला त्याच वास्तूच्या परिसरात गाजर गवत व झाडे-झुडपे वाढू द्यायची, हा प्रकार शासनाच्या निधीबरोबरच ऐतिहासिक वारशाचीही अवहेलना करणारा असल्याची संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

२८ ऑक्टोबरचे पत्रही धूळ खात?

सभागृहाच्या भवितव्याबाबत २८ ऑक्टोबर रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांना सविस्तर पत्र देण्यात आले होते. राजमाता जिजाऊ सभागृहाचे रूपांतर 'राजमाता जिजाऊ संग्रहालय व वास्तुशिल्प संग्रहालय' करण्यात यावे, अशी मागणी या पत्रातून करण्यात आली होती. मात्र, या मागणीची अद्याप अपेक्षित दखल घेण्यात आलेली नसल्याचे निलेश देव यांनी म्हटले आहे. सभागृहाशेजारी नवीन जिल्हा न्यायालयाची इमारत उभी राहत आहे. त्यामुळे भविष्यात मोठ्या आवाजातील कार्यक्रमांवर मर्यादा येण्याची शक्यता आहे. अकोला शहरात संविधान सभागृह, जिल्हा नियोजन भवन यांसारख्या प्रशासकीय सभागृहांची उपलब्धता असताना जिजाऊ सभागृहाचा उपयोग अधिक व्यापक आणि ऐतिहासिक दृष्टिकोनातून व्हावा, अशी भूमिका देव यांनी मांडली आहे. अभियंता प्रशिक्षण केंद्र अन्यत्र हलवून या वास्तूचे कायमस्वरूपी संग्रहालयात रूपांतर करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

'दुरुस्ती करा, अन्यथा सभागृह ताब्यात घेऊ!'

'एक कोटी रुपये खर्च करून नूतनीकरण केलेल्या राजमाता जिजाऊ सभागृहाची अवस्था पुन्हा खराब होऊ देणार नाही. परिसरात झाडे-झुडपे आणि गाजर गवत वाढत असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाला पाहणी करण्याचीही फुरसत नाही, हे दुर्दैवी आहे. विभागाने तातडीने पाहणी करून स्वच्छता, देखभाल आणि आवश्यक दुरुस्तीची कामे करावीत. अन्यथा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सभागृह ताब्यात घेऊन तेथे 'आई जिजाऊ'च्या नावाने कायमस्वरूपी ज्योत प्रज्वलित करण्यात येईल. सभागृहाच्या देखभाल-दुरुस्तीसाठी वंचित बहुजन आघाडी पुढाकार घेईल,' असा थेट इशारा निलेश देव यांनी दिला आहे.

जुगार अड्ड्यावर छापा; आठ जण ताब्यात

■ प्रतिनिधी | अकोला ■

'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत अवैध धंद्यांविरुद्ध कारवाईची मोहीम सुरू असताना स्थानिक गुन्हे शाखेने अकोट फाईल पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुगार अड्ड्यावर छापा टाकून आठ जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रक्कम व पाच मोबाईल असा एकूण १ लाख २३ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अकोला जिल्ह्यातील अवैध व्यवसायांविरुद्ध प्रभावी कारवाई करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांना दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जुगारविरोधी कारवाईसाठी विशेष पथक गठित केले होते. दरम्यान, पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे अकोला शहरातील अकोट फाईल परिसरातील १८ नंबर शाळेजवळ छापा टाकण्यात आला. यावेळी जुगार खेळत असल्याच्या संशयावरून जावेद शाह लतीफ शाह, मोहम्मद सिद्दीकी मो. इशाख, राज अभिमन्यू वाळसे, विकास मनोहर लांजेवार, गणेश अशोक देशमुख, सैयद शाहरूख सै. सलीम, सुनील देविदास गवई आणि जमीर शहा इस्माईल शाह (सर्व रा. अकोट फाईल, अकोला) यांना ताब्यात घेण्यात आले.

१ लाख २३ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

कारवाईदरम्यान आरोपींकडून ४८ हजार ८२० रुपये रोख आणि विविध कंपन्यांचे पाच मोबाईल फोन, अंदाजे किंमत ७५ हजार रुपये, असा एकूण १ लाख २३ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ताब्यात घेतलेल्या आरोपींसह जप्त मुद्देमाल पुढील कायदेशीर कारवाईसाठी अकोट फाईल पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर, पोलीस उपनिरीक्षक अनिल चव्हाण तसेच पोलीस अंमलदार शेख हसन, फिरोज खान, खुशाल नेमाडे, श्रीकांत पातोंड, धिरज वानखडे, अभिषेक पाठक, मोहम्मद आमीर आणि चालक प्रविण कश्यप यांच्या पथकाने केली.

राजकीय-सामाजिक क्षेत्रातील संधीचा जनहितासाठी उपयोग करणार

भाजप प्रदेश कार्यकारिणीवर निवडीबद्दल डॉ. किशोर मालोकार यांचा सत्कार

■ प्रतिनिधी | अकोला ■

राजकीय व सामाजिक क्षेत्रात कार्य करताना मिळणाऱ्या प्रत्येक संधीचा सर्वसामान्य जनतेला लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने आणि कसोशीने प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन डॉ. किशोर मालोकार यांनी केले. भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यकारिणीवर सलग कार्य करण्याची संधी मिळाल्याबद्दल शहरातील विविध सेवाभावी व सामाजिक संस्थांच्या वतीने आयोजित सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.

भाजपच्या प्रदेश कार्यकारिणीवर नियुक्ती होण्यात अकोला पूर्वचे आमदार रणधीरभाऊ सावरकर यांचे विशेष योगदान असल्याचे डॉ. मालोकार यांनी यावेळी नमूद केले. तसेच विविध सेवाभावी व सामाजिक संस्थांनी केलेल्या सत्काराबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ?ड. सुभाषसिंह ठाकूर यांनी डॉ. मालोकार यांना सलग राज्य कार्यकारिणीवर कार्य करण्याची संधी मिळणे ही त्यांच्या कार्याची पावती असल्याचे सांगितले. विविध क्षेत्रांत डॉ. मालोकार यांनी केलेल्या कार्यातून सामाजिक कार्याची प्रेरणा मिळते, असे बीजीई सोसायटीचे मानद सचिव डॉ. पवन माहेश्वरी यांनी सांगितले. बीजीई सोसायटीचे दीपक चांडक व डॉ. पवन माहेश्वरी यांनी डॉ. मालोकार यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला टेबल टेनिसचे प्रशिक्षक महेंद्र कोठारी, क्रीडा शिक्षक पंकज देशमुख, आकाश ठाकरे, डेंटल असोसिएशनचे डॉ. विजय शर्मा, भाजप वैद्यकीय आघाडीचे डॉ. सुनील फोकमारे, डॉ. राजू देशपांडे, डॉ. नरेश गोंड, डॉ. सुजित फोकमारे, डॉ. तुषार माळोकार, डॉ. दिलीप अग्रवाल, डॉ. राजेंद्र वानखडे, डॉ. निखिल बक्षी, डॉ. चंद्रकांत बोळे, डॉ. युवराज देशमुख, प्रा. संजय तिडके, राज सुनारीवाल, आशाताई, निलेश सोनी, अमोल अनासाने, प्रशांत हिरूळकर, सुमित रत्नपारखी, आशिष बडोकर, सतीश खोडवे, प्राचार्य देवेंद्र देशमुख, सूर्यकांत बुडखले यांच्यासह विविध सामाजिक, क्रीडा, व्यापारी व सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी उपस्थित होते.

कुणबी समाज, देशमुख समाज मराठा मंडळ, भाजप सेवानिवृत्त कर्मचारी संघ, मराठा महासंघ, मागासवर्गीय कृषी प्रक्रिया संस्था, अखिल भारतीय नाट्य परिषद, विदर्भ कॅरम संघटना, कबड्डी असोसिएशन, जीपीए, जुने शहर डॉक्टर असोसिएशन, हॉकी असोसिएशन, अकोला डिस्ट्रिक्ट ऑटोमोबाईल्स असोसिएशन, चेस संघटना, खरेदी-विक्री संघ पातूर, कृषी उत्पन्न बाजार समिती पातूर, बारा बलुतेदार संघ, ओबीसी महासंघ, सिंधी समाज सखर पंचायत, किसान ब्रिगेड, सामर्थ्य फाउंडेशन, भोले सरकार मित्र परिवार, निमा संघटना, जय गजानन मित्र मंडळ, स्वराज सामाजिक संस्था, रेड क्रॉस आदी संस्थांच्या वतीने डॉ. मालोकार यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप चव्हाण यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. महेश कुलकर्णी यांनी केले.

अकोल्यातील ज्येष्ठ रंगकर्मी एकाच रंगमंचावरून सादर करणार 'स्वगत'

२ सप्टेंबरला रंगणार 'रंग संवाद'

■ प्रतिनिधी | अकोला ■

गुरुवार, दिनांक २७ ऑगस्ट : अकोल्याच्या समृद्ध नाट्यपरंपरेतील ज्येष्ठ रंगकर्मी पुन्हा एकदा एकाच रंगमंचावर एकत्र येणार असून, त्यांच्या अभिनयाचा अनोखा आविष्कार रसिकांना अनुभवता येणार आहे. स्व. साहेबरावजी नारे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त 'रंग संवाद' या अभिनव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अ. भा. मराठी नाट्य परिषद, मलकापूर-अकोला शाखा आणि विदर्भ साहित्य संघ, शाखा अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होणार आहे.

बुधवार, २ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ४ वाजता प्रभात किड्स स्कूल, तोष्णीवाल ले-आऊट, अकोला येथे हा 'रंगसंवाद' रंगणार आहे. अकोल्याच्या रंगभूमीला उज्ज्वल परंपरा लाभलेली असून, अनेक ज्येष्ठ व श्रेष्ठ नाट्यकर्मी आपल्या अभिनयाने अकोल्याची रंगभूमी गाजवत आले आहेत. याच परंपरेला उजाळा देण्यासाठी ज्येष्ठ रंगकर्मी पुन्हा रंगमंचावर येत 'स्वगत' सादर करणार आहेत. या विशेष कार्यक्रमात दिलीप देशपांडे, डॉ. रमेश थोरात, विष्णू निंबाळकर, डॉ. सुनील गजरे, सौ. वंदना बाबर, सौ. विद्या बनाफर, राजेश तराळे, डॉ. रावसाहेब काळे, विवेक वडशिंगीकर, गीता जोशी ,राहुल भगत, विनय बोदडे, श्रद्धा वरणकार, अभय कुलट, अमोल ताले, अमृता जोशी-जटाळे, प्रमोद गोलडे, भूषण सरागे आणि सचिन पाटील हे रंगकर्मी सहभागी होणार आहेत. अकोल्याच्या इतिहासात प्रथमच इतके नाट्यकलावंत या निमित्ताने एका व्यासपीठावर येत असल्याने या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

कार्यक्रमानंतर सहभागी सर्व नाट्यकर्मींच्या नाट्यसेवेचा 'प्रभात' परिवाराच्या वतीने सन्मान करण्यात येणार आहे. विदर्भ साहित्य संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य डॉ. गजानन नारे, प्रभात अकॅडेमिक एज्युकेशन फाउंडेशनचे डायरेक्टर अँड. वल्लभ नारे आणि अ. भा. मराठी नाट्य परिषद, मलकापूर-अकोला शाखेचे कार्यवाह अशोक ढेरे यांनी रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आगळ्यावेगळ्या 'रंग संवाद' कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन केले आहे.

भजन व वेशभूषा स्पर्धा

अकोला : माहेश्वरी समाज वरिष्ठ नागरिक प्रकोष्ठ व माहेश्वरी नवयुवक मंडळच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक माहेश्वरी भवनात भजन व वेशभूषा स्पर्धा संपन्न झाली. स्व. वसंतप्रभा कलंत्री व स्व. गोपालदास कलंत्री यांच्या स्मृतीत ही स्पर्धा कलंत्री कुटुंबाद्वारे आजही सातत्याने आयोजित केली जाते.

तहसील चौकातील युवापीढी गणेशोत्सव मंडळाचे भूमिपूजन संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

स्थानिक तहसील चौक परिसरातील स्व. निरंजन रुंगटा व मित्रांनी स्थापन केलेल्या 'युवापीढी गणेशोत्सव मंडळा'च्या आगामी गणेशोत्सवासाठी भूमिपूजन सोहळा रविवारी मोठ्या भक्तिभावात पार पडला. भूमिपूजन विधी पं. श्रीकांत शर्मा आणि मनीष तिवारी यांनी पार पाडला.

या वर्षी युवापीढी गणेशोत्सव मंडळ आपल्या ५९व्या वर्षात पदार्पण करत आहे. मागील ५९ वर्षांपासून मंडळ प्रत्येक वर्षी श्रद्धा, सेवा आणि सामाजिक जबाबदारीचा संदेश देत विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करत आहे. या वर्षी विघ्नहर्ता गणेश महामूषक रूपात विराजमान होतील, तसेच एक मनोहरी आणि आकर्षक झांकीही सादर केली जाईल.गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत दरवर्षी विविध सेवा उपक्रम राबवले जातात.

यामध्ये भजनदान, वैद्यकीय उपकरणे दान करणे, अनाथाश्रमातील मुलांची सेवा, गौसेवा आणि इतर अनेक सामाजिक कार्ये यांचा समावेश आहे. मंडळाची सजावट व प्रकाशविषयक व्यवस्था गेल्या अनेक वर्षांप्रमाणे यंदाही दीपक पवार करणार आहेत, तर लाईटिंग व्यवस्था गुलाब साउंड अँड सर्विसकडे आहे. गणपतीची मूर्ती रवि काकड, विजय कलाकृती, अकोला यांनी तयार केली आहे.मंडळाचे अध्यक्ष अनुज अग्रवाल यांच्या नेतृत्त्वात गणेशोत्सवाच्या तयारीला वेग देण्यात आला आहे. भूमिपूजनाच्या कार्यक्रमास मंडळमधील अनुज अग्रवाल, राजेंद्र अदणकर, जतिन अग्रवाल, शुभम शाह, निलेश सोनी, सौरभ पाटील, डॉ. पीयूष गुप्ता, मयूर अग्रवाल, अंकुर अग्रवाल, रितेश अग्रवाल, प्रवीण अग्रवाल, अमितराज अग्रवाल, पीयूष मल्कान, विशाल वोरा, देवेंद्र पासारी, मोहित अग्रवाल, राजेश वर्मा, वैभव कोठारी यांच्यासह इतर सदस्य उपस्थित होते.

स्वरसाथी कराओकेच्या गीतांनी बहरले सभागृह

■ प्रतिनिधी | अकोला ■

महानगरात संगीतमय 'एक सुरमयी संध्या' सफलरित्या पार पडली. स्वरसाथी कराओके समूहातर्फे स्थानिक राधादेवी गोयनका महिला महाविद्यालयाच्या सभागृहात संपन्न 'एक सुरमयी संध्या' कार्यक्रमाचे उदघाटन आ वसंत खंडेलवाल यांच्या हस्ते तसेच निर्माण उद्योजक सुनील हातेकर आणि स्वरसाथीचे संचालक हरीश अण्णा मिरजामले यांच्या उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात स्वरदेवी सरस्वतीचे पूजन आणि दीपप्रज्वलनाने झाली.प्रारंभ हरीश अण्णा मिरजामले यांच्या गणेश वंदनाने झाला.कार्यक्रमात संचालक हरीश अण्णा यांनी आ वसंत खंडेलवाल यांचा शॉल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान केले, तर सुनील होतेकर यांचा सन्मान वरिष्ठ सदस्य श्रद्धानंद बिहाडे यांनी केला. पाहुण्यांच्या आगमनावर हरीश अण्णा यांनी 'मेरे सरकार आये हैं' या स्वागत गीताचे गायन केले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २६१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

गणेशमूर्ती घडविणार २० हजार हात

अकोल्यातून पर्यावरणाचा जागर!

४ सप्टेंबरला शहरातील चार केंद्रांवर एकाचवेळी शाडू माती कार्यशाळा

■ प्रतिनिधी | अकोला ■

गणेशोत्सवाच्या उत्साहाला पर्यावरण संवर्धनाची जोड देत अकोला शहरातून यंदा तब्बल २० हजार विद्यार्थी एकाचवेळी पर्यावरणाचा संदेश देणार आहेत. ॲड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प व निलेश देव मित्र मंडळाच्या पुढाकारातून ४ सप्टेंबर रोजी शहरातील चार केंद्रांवर शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याची भव्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. तब्बल ३० शाळांमधील २० हजारांहून अधिक विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होणार आहेत.

गणेशमूर्ती विकत घेण्याऐवजी ती स्वतःच्या हाताने तयार करण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना देतानाच पीओपीच्या मूर्तींमुळे होणारे जलप्रदूषण, निर्माल्य व्यवस्थापन आणि पर्यावरणपूरक विसर्जनाचे महत्त्व पटवून दिले जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या हातून घडणारी मूर्ती हा केवळ कलाविष्कार नसून पर्यावरण रक्षणाचा संदेश ठरणार आहे. ४ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता छत्रपती शिवाजी महाराज मैदान, तापडिया नगर, स्व. शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे पटांगण, जुने शहर, जानोरकर मंगल कार्यालय, रिंग रोड आणि प्रभात किड्स स्कूल, पातूर रोड येथे कार्यशाळा एकाचवेळी होणार आहे.

प्रत्येक केंद्रावर तज्ज्ञ मार्गदर्शक विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याची पद्धत शिकवतील. गणेशोत्सवानंतर मूर्तीचे घरच्या घरी विसर्जन करून तुळशीचे रोप लावण्याचाही संदेश दिला जाणार आहे.

२० हजार विद्यार्थ्यांचा सहभाग लक्षात घेऊन आयोजकांनी साहित्य वितरणाचे विशेष नियोजन केले आहे. प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला शाडू माती, लहान पाट, आईस्क्रीमचा चमचा, टूथपिक तसेच खाऊ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी स्वतंत्र वितरण पथक कार्यरत करण्यात आले आहे. कार्यशाळेचे मुख्य मार्गदर्शक व प्रशिक्षक शरद कोकाटे असतील. प्रा. डॉ. ज्ञानसागर भोकेर, प्रा. गजानन बोबडे, कल्पना राव, अमृता सेनाड यांच्यासह तज्ज्ञांची टीम विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहे. गजाननजी नारे, प्रदीप नंद, माधवराव देशमुख, शार्दुलजी दिंगबर, विक्रम जानोरकार, प्रा. कुशल सेनाड, डॉ. पल्लवी दिवेकर आणि दीप्ती अग्रवाल यांचेही उपक्रमाला सहकार्य लाभत आहे.

पर्यावरणासोबत महिलांच्या हातालाही बळ

पर्यावरण संवर्धनाच्या या उपक्रमाला महिला आर्थिक सक्षमीकरणाची जोड देण्यात आली आहे. ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता तापडिया नगर येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर 'तेजस्वी आत्मनिर्भर महाबाजारा'चा शुभारंभ होणार आहे. ४ ते ६ सप्टेंबरदरम्यान होणाऱ्या या महाबाजारात महिलांच्या गृहउद्योगातील उत्पादने, हस्तकला, वस्त्र, घरगुती वस्तू आणि खाद्यपदार्थांचे स्टॉल राहणार आहेत. महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांना ग्राहक आणि बाजारपेठ मिळावी, हा त्यामागील उद्देश आहे.

गेल्या वर्षी १० हजार; यंदा दुपटीहून अधिक

२०२५ मध्ये १० हजार विद्यार्थ्यांच्या सहभागातून शाडू माती गणेशमूर्ती निर्मितीचा उपक्रम राबविण्यात आला होता. त्याला मिळालेल्या प्रतिसादानंतर यंदा हा उपक्रम चार केंद्रांवर विस्तारण्यात आला असून २० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्याचे नियोजन आहे. 'मातीची मूर्ती स्वतः घडवा, घरातच विसर्जन करा आणि गणेशोत्सवानंतर तुळस लावा' या संदेशातून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची संकल्पना विद्यार्थ्यांच्या माध्यमातून घराघरात पोहोचविण्याचा आयोजकांचा प्रयत्न आहे. अकोला महानगरपालिकेसह संबंधित शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि विविध संस्थांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे ४ सप्टेंबरला हजारो विद्यार्थ्यांच्या हातून घडणाऱ्या गणेशमूर्तींसोबतच पर्यावरण संवर्धनाचा सामूहिक संकल्पही अकोला शहरातून पुढे जाणार आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

नांदगांव येथील घनकचरा, सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाच्या जागेला मान्यता

नगराध्यक्ष,नगरसेवकांनी मानले जिल्हाधिकाऱ्यांचे आभार

नांदगांव खंडेश्वर/प्रतिनिधीः- शहरातील नगर पंचायतच्या घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी व्यवस्थापनाच्या जागेचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. नगर पंचायतीनी जिल्हाधिकारी यांचेकडे पाठपुरावा करून अखेर सदर जागेला जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी मान्यता देऊन हा प्रश्न मार्गी लावल्याने नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर व नगरसेवकांनी जिल्हाधिकारी यांना शॉल पुष्पगुच्छ देऊन आभार व्यक्त केले .

नगर पंचायत अस्तित्वात आली तेव्हा पासून शहरात घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या जमिनीचा प्रश्न १० वर्षांपासून प्रलंबित होता. शहरातील गोळा होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता जागा उपलब्ध नसल्याने स्वच्छतेवर प्रश्नाचिन्ह अनेक वर्षांपासून निर्माण झाले होते. सन २०२६ मध्ये नगर पंचायतची निवडणूक होऊन नवनियुक्त नगराध्यक्ष, सर्व नगरसेवक यांनी शासन स्तरावर व मुख्याधिकारी, स्वच्छता निरीक्षक यांचे यशस्वी पाठपुराव्याला अखेर यश आले असून मौजा बच्छारापुर येथील २ हेक्टर जागा घनकचरा व्यवस्थापना करिता व शहरातील सांडपाणी व्यवस्थापना करिता मौजे मुंड झुंझारराव येथील १ हेक्टर

जागेला मंजुरात दिली आहे. शहरातील स्वच्छता व आरोग्य विषयक विकासाच्या दृष्टीने भर पडली. १० वर्षांपासून प्रलंबित असलेला जागेचा प्रश्न मार्गी लावल्याने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांची नुकतीच नगराध्यक्षा नगरसेवक यांनी भेट घेऊन त्यांना पुष्पगुच्छ देऊन आभार मानले.

यावेळी नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर, उपनगराध्यक्ष अब्दुल जमीर, स्वच्छता सभापती ज्योत्स्ना धवसे, सभापती कांता लोमटे,मो. रियाज, वासुदेव लोखंडे न.पं. गटनेते प्रकाश मारोटकर नगरसेवक प्रीती इखार शीला वाडेकर आयेशा शेख रजियाबी सलाम मो. साजिद अमोल धवसे शेख हारून मो. शारुख इत्यादी उपस्थित होते.

विद्यार्थिनींच्या क्रीडागुणांना मिळाले बळ

जानकीबाई देशमुख विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

अचलपूर/प्रतिनिधीः- रक्षाबंधनाचे औचित्य साधत पर्यावरण संवर्धनाचा संदेश आणि राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विद्यार्थिनींमधील क्रीडागुणांना वाव देणाऱ्या विविध उपक्रमांचे आयोजन श्रीमती जानकीबाई देशमुख विद्यालयात उत्साहात करण्यात आले. वृक्षांना राखी बांधून पर्यावरण रक्षणाची शपथ घेण्यासोबतच विविध क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्यामुळे विद्यालयाचा परिसर दिवसभर क्रीडामय आणि उत्साहपूर्ण वातावरणाने भारावून गेला होता.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका मनीषा नाकील होत्या, तर पर्यवेक्षक श्रीकांत पसारकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शारीरिक शिक्षिका देवयानी जोशी यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनकार्याची तसेच भारतीय क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची माहिती विद्यार्थिनींना दिली. राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना विद्यार्थिनींनी अभ्यासासोबतच खेळालाही आपल्या व्यक्तिमत्त्व विकासाचा महत्त्वपूर्ण भाग बनवावा, असे आवाहन करण्यात आले.

विद्यार्थिनींमध्ये क्रीडाप्रेम निर्माण व्हावे आणि त्यांच्या अंगी असलेल्या क्रीडागुणांना योग्य व्यासपीठ मिळावे, यासाठी योगासने, दोरीवरील उड्या, रस्सीखेच यांसह विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच आत्मविश्वास, संघभावना, शिस्त, नेतृत्वगुण आणि संकटांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित होते, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. विशेष म्हणजे शिक्षकांसाठीही मनोरंजक स्पर्धा घेण्यात आल्या. शिक्षकांनीही या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत विद्यार्थिनींचा उत्साह वाढविला.

खेळाशी संबंधित ज्ञान विद्यार्थिनींना मिळावे, यासाठी इयत्ता सातवी ते दहावीच्या विद्यार्थिनींसाठी क्रीडा प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत गट क्रमांक 'सी'मधील नाविका अढाऊ, तन्वी लांडे आणि अंजली कैथवास यांनी प्रथम क्रमांक पटकावला. गट क्रमांक 'बी'मधील किरण पाथरे, हेमाद्री मेसरे आणि श्रुती कायटे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला.

दरम्यान, रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर विद्यालयात 'वृक्ष रक्षाबंधन' उपक्रमही राबविण्यात आला. विद्यार्थिनींनी शाळेच्या परिसरातील वृक्षांना राख्या बांधून त्यांच्या संवर्धनाची जबाबदारी स्वीकारली. विद्यार्थिनींनी स्वतः तयार केलेल्या राख्यांसह इको-फ्रेंडली राख्यांचे प्रदर्शनही भरविण्यात आले. त्यामुळे पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश विद्यार्थिनींपर्यंत पोहोचला.

शिक्षणासोबत खेळाला प्राधान्य देत विद्यार्थिनींना विविध क्रीडा प्रकारांत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मुली आणि महिला विविध क्रीडा प्रकारांत देशाचे नाव उज्ज्वल करीत आहेत. अशा परिस्थितीत ग्रामीण आणि स्थानिक भागातील विद्यार्थिनींमधील क्रीडाप्रतिभा ओळखून तिला योग्य संधी देण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने आवश्यकता आहे. जानकीबाई देशमुख विद्यालयातील या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये खेळाची गोडी निर्माण होऊन भविष्यात त्या विविध क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवयानी जोशी यांनी केले, तर बावणे यांनी आभार मानले. विद्यार्थिनी, शिक्षक आणि उपस्थितांच्या उत्स्फूर्त सहभागाने राष्ट्रीय क्रीडा दिनाची सांगता उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त अमरावतीत जनजागृतीचा जागर

'नशामुक्त अमरावती'चा संदेश देत ८०० विद्यार्थ्यांसह २०० पोलिसांचा सहभाग

अमरावती/प्रतिनिधीः- राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून अमरावती शहर पोलीस आयुक्तालय आणि श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ (एचव्हीपीएम) यांच्या संयुक्त विद्यमाने 'नशामुक्त अमरावती अभियान' अंतर्गत शनिवारी भव्य जनजागृती रॅली काढण्यात आली. अंमली पदार्थ आणि व्यसनांपासून युवकांना दूर ठेवण्यासोबतच क्रीडा व निरोगी जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या रॅलीत तब्बल ८०० विद्यार्थी आणि २०० पोलीस अधिकारी-अंमलदार सहभागी झाले.

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या परिसरातून रॅलीला सुरुवात झाली. पद्मश्री प्रभाकरराव वैद्य आणि पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी 'नशामुक्त अमरावती', 'व्यसनाला नकार, निरोगी जीवनाचा स्वीकार' अशा घोषणांद्वारे अंमली पदार्थांविरोधात जनजागृती केली. रॅली एचव्हीपीएम परिसरातून राजकमल चौकापर्यंत काढण्यात आली. मार्गावर विद्यार्थ्यांनी आणि पोलिसांनी व्यसनमुक्तीचा संदेश देत नागरिकांचे लक्ष वेधून

घेतले. युवकांनी व्यसनांच्या आहारी न जाता क्रीडा, शिक्षण आणि सकारात्मक उपक्रमांकडे वळावे, असे आवाहन करण्यात आले.

राजकमल चौकात क्रीडा प्रात्यक्षिके-

राजकमल चौकात विद्यार्थ्यांनी आणि क्रीडापटूंनी विविध क्रीडा प्रात्यक्षिके सादर केली. शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यात क्रीडांचे महत्त्व या प्रात्यक्षिकांतून अधोरेखित करण्यात आले. क्रीडा ही निरोगी जीवनाची गुरुकिल्ली असून युवकांनी व्यसनांपासून दूर राहून क्रीडा क्षेत्राकडे वळावे. अमरावती शहर नशामुक्त करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली भूमिका बजावावी, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाचा समारोप 'वंदे मातरम्' आणि राष्ट्रगीताने करण्यात आला. यावेळी पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपआयुक्त प्रांजली सोनवणे, डॉ. माधुरी चेंडके, प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, डॉ. संजय तिरथकर, अॅड. प्रशांत देशपांडे यांच्यासह पोलीस अधिकारी-कर्मचारी, एचव्हीपीएमचे पदाधिकारी, विद्यार्थी आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बजरंग मंडळ साकारणार उज्जैन महाकालेश्वर मंदिर

अमरावती/प्रतिनिधीः- स्थानिक पाटीपुरा येथील श्री बजरंग गणेशोत्सव मंडळात यावर्षी उज्जैनच्या महाकालेश्वर मंदिराचा देखावा साकार होणार आहे. त्यासोबतच भारत माता मंदिरही साकार करण्यात येणार आहे. १४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता गणरायाच्या आगमनाची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असल्याची माहिती आज शनिवार २९ ऑगस्ट रोजी पत्रकार परिषदेमध्ये मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली आहे.

त्यांनी सांगितले की, भाविकांच्या आग्रहास्तव भारतातील सुप्रसिद्ध तिसरे ज्योतिर्लिंग महाकालेश्वर मंदिराचा देखावा यावर्षी सादर करण्यात येत आहे. यामध्ये महाकालच्या मूर्तीचा शृंगार दररोज नवीन स्वरूपात भाविकांना पाहायला मिळेल. मंदिराचे आकर्षक प्रवेशद्वार भाविकांचे लक्ष वेधून घेणार आहे. तसेच महाकालेश्वर मंदिराचा कॉरिडोर हा सुद्धा येथे उभारण्यात येणार आहे. त्याकरिता वृंदावन येथील सुप्रसिद्ध निधीवन चा देखावा उभारण्यात येईल. यामध्ये आकर्षक कारंजे हे भाविकांना आकर्षित करेल. गणरायाची माती पासून बनवलेली सूचक आणि रेखीव अशी मूर्ती आणि पर्यावरण पूरक सजावट हे मुख्य आकर्षण राहील.

मंडळाला आतापर्यंत अनेक पुरस्कारांनी गौरवी करण्यात आले आहे. आयुक्तालयातील सर्वोत्कृष्ट पुरस्कारही मंडळाला मिळाला आहे. गणेश उत्सव दरम्यान सामाजिक उपक्रम अंतर्गत महाआरोग्य तपासणी शिबिर घेतले जाणार आहे. तसेच ५०० वृक्ष लागवड करण्यात येईल. वृक्ष संवर्धन आणि नशा विरोधी मोहीम अंतर्गत जनजागरण करण्याकरिता संपूर्ण परिसरात पोस्टरद्वारा प्रचार करण्यात येईल तसेच पथनाट्य सुद्धा सादरीकरण करण्यात येणार आहे. शहरवासीयांना देखाव्याचा लाभ घेण्याचे आवाहन मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.मंडळाचे मार्गदर्शक बाबुलालजी मामर्डे, सचिव अॅड.शेखर मामर्डे यांच्या मार्गदर्शनात डॉ. राजेश जवादे, कार्याध्यक्ष जगदिश गुप्ता, संयोजक गजानन परीहार, स्वागताध्यक्ष प्रशांत देशपांडे, विजय टोंगसे, आयुष मकवाने,आदित्य निहाडकर, मिलिंद मामर्डे, भुषण परीहार, संजय मापले सह शेखर मकवाने, प्रा.डॉ. अनिल निमकर, दिपक पांढरे, सचिन वावरे,रोहीत बोटावाले, देविदास टिंगणे,जयेश देसाई, सुनिल मकवाने,अमोल लाडे, सुशांत देशपांडे,अरुण तेटू, वंदशेवर काळे, प्रशांत मामर्डे, राहुल टोंगसे, युवराज मामर्डे, विनोद मामर्डे, ज्ञानेश्वर मामर्डे, जय मामर्डे,आदित्य तेटू, प्रफुल टोंगसे, किशोर तेटू, यश मामर्डे, रोहन पांढरे, प्रभु मामर्डे, विजय मामर्डे, अर्जुन पांढरे, योगेश टिंगणे, कृष्णा जयस्वाल, प्रथमेश बिजवे, स्वराज मामर्डे, ओम मामर्डे, स्वयम मामर्डे, ओम मामर्डे, सार्थक जायदे आदि उत्सवाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न करत आहे.

१६ ला देखावाचे उद्घाटन-

बजरंग गणेशोत्सव मंडळाच्या देखाव्याचे १६ सप्टेंबर रोजी सायंकाळी सात वाजता मान्यवराच्या हस्ते विधिवत उद्घाटन करण्यात येणार आहे. १० दिवसापर्यंत विविध सामाजिक कार्यक्रम घेतले जाईल. २५ सप्टेंबर रोजी सायंकाळी सात वाजता सत्यनारायण ,तीर्थ स्थापनेने उत्सवाचे समापन होणार आहे.

गावठी दारूच्या अड्ड्यावर गुन्हे शाखेची धाड

-७५ हजारांचा मुद्देमाल जप्त

अमरावती/प्रतिनिधीः- शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत अवैधरित्या गावठी दारूची निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरुद्ध गुन्हे शाखेने विशेष मोहीम राबवून दोन ठिकाणी कारवाई केली. या कारवाईत गावठी दारू निर्मिती करणाऱ्या महिलेसह देशी दारू विक्री करणाऱ्या एका व्यक्तीविरुद्ध दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले. दोन्ही कारवायांमध्ये एकूण ७७ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेने ही विशेष मोहीम राबविली. पहिली कारवाई फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील परिहारपुरा, वडाळी येथे करण्यात आली. संगीता गेंदालाल बेनिवाल (वय ४३, रा. परिहारपुरा, वडाळी) ही महिला तिच्या घराच्या आवारात अवैधरित्या हातभट्टीवर गावठी दारू तयार करताना आढळून आली. पोलिसांनी तिच्याकडून १०० लिटर गावठी दारू, २०० लिटर मोहमास सळवा व दारू निर्मितीसाठी लागणारे साहित्य, असा एकूण ७५ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (क), (फ) व (ड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरी कारवाई महादेव खोरी परिसरात करण्यात आली. भीमराव दामोदर गडलिंग (वय ४५, रा. महादेव खोरी, अमरावती) हा त्याच्या घराच्या आवारात अवैधरित्या देशी दारूची विक्री करताना आढळून आला. त्याच्याकडून दोन हजार रुपये किमतीचा दारूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

देशी दारू विक्रेता ताब्यात

याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांत महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

ही कारवाई पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे शाखा प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वात करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश इंगोले, पोलीस उपनिरीक्षक गजानन सोनुने यांच्यासह गुन्हे शाखेच्या पथकातील अधिकारी व अंमलदारांनी कारवाईत सहभाग घेतला.

बांधकामस्थळी सुरक्षेअभावी मजुराचा मृत्यू

घरमालक व ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल

अमरावती/प्रतिनिधीः- बांधकामस्थळी काम करणाऱ्या मजुरांच्या सुरक्षेची कोणतीही काळजी न घेता आवश्यक सुरक्षा साधने उपलब्ध करून न दिल्याने २४ वर्षीय मजुराचा मृत्यू झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणी घरमालक आणि ठेकेदाराविरुद्ध खोलापुरी गेट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. प्रेम मन्या चिमोटे (वय २४, रा. प्रभू विहार, अकोली रोड, अमरावती) असे मृत मजुराचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार, प्रेम चिमोटे हा अकोली रोड परिसरातील एका घराच्या बांधकामावर मजूर म्हणून काम करीत होता. २० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी १ वाजण्याच्या दरम्यान बांधकामस्थळी काम सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर त्याच्या कुटुंबीयांनी घरमालक आणि ठेकेदार यांच्या निष्काळजीपणामुळेच प्रेमचा मृत्यू झाल्याचा आरोप करीत पोलिसांत तक्रार दिली. तक्रारीनुसार, बांधकाम सुरू असताना तेथे काम करणाऱ्या मजुरांच्या जीविताच्या सुरक्षेच्या दृष्टीने घरमालक चंद्रशेखर एकनाथ नांदुरकर (रा. भाजी बाजार, अमरावती) आणि ठेकेदार मोहम्मद अहेफाज मोहम्मद अय्युब (रा. सलमसपुरा, मोहम्मद पन्हा मशीदजवळ, अचलपूर, जि. अमरावती) यांनी कोणत्याही प्रकारच्या आवश्यक सुरक्षा उपाययोजना केल्या नाहीत. तसेच मजुरांना आवश्यक सुरक्षा साधनेही उपलब्ध करून दिली नसल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. बांधकामस्थळी सुरक्षेच्या उपाययोजनांकडे दुर्लक्ष केल्यामुळेच प्रेम चिमोटे याचा मृत्यू झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४.३८ वाजता पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली.

त्यावरून खोलापुरी गेट पोलिसांनी अपघाती मृत्यू प्रकरण क्रमांक २६५/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम १०६(१) अन्वये घरमालक व ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढील तपास खोलापुरी गेट पोलीस करीत आहेत.

'इंधन असूनही रुग्णवाहिका नाकारल्याचे' वृत्त तथ्यहीन

अमरावती/प्रतिनिधीः- जिल्हा स्त्री रुग्णालयात इंधन उपलब्ध असतानाही रुग्णाला रुग्णवाहिका देण्यास नकार दिल्याचा आरोप फेटाळत रुग्णालय प्रशासनाने यासंदर्भातील वृत्त पूर्णपणे तथ्यहीन आणि दिशाभूल करणारे असल्याचे स्पष्ट केले आहे. २९ ऑगस्ट २०२६ रोजी दैनिक वृत्तपत्र आणि सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या बातम्यांनंतर जिल्हा स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक यांनी या प्रकरणी सविस्तर खुलासा सादर केला आहे.

आमदार चित्रा वाघ या दि. २९ ऑगस्ट रोजी रुग्णालयाच्या भेटीवर आल्या होत्या. त्याचवेळी रीना रमेश उईके (रा. माहुल जहांगीर) या डिस्चार्ज दिलेल्या रुग्णाला घरी सोडण्यासाठी रुग्णवाहिकेची वाट पाहावी लागत होती. यापूर्वीची रुग्णवाहिका दुसऱ्या रोशनी हरीष शिंगणे (रा. नांदगाव खंडेश्वर) यांना पीडीएमसी रुग्णालयात सोडण्यासाठी गेली होती. ती रुग्णवाहिका परत येण्यासाठी केवळ १५ ते २० मिनिटांचा वेळ असल्याने डिस्चार्ज मिळालेल्या रुग्णाला थोडा वेळ थांबण्यास सांगण्यात आले होते. मात्र, रुग्णवाहिकेत इंधनच नसल्यामुळे रुग्णाला थांबवून ठेवल्याचा आरोप या दरम्यान करण्यात आला. आमदार चित्रा वाघ यांनी रुग्णाकडे चौकशी केली असता, त्यांनी ५ ते १० मिनिटांपासून वाट पाहत असल्याचे सांगितले. त्यावेळेस रुग्णालयात उभी असलेली कंत्राटी रुग्णवाहिका आणि तिचा चालक वॉर्डातील इतर रुग्णांना आणण्यासाठी गेले होते. त्यानंतर लगेचच उपलब्ध कंत्राटी रुग्णवाहिकेतून रुग्णाला त्यांच्या गावी रवाना करण्यात आले.

सामान्य रुग्णालय, अमरावती अंतर्गत १०८ आणि १०२ क्रमांकाच्या एकूण ४८ रुग्णवाहिका चोवीस तास उपलब्ध असतात. यापैकी ४ रुग्णवाहिका जिल्हा स्त्री रुग्णालयाला देण्यात आलेल्या आहेत. सर्व ४ रुग्णवाहिका सुस्थितीत असून त्यामध्ये पुरेसे इंधन उपलब्ध होते. यातील २ रुग्णवाहिका मेळघाट भागातील रुग्णांसाठी, तर २ रुग्णवाहिका स्थानिक सेवेसाठी कार्यरत आहेत. घटनेच्या वेळी या चारही रुग्णवाहिका इतर रुग्णांना पोहोचवण्यासाठी बाहेर गेल्या होत्या,असे सांगण्यात आले.

फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.
संपर्क : ९४२२८५७१६९
९४२२१२०४०६

प्लॉट विकणे आहे

न्यू कॉलनी, दस्तुर नगर, अमरावती येथील रहिवासी प्लॉट क्षेत्र ३०००.०० चौ.फुट त्यावरील जुन्या बांधकामासह विकणे आहे.
- संपर्क -
७५०७६२२५८४

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३५३
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

पत्रकार हेमंत निखाडे यांचा राष्ट्रसंताच्या समाधीस्थळी सन्मान

गुरुकुंज मोझरी/प्रतिनिधीः- पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये मागील २० वर्षापासून निरंतर सेवा देणारे गुरुकुंज मोझरी येथील पत्रकार हेमंत निखाडे यांना नुकताच महाराष्ट्र शासनाच्या वतीने शेतकरी मित्र पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्या अनुषंगाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामजयंती महोत्सव समिती श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रमचे वतीने त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल नुकताच सामुदायिक प्रार्थनेनंतर वं. राष्ट्रसंताच्या महासमाधीस्थळी सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी महोत्सव समितीचे सचिव उद्धव वानखेडे, डॉ.सदगुण ठोसर, डॉ. सुरेशराव चौधरी, अनिल चिखलकर, आशिष देशमुख, सागर रावणकर, अमोल खारोडे, गणेशराव बायस्कर, संजय डोंगरकर, गुरुदेवनगर ग्रामपंचायतच्या माजी सरपंच अर्चनाताई खारोडे, लताताई ठोसर, रेखाताई खारोडे, अर्चनाताई चौधरी, गावंडे ताई इत्यादी ग्रामजयंती महोत्सव समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

हेमंत निखाडे यांनी मागील अनेक वर्षापासून आपल्या लेखणीद्वारा दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासकीय मदत मिळवून देण्यासोबतच शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडून न्याय मिळवून दिल्याचा उल्लेख उद्धव वानखडे यांनी याप्रसंगी बोलताना केला.

जाहीर सुचना

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की माझे पक्षकार **नामे रोशन राजेश पाटील,** यांचे वतीने सदर जाहीर सूचना देतो ती येणेप्रमाणे --

मिळकतीचे वर्णन - मौजे - तरोडा ग्रामपंचायत जुना मालमत्ता क्र.१५३, मालमत्ता क्र.१६५ याचे एकुण क्षेत्रफळ ३२९४ चौ.फुट अनु.क्र.२०३, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती

सदर मिळकत माझे पक्षकार नामे रोशन राजेश पाटील यांना राजेश सखाराम पाटील आणि अनिता राजेश पाटील यांनी बक्षीसपत्र दिनांक 24.08.2026 रोजीचे **दस्त क्र.**1872 नुसार करुन दिले. तसेच वरील नमुद मालमत्ता ही वारसाने वडिलोपार्जित मिळालेली आहे. वरील नमुद मालमत्तेविषयी शासकीय निमशासकीय इतर भानगड कोणाचा मालकी अथवा वारस हक्क इतर बँक गहाण, बोजा, नोंद कोणतीही हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.वर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या **७** दिवसांच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही, सदर मालमत्ता पिरॅमल फायनान्स लिमिटेड येथे कर्जासाठी केलेल्या अर्जानुसार सदर मालमत्ता गहाण करण्यात येईल. करीता ही जाहीर सुचना देत आहे.

ठिकाण - धामणगांव रेल्वे
दिनांक - ३०.०८.२०२६

आपला,
अॅडव्होकेट
रवींद्र रु.वाटाणे,
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती
मो.नं.9823698745
शिक्का

वर्धा, सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६
E-paper-www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

गुंतवणूक परिषदेतून जिल्ह्यात रोजगार निर्मितीला मोठी चालना मिळेल-उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत

जिल्हा गुंतवणूक परिषदेत ३ हजार ११ कोटींचे सामंजस्य करार

उद्योगात स्थानिकांना प्राधान्य द्या

वर्धा /जनमाध्यम

वर्ध्यातील उद्योगांची क्षमता आणि स्थानिक उद्योजकांचा उत्साह कौतुकास्पद असून, जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही उद्योगमंत्र्यांनी दिली. जिल्हा गुंतवणूक परिषदेत तब्बल ३ हजार ११ कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले असून, या गुंतवणुकीतून जिल्ह्यात रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळेल, असा विश्वास उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत यांनी व्यक्त केला.

जिल्हा उद्योग केंद्राच्यावतीने आर्शिवाद सेलीब्रेशन हॉल येथे जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, जिल्हाधिकारी वान्मथी सी, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, भारतीय प्रशासकीय सेवेतील परिविक्षाधिन अधिकारी शोभिता पाठक, एमआयडीसी संघटनेचे अध्यक्ष प्रविण हिवरे, उद्योग व सेवा सहआयुक्त शिवकुमार मुदमवार, लघु उद्योग भारतीचे महामंत्री हरीष हांडे, जिल्हा उद्योग केंद्राचे उद्योग व सेवा सहाय्यक आयुक्त सुनील हजारे आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील उद्योग, स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ आणि पर्यावरणपूरक उपक्रमांना चालना देण्यासाठी शासनाकडून विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. विशेषतः प्लास्टिकला पर्याय म्हणून काचेच्या बाटल्यांमध्ये उत्पादनांचे पॅकेजिंग करण्याचा वर्ध्यातील प्रयोग राज्यासाठी आदर्श आहे. वर्ध्यातील उद्योजकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने उत्पादनांची निर्मिती आणि पॅकेजिंग करून नवा आदर्श निर्माण केला आहे. वर्ध्याचे हे मॉडेल संपूर्ण महाराष्ट्रात, तसेच रत्नागिरा सारख्या जिल्ह्यांमध्येही राबविण्याचा प्रयत्न केला जाईल, असे उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत म्हणाले.

वर्ध्यातील हळदीची गुणवत्ता लक्षात घेता जिल्ह्यात हळद संशोधन केंद्र तसेच त्याचे सब-सेंटर सुरू करण्यासाठी हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील यांच्याशी चर्चा करून पाठपुरावा करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेच्या माध्यमातून तरुणांना उद्योग उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात मदत केली जात आहे. मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रासाठी एक कोटी रुपये, तर सर्व्हिस क्षेत्रासाठी ५० लाख रुपयांपर्यंतची मदत उपलब्ध करून देण्यावर

शासनाचा भर आहे. वर्ध्यातील तरुणांनी अवघ्या ५० लाख रुपयांच्या निधीतून फायर डोअरची निर्मिती सुरू केली आहे. ही बाब महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद असल्याचे उद्योगमंत्र्यांनी नमूद केले.

एक जिल्हा, एक उत्पादन योजनेंतर्गत तयार होणाऱ्या स्थानिक उत्पादनांना देशांतर्गत तसेच जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील सर्व विमानतळांवर स्टॉल्स उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मराठी उद्योजकांनी तयार केलेल्या पैठणीसह विविध ओडीओपी उत्पादनांच्या विक्रीसाठी नवी दिल्लीत १५ कोटी रुपये खर्चून ॲम्पोरियम उभारण्यात येत असल्याचे डॉ.सामंत यांनी सांगितले.

उद्योजकांनी सामाजिक दायित्व निधीचा अधिकाधिक उपयोग समाजोपयोगी कामांसाठी करावा, असे आवाहनही उद्योगमंत्र्यांनी केले. वाढदिवसाच्या कार्यक्रमांवर किंवा केवळ औपचारिक उपक्रमांवर निधी खर्च करण्याऐवजी शाळांच्या सुविधा सुधारण्यासाठी, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या विकासासाठी निधी वापरावा, असे त्यांनी सांगितले. वर्ध्याच्या भूमीतून सुरू झालेला गुंतवणुकीचा हा प्रवास आता संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचविण्यात येईल. गुंतवणुकीसाठी करण्यात आलेल्या सामंजस्य करारांची १०० टक्के अंमलबजावणी करण्याचा शासनाचा प्रयत्न राहणार असून, त्यातून जिल्ह्यात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वास उद्योगमंत्र्यांनी व्यक्त केला.

वर्ध्यात अधिकाधिक उद्योग आणण्यासाठी प्रयत्न करणार : पालकमंत्री डॉ.पंकज भोयर

जिल्ह्यात गुंतवणूक वाढवून स्थानिक तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. जिल्ह्यात आयोजित करण्यात आलेल्या गुंतवणूक परिषदेमुळे वर्ध्यातील उद्योगांना नवी दिशा मिळेल, असा विश्वास पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मागील काही वर्षांत राज्यात अनेक उद्योग आणि गुंतवणुकीचे प्रकल्प आले आहेत. समृद्धी महामार्ग सुरू झाल्यामुळे वर्धा, नागपूर आणि अमरावतीसह विदर्भातील जिल्ह्यांची नाशिक, ठाणे, मुंबई आणि पुणे या प्रमुख औद्योगिक केंद्रांशी कनेक्टिव्हिटी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या वाढलेल्या दळणवळणाचा फायदा स्थानिक उद्योजक, शेतकरी आणि उद्योगांना करून देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे, असे डॉ.भोयर यांनी स्पष्ट केले.

स्थानिक उद्योजकांना शासनाची साथ आणि आवश्यक सहकार्य मिळाल्यास जिल्ह्यातील उद्योगांना मोठी चालना मिळू शकते. जिल्ह्यातील उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देऊन नवीन उद्योग उभारण्यास प्रोत्साहन दिल्यास मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होईल. त्यामुळे जिल्ह्याला औद्योगिक विकासाच्या नकाशावर अधिक सक्षमपणे पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज असल्याचे पालकमंत्री डॉ.भोयर यांनी सांगितले.

यावेळी जिल्ह्यातील ५३ उद्योग समुहाशी ३ हजार ११ कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आला. यामध्ये सर्वाधिक इवोनिथ १ हजार ७२५ कोटी रुपये, एसएमडब्ल्यु इस्पात प्रा.लि. ५०० कोटी, श्रीनिवास स्पीनटेक्स १५० कोटी रुपये, आश्वी पॉलीपॅक ७५ कोटी रुपये, विश्वत्रिवेणी टेक्सटाईल्स ५० कोटी रुपये यांच्यासह ५३ करार करण्यात आले. या गुंवतणूक करारातून जिल्ह्यातील हजारो स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते करारपत्राचे हस्तांतरण करण्यात आले. तसेच जिल्ह्यातील उद्योजकांना जास्तीत जास्त कर्ज मंजूर केलेल्या बँकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवकुमार मुद्दमवार यांनी केले तर संचालन व आभार ज्योती भगत यांनी केले. गुंतवणूक परिषेदेला जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणावर उद्योजक उपस्थित होते.

ऑक्सिजन पार्कमधील हजारो वृक्षांचा रौप्यमहोत्सव

वर्धा /जनमाध्यम

रक्षाबंधनाच्या निमित्ताने भाऊ-बहिणीच्या नात्याबरोबरच माणूस आणि निसर्गाचे नाते अधिक दृढ करण्याचा अनोखा संदेश वर्ध्यात देण्यात आला.

आयटीआय जवळील टेकडी परिसरातील ऑक्सिजन पार्कमध्ये २५ वर्षांपूर्वी लावलेल्या हजारो वृक्षांचा २५ वा वर्धापनदिन निसर्ग सेवा समितीच्या वतीने वृक्षांना प्रतिकात्मक राखी बांधून साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी वृक्षसंरक्षण व संवर्धनाची शपथ घेतली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार रामदास तडस होते. खासदार अमर काळे, उपवनसंरक्षक हरवीर सिंह, विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष प्रदीप दाते, माजी जिल्हा व सत्र न्यायाधीश नारायणराव भोयर, प्रा. पंकज वंजारे, निसर्ग सेवा समितीचे संचालक डॉ. अनिल लोणारे, डॉ. दत्तात्रय कुंभारे, ओंकार धावडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

संवाद हरवला तर बालमनही हरवते; कुटुंबातील सुसंवादातूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

वर्धा /जनमाध्यम

कुटुंबाचा आकार छोटा होत असताना माणसांमधील संवादही कमी होत चालला आहे. मोबाईल आणि धावपळीच्या जीवनशैलीत मुलांना वेळ देणे कमी झाल्याने त्यांच्या भावविश्वावर परिणाम होत आहे.

अशा परिस्थितीत मुलांच्या आत्मविश्वासाला बळ देण्यासाठी आणि त्यांच्या वैचारिक व भावनिक जडणघडणीसाठी कौटुंबिक सुसंवाद अत्यंत गरजेचा आहे, असे प्रतिपादन ॲड. विभा देशमुख यांनी केले.

ब्राह्मण सभा, वर्धातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहाय्य तसेच समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानावरून ॲड. देशमुख बोलत होत्या. बुल ढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या वर्धा शाखेचे विभागीय व्यवस्थापक प्रशांत संगवई प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमात २१ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, तर सात गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहाय्य करण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक दीपक चौगावकर यांनी अपयशाने खचून न जाता जिद्द, परिश्रम आणि योग्य दिशेने प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

यावेळी दीपक चौगावकर, मेजर शशिकांत देशपांडे, मंगेश परसोडकर, सचिन लिखितकर, विक्रम नाशिककर यांच्यासह पुरोहित बंधूंचा सत्कार करण्यात आला.

गुणवंतांना प्रोत्साहन आणि गरजूंच्या शिक्षणाला मदतीचा हात देणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी आदर्श ठरला.

झाडांना राखी बांधून जपले माणुसकीचे नाते

देवळी /जनमाध्यम

झाड लावणे हा एक दिवसाचा उपक्रम; मात्र ते जगविणे ही वर्षानुवर्षांची तपश्चर्या आहे, याची जाणीव करून देत एनसीसी 'ग्रीन वॉरियर्स'ने महाविद्यालय परिसरातील वृक्षांचा १५वा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा केला. रक्षाबंधनाच्या पर्वावर छात्र सैनिकांनी वृक्षांना पर्यावरणपूरक राख्या बांधून निसर्गाशी असलेले भावनिक नाते जपले.

स्थानिक एस.एस.एन.जे. महाविद्यालय परिसरात झालेल्या कार्यक्रमात एनसीसी

अधिकारी तथा रोव्हर स्काऊटचे जिल्हा आयुक्त कॅप्टन मोहन गुजरकर यांनी वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. बदलत्या हवामानामुळे निसर्गाचे रौद्ररूप अनुभवास येत असताना केवळ वृक्षारोपण करून चालणार नाही. लावलेल्या प्रत्येक रोपट्याची जबाबदारी स्वीकारून त्याचे संगोपन करणे गरजेचे आहे. वृक्षसंवर्धन ही केवळ शासन किंवा संस्थेची जबाबदारी न राहता लोकचळवळ आणि नागरी चळवळ झाली पाहिजे, असे ते म्हणाले.

ऑगस्ट २०११ मध्ये तत्कालीन प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रा. विवेक देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कॅप्टन गुजरकर व एनसीसी छात्र सैनिकांनी वृक्षारोपण केले होते. गेल्या १५ वर्षांपासून या वृक्षांचे सातत्याने संगोपन केले जात आहे.

यावेळी वृक्षपूजन करून राख्या बांधण्यात आल्या. तसेच छात्र सैनिक मुलींनी एनसीसी छात्र सैनिक व रोव्हर स्काऊट्सना राख्या बांधल्या. पर्यावरणपूरक राखी निर्मितीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कॅडेट्सचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता 'हम सब भारतीय हैं' या एनसीसी गीताने झाली.

पुलगावात ४५० युवकांना रोजगार

पुलगाव/ जनमाध्यम

ग्रामीण आणि शहरी भागातील सुशिक्षित युवक-युवतींना रोजगाराच्या विविध संधींची माहिती मिळावी, तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी योग्य दिशा मिळावी, या उद्देशाने पुलगाव येथे रोजगार मार्गदर्शन व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराला तब्बल ४५० युवक-युवतींची उपस्थिती लाभली.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शना खाली उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. वंदना कारखेले यांच्या पुढाकारातून प्रथम एज्युकेशन फाउंडेशन संचालित प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्र, राळेगाव यांच्या सहकार्याने शनिवारी लक्ष्मी सेलिब्रेशन, पुलगाव येथे हा उपक्रम पार पडला.

मेहनतीला मिळाले यशाचे सुवर्णपदक; आयुष घुले यांचा गौरव

वर्धा /जनमाध्यम

जिद्द, मेहनत आणि संस्कारांच्या जोरावर चि. आयुष महेन्द्र घुले यांनी डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे येथून एम.बी.ए. पदवी संपादन करून कुटुंबासह समाजाचा गौरव वाढविला. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाराष्ट्र स्वर्णकार संस्था, वर्धा यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

या यशाचे श्रेय आयुष यांनी आपले गुरु, आई-वडील तसेच सराफा अध्यक्ष देविदास करंडे यांना दिले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि कुटुंबा

ीयांच्या पाठबळामुळे यशाचा हा टप्पा गाठता आला, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

आयुष यांच्या यशामुळे कुटुंबीय, मित्रपरिवार आणि समाजबांधवांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शिक्षणाच्या बळावर स्वप्नांना आकार देणाऱ्या आयुष यांच्या यशातून नव्या पिढीतील विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

समाजसेवेच्या लेकीचा नागपुरात सन्मान; माला ढोमणे यांचा गौरव

वर्धा /जनमाध्यम

समाजासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांच्या निःस्वार्थ सेवेला मिळालेला सन्मान हा केवळ पुरस्कार नसतो, तर तो समाजाच्या विश्वासाची पावती असतो.

वर्धा येथील स्वर्णकार समाजाच्या सामाजिक कार्यकर्त्या माला प्रमोद ढोमणे यांचा महाराष्ट्र स्वर्णकार संस्था, नागपूर यांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

नागपूरचे पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. सामाजिक कार्यातून

समाजबांधवांना आधार देत सातत्याने योगदान देणाऱ्या धोंमणे यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

त्यांच्या गौरवामुळे स्वर्णकार समाजात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून, समाजसेवेसाठी कार्यरत असलेल्या महिलांना या सन्मानातून नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली आहे.

गुन्हेगारी वार्ता

दुचाकीच्या धडकेत व्यक्ती गंभीर जखमी

हिंगणघाट : चौकात उभ्या असलेल्या व्यक्तीला दुचाकीने जोरदार धडक दिल्याने तो गंभीर जखमी झाला. ही घटना छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात घडली. इकबाल पिरमोहम्मद शेख (४५) हे चौकात उभे असताना एमएच २९ बीएन ७६२७ क्रमांकाची दुचाकी निष्काळजीपणे चालवित सम्यक धाबर्डे याने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत इकबाल शेख खाली कोसळून गंभीर जखमी झाले. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदत करून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी जखमी इकबाल शेख यांच्या तक्रारीवरून दुचाकीचालकाविरुद्ध कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. निष्काळजीपणे वाहन चालविल्याने हा अपघात घडल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

पत्नीस काठीने मारहाण

समुद्रपूर : घरी येण्यास सांगितल्याच्या कारणावरून पतीने पत्नीस रस्त्यात अडवून काठीने मारहाण केल्याची घटना नंदोरी ते सावली (वाघ) मार्गावर घडली. नंदकिशोर साखरे, रा. सावली (वाघ), याने पत्नी सोनू हिला चांगले राहण्याचे सांगत घरी येण्यास सांगितले. त्यानंतर सोनू घरी जाण्यास निघाली असता नंदकिशोरने दुचाकीसह रस्त्यात तिला अडविले. यावेळी दोघांमध्ये वाद झाला. संतापलेल्या नंदकिशोरने काठीने सोनूला मारहाण केली. या मारहाणीत सोनू जखमी झाली. घटनेनंतर तिने पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी घटनेची नोंद घेत पुढील तपास सुरू केला आहे.वादातून घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात चर्चा सुरू झाली आहे.

शेजा-यांमध्ये वाद

गिरड : वहिनीला संदेश का करतोस, तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न का करतोस, असे विचारल्याच्या कारणावरून झालेल्या वादात बाप-लेकास काठीने मारहाण करण्यात आली. ही घटना कोरा गावात घडली. देवानंद भोयर याने आकाश भोयर याला त्याच्या वहिनीला संदेश का करतोस आणि तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न का करतोस, असे विचारले. यावरून दोघांमध्ये वाद झाला. वाद वाढल्यानंतर आकाश भोयर व गुलाब भोयर यांनी देवानंद भोयर याला मारहाण करण्यास सुरुवात केली. दरम्यान, वाद सोडविण्यासाठी देवानंदचे वडील मध्यस्थी करण्यासाठी गेले. यावेळी त्यांनाही काठीने मारहाण करून जखमी करण्यात आले. घटनेनंतर दोघांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी संबंधितांविरुद्ध गुन्ह्याची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

घराचे कुलूप तोडून चोरी

वर्धा : घरमालक बाजारासाठी बाहेर गेल्याची संधी साधत घराचे कुलूप तोडून चोरी करणाऱ्या संशयितास नागरिकांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. ही घटना सुजातपूर गावात घडली. दत्ता संभाजी कारलेवार (६०) हे पत्नीसह हिंगणघाट येथे बाजारासाठी गेले होते. दरम्यान, त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडून एक व्यक्ती घरात शिरला. त्यानंतर घरातील किराणा दुकानाचेही कुलूप तोडून साहित्य चोरी करण्याचा प्रयत्न सुरू केला. हा प्रकार सुरू असताना निखिल प्रभाकर कारलेवार हा चोरी करताना आढळून आला. नागरिकांनी त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. घरफोडी व चोरीच्या प्रयत्नाप्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरातील घरांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

क्षुल्लक कारणावरून वाद

पुलगाव : विनाकारण शिवीगाळ करून वाद घालत युवकाला मारहाण केल्याची घटना आठवडी बाजार परिसरात घडली. अक्षय बोदिले (२९), रा. नागपूरफैल, हा आठवडी बाजार परिसरात असताना स्वप्नील रंगारी याने त्याच्याशी विनाकारण वाद घातला. यावेळी स्वप्नीलने अक्षयला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर वाद वाढताच त्याने अक्षयला मारहाण केली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. मारहाणीत अक्षय जखमी झाल्याने त्याने पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रारीची दखल घेत पुलगाव पोलिसांनी स्वप्नील रंगारीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. विनाकारण वाद घालून मारहाण करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक,प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती -४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा ४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक -प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त)-अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष -१४ अंक -२७४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालयः- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन -९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

आदेशांच्या भडिमाराखाली गुरुजी वाकले!

मुलांना शिकवायचे की पोर्टलवर माहिती भरायची? फोटो, अहवाल, ॲप आणि ऑनलाइन कामांच्या वाढत्या व्यापामुळे शिक्षक त्रस्त

अमरावती/का.प्र.

विद्यार्थ्यांना शिकवायचे की शासनाच्या असंख्य पोर्टलवर माहिती भरायची, असा संतप्त सवाल शिक्षकांकडून उपस्थित केला जात आहे. शिक्षण विभागाकडून दररोज येणाऱ्या विविध आदेशांमुळे शिक्षकांचा मोठा वेळ ऑनलाइन माहिती भरणे, फोटो-व्हिडिओ पाठविणे, अहवाल तयार करणे आणि विविध पोर्टल अद्ययावत करण्यात जात आहे. त्यामुळे प्रत्यक्ष अध्ययन-अध्यापन प्रक्रियेवर परिणाम होत असून, शिक्षकांना शिक्षकापेक्षा डेटा एंट्री ऑपरेटर बनविले जात असल्याची तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सकाळी शाळेत पोहोचण्यापूर्वीच व्हॉट्सॲपवर आदेशांचा पाऊस सुरू होतो आणि दिवसभर त्याची पूर्तता करण्यात शिक्षक व्यस्त राहतात. अपार आयडी पूर्ण करणे, नामांकनातील तफावत दूर करणे, एआय इमेज हटविणे, दुहेरी नामांकन काढणे, पीएफएमएसमधील माहिती तपासणे, एमबीयू पूर्ण करणे, यू-डायसवर विद्यार्थ्यांची नोंदणी करणे, निपुण प्लस अपडेट करणे, गणवेश लाभार्थ्यांची माहिती व हार्ड कॉपी जमा करणे, पोषण आहाराची माहिती देणे, किचन गार्डनचे फोटो पाठविणे, पावसाचे पाणी साठवण व्यवस्थेचे छायाचित्र पाठविणे, विविध माहितीपत्रके भरणे, अशी कामांची मोठी यादी शिक्षकांसमोर आहे.विशेष म्हणजे, अनेक आदेशांवर 'अत्यंत आवश्यक' आणि 'सर्वोच्च प्राधान्याचे काम' असा उल्लेख असतो. त्यामुळे कोणते काम प्रथम करायचे आणि कोणते नंतर, असा प्रश्न शिक्षकांसमोर निर्माण झाला आहे. प्रत्येक प्रशासकीय काम सर्वोच्च प्राधान्याचे असल्याचे दिसत असताना प्रत्यक्ष विद्यार्थ्यांचे

अध्यापन मात्र दुय्यम ठरत असल्याची भावना शिक्षकांमध्ये आहे.

शाळा जिवंत असल्याचे पुरावे तयार करण्यातच वेळ

एका शिक्षकाने सांगितले की, दिवसभर विद्यार्थ्यांना शिकविण्यापेक्षा शाळेत विविध उपक्रम सुरू असल्याचे पुरावे तयार करण्यात अधिक वेळ जातो. शाळेचा फोटो, उपक्रमाचा फोटो, पोस्टरचा फोटो, किचन गार्डनचा फोटो, शोषखड्ड्याचा फोटो, उपस्थितीचा स्क्रीनशॉट, पोर्टलवरील नोंद आणि विविध अहवाल, या सगळ्यांची पूर्तता करावी लागते. मात्र विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी प्रत्यक्ष किती वेळ मिळाला, हे विचारणारी तातडीची यंत्रणा दिसत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

अध्यापनाव्यतिरिक्त कामांचे केंद्रीकरण करा

शिक्षकांकडून प्रत्येक कामाचा ऑनलाइन पुरावा मागितला जातो. माहिती वेळेत भरली नाही तर वरिष्ठांकडून आठवण, ताकीद आणि कारवाईचा इशारा दिला जातो. मात्र कोणता विद्यार्थी अभ्यासात मागे आहे, त्याच्या अडचणी काय आहेत, त्याला अतिरिक्त मार्गदर्शन मिळाले का, याबाबत अशी तातडीची यंत्रणा नसल्याचा आरोप शिक्षकांकडून करण्यात येत आहे.

शासनाने अशैक्षणिक कामांपासून शिक्षकांना मुक्त करण्याबाबत भूमिका स्पष्ट केली असली, तरी प्रत्यक्षात विविध उपक्रम आणि ऑनलाइन कामांचा भडिमार सुरूच असल्याची तक्रार आहे.

संगणक चालक, शिपाई नेमण्याचे आदेश गेले कुठे?

प्रत्येक शाळेला संगणक चालक आणि शिपाई उपलब्ध करून देण्याचे आदेश शिक्षण विभागाने यापूर्वी काढले होते. मात्र या आदेशांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कुठे झाली, असा सवालही उपस्थित केला जात आहे. ऑनलाइन कामांचा वाढता व्याप पाहता प्रत्येक शाळेला आवश्यक स्वतंत्र मनुष्यबळ उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे.

नवीन अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण अपूर्ण असतानाच विविध प्रशासकीय कामांचा वाढता ताण शिक्षकांवर असल्याने अध्ययन-अध्यापन प्रक्रियेवर परिणाम होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शिक्षण विभागाने शिक्षकांवरील अनावश्यक प्रशासकीय कामांचा तातडीने आढावा घेऊन अध्यापना व्यतिरिक्त कामांचे केंद्रीकरण करावे, तसेच प्रत्येक शाळेला आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने केली आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीने केळी व्यापारावर नियंत्रण ठेवण्याची मागणी

येणाऱ्या अधिवेशनात प्रश्न मांडण्याचे आ. लवटे यांचे आश्वासन

अंजनगाव सुर्जी/वार्ताहर

अंजनगाव सुर्जी तालुक्यासह परिसरातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना सध्या विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. पिकाच्या विक्रीपासून ते कटाईपर्यंतच्या प्रश्नांमुळे आधीच शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. केळी बाजारभावार असलेले व्यापाऱ्यांचे नियंत्रण (बोर्ड) या मुख्यमुद्द्यावर केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर तोडगा काढण्यासाठी बाजार समितीच्या वतीने समन्वय बैठक घेण्यात आली विधानसभा क्षेत्राचे आ.गजानन लवटे व कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अ‍ॅड. जयंत साबळे आणि यांच्या मार्गदर्शनात ही बैठक पार पडली.

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांनी बाजार समितीकडे निवेदन दिले होते. त्या निवेदनाच्या अनुषंगाने ही बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी केळी पिकाच्या समस्या, बाजारपेठेतील परिस्थिती, वेळेवर न होणारी कटाई तसेच व्यापाऱ्यांकडून होणारे व्यवहार आणि भावाच्या बोर्डाच्या अडचणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

वेळेवर केळीची कटाई न होणे आणि बाजारातील व्यवहारांमुळे शेतकऱ्यांना अपेक्षित मोबदला मिळत नसल्याची भावना उत्पादकांनी व्यक्त केली. व्यापाऱ्यांच्या बोर्डानुसार केळी मालाची विक्री होते व त्यावर व्यापाऱ्यांचे नियंत्रण असते, त्यावर बाजार समितीने नियंत्रण ठेवावे, हा बैठकीचा मुख्य मुद्दा होता.आम्ही शेतकऱ्यांप्रती बांधील आहोत,नियम अधीनियमाच्या मर्यादेत राहुन बोर्ड लावण्यास आम्ही सकारात्मक आहोत' तर आ.गजानन लवटे यांनि शेतकऱ्यांचे प्रश्नावर उत्तर देताना 'नियमनमुक्तीमुळे शेतकरी आणि व्यापारी यांच्या व्यवहारावर नियंत्रण नाही, हीच मुख्य समस्या आहे. शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये म्हणून येत्या ७ डिसेंबर रोजी होणाऱ्या अधिवेशनात बाजार समितीच्या बाहेर व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांना बाजार समितीचे लायसन्स काढूनच व्यापार करणे बंधनकारक करण्याबाबतचा प्रश्न मांडण्यात येईल', अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

या बैठकीला मतदारसंघाचे आ.गजानन लवटे, कृ.उ.बा.स. चे सभापती अ‍ॅड. जयंत साबळे, शेतकरी संघटनेचे गजानन दुधाट, न.प. सदस्य तथा केळी उत्पादक प्रविण नेमाडे, उमेश भोंडे, आशिक अन्सारी, सुयोग खाडे, प्रदीप येवले (ता.अध्यक्ष,रा.कॉ.श.प.), बाजार समिती संचालक शंकरराव चोरे,विकास येवले,सुरेश आडे,संजय काळमेघ, भुजंग कोकाटे,शे. जमील शे. रहमान, मो.सिद्दीक मो.सादिक,प्रदीप इंगळे, सागर घोगरे, व्यावसायिक कमलेश पटेल, सुधीर रसे तथा किसान ब्रिगेडचे कुलदीप मुरतकर,विनोद हागोणे यांच्यासह तालुक्यातील व परिसरातील केळी बागायतदार शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सभेच्या यशस्वीतेसाठी केळी बागायतदार शेतकरी संघाचे तालुकाध्यक्ष अतुल खारोडे व शेतकऱ्यांचे सहकार्य लाभले.

राखी नात्यांची, संकल्प सुरक्षित समाजाचा..!

आज सामूहिक रक्षाबंधन सोहळा, जय हिंद क्रीडा मंडळाचा उपक्रम

डॉ. निलेश विश्वकर्मा यांच्या नेतृत्वात आयोजन

चांदूर रेल्वे/वार्ताहर

रक्षाबंधन म्हणजे केवळ मनगटावर राखी बांधण्याचा सण नाही, तर भाऊ-बहिणीच्या प्रेमाला, विश्वासाला आणि आयुष्यभर एकमेकांच्या पाठीशी उभे राहण्याच्या भावनेला उजाळा देणारा पवित्र सोहळा आहे. याच भावनेला सामाजिक बांधिलकीची जोड देत चांदूर रेल्वे येथे जय हिंद क्रीडा व व्यायाम प्रसारक मंडळाच्या वतीने भव्य सामूहिक रक्षाबंधन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. आज, ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता संताबाई यादव मंगल कार्यालय, चांदूर रेल्वे येथे हा सोहळा होणार असून, जय हिंद क्रीडा मंडळाचे संस्थापक, वंचित बहुजन आघाडीचे युवा प्रदेशाध्यक्ष तथा नगरसेवक डॉ. निलेश विश्वकर्मा यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या कार्यक्रमात चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे व नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील माता-भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाला नगराध्यक्षा प्रा. प्रियंका निलेश विश्वकर्मा यांची ही उपस्थिती राहणार आहे.

जय हिंद क्रीडा व व्यायाम प्रसारक मंडळाने गेल्या अनेक वर्षांपासून क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात विविध

उपक्रम राबवून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.या कार्याची शासनाकडूनही दखल घेण्यात आली होती. दरम्यान, माता-भगिनींचा सन्मान आणि भाऊ-बहिणीच्या प्रेमाचे नाते अधिक घट्ट करण्यासाठी मंडळाने गेल्या नऊ वर्षांपासून सामूहिक रक्षाबंधनाची परंपरा सुरू ठेवली आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही या सोहळ्याच्या निमित्ताने सर्व भगिनींसाठी रक्षाबंधनाची भेट देण्यात येणार आहे. 'बहिणींच्या सुख-दुःखात सदैव सोबत राहू, त्यांच्या प्रश्नांसाठी आणि सुरक्षेसाठी नेहमीच पुढे राहू' या भावनेतून हा उपक्रम राबविला जात असल्याचे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.सर्व भगिनींनी आग्रहाचे निमंत्रण स्वीकारून मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि आपल्या उपस्थितीने या बंधुभावाच्या सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन जय हिंद क्रीडा व व्यायाम प्रसारक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

शासकीय माध्यमिक आश्रम शाळेत राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

वरुड - शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, माणिकपूर येथे राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिनाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृती, आणि खेळाडूवृत्ती विकसित व्हावी या उद्देशाने विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

मणिबाई गुजराती हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेविषयी जागरूकता

अमरावती/का.प्र.

या बदलत्या युगात डिजिटल तंत्रज्ञान आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. ऑनलाइन शिक्षण, बँकिंग, सोशल मीडिया आणि डिजिटल व्यवहारांच्या वाढत्या वापरामुळे सायबर गुन्हेगारीचा धोकाही वाढत आहे. हे लक्षात घेऊन, 'द गुजराती एज्युकेशन सोसायटी'द्वारे चालवल्या जाणाऱ्या मणिबाई गुजराती हायस्कूल आणि अंबापेठ, अमरावती येथील श्रीमती एस. टी. कापाडिया गुजराती ज्युनियर कॉलेजने सायबर सुरक्षा आणि जागृतीचे महत्त्व' या विषयावर एका विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे पर्यवेक्षक अरविंद हिरपारा यांनी भूषवले आणि अमरावती शहर पोलीस सायबर सुरक्षा कक्षाचे पोलीस कॉन्स्टेबल राहुल चरथल व हेड कॉन्स्टेबल महेश वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेच्या विविध पैलूंबद्दल माहिती दिली.

महाराष्ट्र पोलीस सायबर सुरक्षा कक्षाचे अनिकेत संजय राव वानखेडे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

मार्गदर्शन सत्रादरम्यान, सायबर तज्ञांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष घटना आणि व्हिडिओंच्या माध्यमातून ऑनलाइन फसवणूक, बनावट कॉल्स आणि लिंक्स, सोशल मीडियावरील गुन्हे, डिजिटल अटक, ओटीपी फसवणूक आणि बनावट एपीके फाइल्स यांबद्दल समजावून सांगितले. चुकून एखादी संशयास्पद एपीके फाइल डाउनलोड झाल्यास, ती तात्काळ अनइन्स्टॉल करावी आणि सायबर फसवणुकीच्या बाबतीत तात्काळ १९३० सायबर हेल्पलाइनवर तक्रार दाखल करावी, असा सल्ला देण्यात आला. सायबर गुन्ह्याची तक्रार करण्यासाठी संबंधित सायबर सुरक्षा कक्षाशी संपर्क साधता येईल, अशी माहितीही विद्यार्थ्यांना देण्यात आली.

या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

शाळेच्या मुख्याध्या पिकाअंजली देव यांनी, कार्यक्रमाच्या यशात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे योगदान देणाऱ्या सर्व पोलीस अधिकारी, पाहुणे, शिक्षक, कर्मचारी आणि सहकाऱ्यांना मार्गदर्शन केले आणि सायबर सुरक्षेचे आवाहन केले. शारीरिक शिक्षण विभागाचे मंगेश व्यवहारे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आणि केंद्रीय विद्यालयाचे शिक्षक अनिल तिवारी यांनी आभार प्रदर्शन केले.

जागरूक रहा, सुरक्षित रहा आणि आपले डिजिटल भविष्य सुरक्षित करा' या घोषवाक्यासह कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.

टर्मिनिया प्रजातीच्या वृक्ष लागवडीने खुलणार शहरातील दुभाजकांचे सौंदर्य

'ग्रीन अमरावती' संकल्पनेतून दुभाजकांचा कायापालट - आ. सुलभा खोडके

अमरावती/का.प्र.

अमरावती शहराला स्वच्छ, सुंदर, हरित व पर्यावरणपूरक बनविण्याच्या उद्देशाने आ.सुलभा खोडके यांच्या संकल्पनेतून 'ग्रीन अमरावती' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत शहरातील विविध दुभाजकांवर टर्मिनिया प्रजातीच्या वृक्षांची लागवड करून हिरवळ वाढविण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. अमरावती महानगर पालिकेच्या अधिनस्त असलेल्या ६ तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या ७ दुभाजकांमध्ये टर्मिनिया प्रजातीची वृक्ष लागवड होत असल्याने अमरावती शहराच्या सौंदर्य व आकर्षणात भर पडणार आहे.

अमरावती शहरात पायाभूत सुविधांच्या पूर्ततेसह जनसुविधांचे विकास प्रकल्प मार्गी लागत असतांना अमरावती शहराचे वैभव,लौकिक व आकर्षण वाढविण्याच्या दृष्टीने शहरातील दुभाजकांमधील हिरवळ सजविण्यासाठी सुद्धा आ.सुलभा खोडके यांनी पुढाकार घेतला. या संदर्भात महापालिकेत अनेकदा बैठका घेऊन उद्यान विभागाचा आढावा घेत शहरातील वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन, महापालिकांच्या उद्यानाची देखभाल व संगोपन, तसेच वृक्षांची निगा राखण्याबाबत सुद्धा आ.सुलभा खोडके यांनी मनपा उद्यान विभागाला वेळोवेळी सूचना केल्या आहे.त्या अनुषंगाने आता अमरावती महानगर पालिकेच्या वतीने शहरातील सर्व दुभाजकांमध्ये टर्मिनिया वृक्ष लागवड करण्यास सुरुवात झाली आहे. नुकताच रेल्वे स्टेशन चौकातुन आ. सुलभा खोडके यांच्या हस्ते या अभियानाचा शुभारंभ देखील करण्यात आला. शहरातील दुभाजकांचे सौंदर्य खुलण्यासोबतच प्रदूषण कमी करण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनाला चालना देण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. 'ग्रीन सिटी-क्लीन सिटी' म्हणून अमरावतीची ओळख निर्माण करण्यासाठी नागरिकांनीही वृक्ष लागवड व संवर्धनात सहभागी व्हावे, असे आवाहन आ. सुलभा खोडके यांनी केले.

आकर्षक टर्मिनिया प्रजातीची हिरवळ वृक्ष

अमरावती महानगर पालिकेच्या अधिनस्त असलेल्या रस्त्यामधील जुना कॉटन मार्केट ते शेंगाव नाका चौक, हमालपुरा ते काँग्रेस नगर,कोर्ट ते सुंदरलाल चौक,बियाणी चौक ते इर्विन चौक, पोलीस पेट्रोल पंप ते पंचवटी चौक, अमरावती बसस्थानक ते रुख्मिणी नगर चौक अशा ६ दुभाजकांमध्ये टर्मिनिया वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. त्याच बरोबर शहरातील काही रस्ते हे सार्वजनिक बांधकाम विभाग यंत्रणेच्या अधिनस्त आहे. ज्यामध्ये रेल्वे स्टेशन चौक ते चपराशी पुरा, इर्विन चौक ते रेल्वे स्टेशन, इर्विन चौक ते हॉटेल गौरी इन, कठोरा नाका ते आराधना चौक, बियाणी चौक ते जुना बायपास, व राजापेठ - बडनेरा रोड अशा रस्त्यांवरील दुभाजके आता टर्मिनिया प्रजातींच्या वृक्ष लागवडीच्या खुलून दिसणार आहे.

संक्षिप्त

विद्यार्थ्यांनी साजरे केले अनोखे रक्षाबंधन

अमरावती - लक्ष्मीनारायण नगर येथील श्रीराम प्राथमिक शाळेत रक्षाबंधन अनोख्या पद्धतीने साजरे करण्यात आले. विद्यार्थ्यांनी झाडाला राखी बांधून 'वृक्ष वाचवा, पर्यावरण वाचवा' असा संदेश दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धन व संरक्षणाचा संकल्प केला. शिक्षक रुपेश टाले यांनी तब्बल दोन फुटांची आकर्षक राखी तयार केली होती. विद्यार्थ्यांनी उत्साहात ही राखी झाडाला बांधली. 'झाडे जगली तरच पर्यावरण जगेल' असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. शाळेच्या या अभिनव उपक्रमाचे पालक व नागरिकांनी कौतुक केले.

मार्की येथे शिक्षण परिषद उत्साहात

आसेगाव पूर्णा - भातकुली तालुक्यातील मार्की येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाला पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी रामेश्वर माळवे, मार्कीच्या सरपंच रोषणा सुरोशे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा मीना पुढारे, उपाध्यक्षा उज्वला बीरे तसेच मूल्यवर्धनच्या तालुका समन्वयक ज्योती औघड यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी गटशिक्षणाधिकारी रामेश्वर माळवे यांनी शिक्षकांना विविध शैक्षणिक बाबींविषयी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. पूर्णानगर केंद्राचे केंद्र समन्वयक शैलेश मांदळे यांनी विविध प्रशासकीय बाबींवर मार्गदर्शन केले. तर ज्योतीताई औघड यांनी मूल्यवर्धन उपक्रमाची माहिती देत त्याचे शैक्षणिक महत्त्व स्पष्ट केले.शिक्षण परिषदेत शीला मसराम, अश्विनी जगताप आणि वैशाली नांदने यांनी दिलेल्या विषयांवर प्रात्यक्षिकासह प्रभावी तासिका सादर केल्या. यावेळी पूर्णानगर केंद्रातील सर्व मुख्याध्यापक तसेच शिक्षक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन येवले मॅडम यांनी केले. रसे यांनी प्रास्ताविक केले, तर महल्ले यांनी उपस्थितांचे आभार मानले. परिषदेस उपस्थित पाहुणे व शिक्षकांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.



कस्तुराबाई जैन विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन

शिराळा - येथील महाराष्ट्र शिक्षण समिती शिराळा व्दारा संचालित कस्तुराबाई जैन विद्यालय शिराळा येथे हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिवस म्हणून साजरी करण्यात आली. सर्वप्रथम मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले. यानंतर विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ एस.आर. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मेजर ध्यानचंद यांच्या जिवन कार्याबद्दल माहिती दिली. यानंतर विद्यालयाच्या क्रिडागनावर क्रिडा दिवस निमित्त कबड्डी लंगडी,लगोरी खोखो यासारखे विविध भारतीय क्रिडाप्रकार घेण्यात आले.यात सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला.याप्रसंगी विद्यालयाचे क्रीडा शिक्षक काळणे, चंचल देशमुख, खांदे, ईशान देशमुख, टी के देशमुख उपस्थित होते.

पीडीएमसी कडून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांची भेट

अमरावती - श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित दादासाहेब बोके विद्यालय, वरखेड येथील गरजू विद्यार्थ्यांसाठी नोटबुक्स व विविध शालेय उपयोगी साहित्य भेट स्वरूपात देण्यात आले.हे शैक्षणिक साहित्य अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांच्या हस्ते विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. भारती राऊत (वाटाणे) यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.विशेष म्हणजे, अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त शिक्षकांनी त्यांना पुष्पगुच्छ न देता नोटबुक्स व शालेय उपयोगी साहित्य भेट स्वरूपात दिले होते. या भेटीचा उपयोग गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी व्हावा, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सदर साहित्य विद्यालयास देण्यात आले.यावेळी दादासाहेब बोके विदयालयाचा स्टाफ, तसेच प्रशासकीय अधिकारी डॉ स्वप्नील मोहोड, डॉ श्रीकांत फुटाणे, प्रशांत अडसोड, संजय वाटाणे, किशोर इंगळे, सचिन कळसकर, ऋग्वेद देशमुख उपस्थित होते.

बबलू देशमुख यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमानी साजरा

अचलपूर - अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त अचलपूर तालुका ग्रामीण, अचलपूर शहर तसेच परतवाडा शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने चांदूरबाजार मार्गावरील विसावा वृद्धाश्रमात अन्नदान व वृक्षारोपणाचा प्रेरणादायी उपक्रम पार पडला. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीची जाणीव जपत मानवतेचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.यावेळी आश्रमातील अनाथ व वृद्धांना प्रेमपूर्वक भोजन देण्यात आले. स्नेह, आपुलकी आणि संवेदनशीलतेने ओतप्रोत भरलेला हा क्षण उपस्थितांसाठी समाधानाचा ठरला. त्याचबरोबर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला,ज्यातून वाढदिवस म्हणजे केवळ उत्सव नव्हे, तर समाजासाठी काहीतरी देण्याची संधी हा विचार अधोरेखित झाला. कार्यक्रमास काँग्रेस कमिटीचे ग्रामीण व शहरातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी तालुकाध्यक्ष नामदेवराव तनपुरे, शहराध्यक्ष श्रीकांत झोडपे, राहुल गवई ,नगरसेवक सईद मौलाना, सचिदानंद बेलसरे, राहुल गाठे,प्रमोद कांबळे, प्रवीण हुड, दिनेश वानखडे, विशाल खानझोडे,विजय शिरसुधे, धीरज आपले, रमेश रावेकर, राम उमक, फिरोज भाई, गौरव डकरे, दिनेश, सुधीर वानखेडे, राजेंद्र दाभाडे, घनश्याम वानखडे,किसन,तंतरपाळे,जय घोरे, योगेश काळे, यश चौखंडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

‘आदेश’ नसतानाही शुल्क; ‘आदेश’ असूनही मोजणी नाही!

गाजीपूर प्रकरणानंतर नगरपरिषदेचे पत्रही चर्चेत

अकोट भूमी अभिलेखच्या कारभाराचा विरोधाभास उघड

अॅड. समीर ठाकूर

अकोला : अकोट तालुक्यातील गाजीपूर येथील गट नंबर ३५च्या मोजणीप्रकरणाने अकोट भूमी अभिलेख विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. उपजिल्हाधिकाऱ्यांच्या पत्रात मोजणीचा स्पष्ट आदेश नसतानाही शुल्क स्वीकारून तत्परता दाखविली जाते; मात्र अकोट नगरपरिषदेच्या सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमण मोजणीच्या थेट पत्रावर महिनाभरापासून कार्यवाही रखडलेली आहे. त्यामुळे ‘भूमी अभिलेख विभागात नियम समान की माणसागणिक नियम बदलतात?’ असा सवाल उपस्थित झाला आहे.

७ जुलै २०२६ रोजी उपजिल्हाधिकारी महसूल यांनी गाजीपूर येथील गट नंबर ३५ संदर्भात चौकशी, पंचनामा, स्थळ पाहणी आणि अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. या पत्राची प्रत उपअधीक्षक, भूमी अभिलेख यांना माहितीस्तव देण्यात आली होती. मात्र, उपलब्ध पत्रात मोजणी करण्याचा किंवा तक्रारदाराकडून मोजणी शुल्क स्वीकारण्याचा स्पष्ट आदेश नसतानाही त्रयस्थ तक्रारदाराकडून शुल्क स्वीकारण्यात आल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे ‘प्रतिलिपी’च ‘आदेश’ कधी झाली, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

दुसरीकडे, २ जुलै रोजी अकोट नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी भूमी अभिलेख विभागाला थेट पत्र देत नझूल शीट क्र. १८ व नझूल प्लॉट क्र. १४ मधील मंजूर अभिन्यासातील सहा मीटर सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमणाची मोजणी व सीमांकन करण्याची मागणी केली. यासाठीचा खर्च नगरपरिषद करणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. मात्र, महिन्याहून अधिक काळ उलटूनही मोजणीला मुहूर्त मिळालेला नाही.

एका प्रकरणात स्पष्ट आदेश नसतानाही शुल्क स्वीकारण्याची लगबग आणि दुसऱ्या प्रकरणात स्पष्ट शासकीय मागणी असतानाही दिरंगाई, हा विरोधाभास नेमका कशामुळे? जनहिताच्या कामापेक्षा एका खासगी तक्रारीला प्राधान्य का? या प्रश्नांची उत्तरे आता प्रशासनाला द्यावी लागणार आहेत.

गट नंबर ३५ प्रकरणात मूळ जमीनमालक भीमराव कासदे यांनी लेखी हरकत घेतल्यानंतर प्रत्यक्ष मोजणी होऊ शकली नाही. मोजणीच्या दिवशीच्या पंचनाम्यात जमीनमालक उपस्थित नसल्याचे आणि त्यांचा कार्यालयात आक्षेप असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मग मोजणीपूर्वी मूळ जमीनमालकाला पूर्वसूचना देण्यात आली होती का? त्रयस्थ तक्रारदाराच्या अर्जावर शुल्क स्वीकारण्याचा आधार काय? आणि मोजणी थांबविण्याची वेळ का आली? हे प्रश्न अद्याप कायम आहेत.

याच प्रकरणात मोजणी शुल्क कोणत्या नियमाखाली स्वीकारले, असा सवाल भूमी अभिलेखचे उपअधीक्षक श्री. पालवे यांना विचारण्यात आला असता ‘तुम्हाला जे करायचे ते करा, जे छापायचे ते छापा,’ अशी प्रतिक्रिया त्यांच्याकडून देण्यात आली. अधिकाऱ्यांकडून नियमाचे स्पष्टीकरण अपेक्षित असताना माध्यमांनाच आव्हान देणारी भूमिका घेतली गेल्याने संशय अधिक गडद झाला आहे.

आता जिल्हा प्रशासनाने केवळ फाईल पुढे ढकलण्याऐवजी या दोन्ही प्रकरणांची तुलनात्मक चौकशी करण्याची गरज आहे. कोणत्या आदेशावर मोजणी झाली? शुल्क कोणाकडून व कोणत्या नियमाने स्वीकारले? नगरपरिषदेच्या थेट पत्रावर कार्यवाही का झाली नाही? या प्रश्नांची कागदोपत्री उत्तरे मिळाल्याशिवाय ‘दुहेरी मापदंडा’चा संशय दूर होणार नाही.

’आदेश नसताना तत्परता आणि आदेश असताना दिरंगाई’ असा अकोट भूमी अभिलेखचा हा कारभार नेमका कोणाच्या सोयीचा? हा प्रश्न केवळ एका जमीनमालकाचा नसून, संपूर्ण प्रशासकीय पारदर्शकतेचा बनला आहे.

सहा मीटरच्या रस्त्याची मोजणी अजूनही रखडली!

नगरपरिषदेचे थेट पत्र, सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमणाचा प्रश्न आणि मोजणीचा खर्च देण्याची स्पष्ट तयारी. तरीही महिन्याहून अधिक काळ कार्यवाही नाही. जनहिताच्या कामाला ‘ब्रेक’ आणि अन्य प्रकरणात ‘वेग’ का? भूमी अभिलेख विभागाच्या या विरोधाभासी कार्यपद्धतीचा हिशेब कोण घेणार? असा संतप्त प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

प्रतिलिपीला आदेशाचा दर्जा कुणी दिला?

७ जुलैच्या पत्रात चौकशी, पंचनामा, स्थळ पाहणी व अहवालाचे निर्देश; मग मोजणी शुल्क स्वीकारण्याचा स्पष्ट आदेश कुठे? प्रतिलिपीच्या आधारे शुल्क स्वीकारण्याचा अधिकार कुणी दिला? नियम कोणता? या प्रश्नांची उत्तरे भूमी अभिलेख विभागाने स्पष्ट करणे आवश्यक आहे.

शाळा संचालकाला झुकते माप तर नाही ना ?

अकोट नगरपरिषदेच्या २ जुलै २०२६ रोजीच्या पत्रामागे एका खाजगी शाळा संचालकाच्या कथित अतिक्रमणाचा गंभीर विषय आहे. या अतिक्रमणाबाबत नगरपरिषदेकडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून, तक्रारदार जयदीप चऱ्हाटे गेल्या अनेक महिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. शहरभर चर्चेत असलेल्या या संवेदनशील प्रकरणात मुख्याधिकाऱ्यांनी भूमी अभिलेख विभागाकडे मोजणी व सीमांकनाची स्पष्ट मागणी केली. मोजणीचा खर्चही नगरपरिषद करणार असल्याचे पत्रात नमूद आहे.

मात्र, २ जुलैच्या पत्राला आता जवळपास दोन महिने उलटत आले तरी भूमी अभिलेख विभागातील फाईल पुढे सरकत नसल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमणाचा प्रश्न असताना एवढी दिरंगाई का? मोजणी रखडण्यामागे नेमके कारण काय? आणि अतिक्रमणाचा आरोप असलेल्या शाळा संचालकाला या विलंबाचा फायदा होत आहे का? भूमी अभिलेख विभागाने संबंधितांशी कोणत्याही प्रकारची ‘हातमिळवणी’ केली नाही ना, असा संशय व्यक्त होत असून, या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी होत आहे.

हरणाची शिकार करताना गोळी लागून शेतकरी गंभीर जखमी

चांदूरबाजार पोलिसांकडून शिकाऱ्यांचा शोध सुरू

-चिंचोली काळे येथील घटना

बेलोरा/प्रतिनिधी:-

चांदूरबाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चिंचोली काळे येथे एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. शेतात हरणाची शिकार करणाऱ्या शिकाऱ्यांनी झाडलेली गोळी एका शेतकऱ्याच्या मांडीत घुसल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. ही घटना रविवारी सकाळी १०:३० ते ११:०० वाजताच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार, चिंचोली काळे येथील महेंद्र शंकरराव शिरसाट यांच्या शेतात प्रशांत गोवर्धनराव मोहोळ (वय ३५, रा. चिंचोली काळे) हे फवारणीचे काम करत होते. याचदरम्यान बंदूक

हातात घेतलेले चार अज्ञात इसम हरणाची शिकार करण्याच्या उद्देशाने शेतात घुसले. शिकाऱ्यांनी हरणांच्या कळपावर गोळी झाडली, मात्र दुर्दैवाने ती गोळी हरणाला न लागता शेतात काम करणाऱ्या प्रशांत यांच्या मांडीत जाऊन घुसली.

आपल्याकडून शेतकरी जखमी झाल्याचे लक्षात येताच शिकाऱ्यांनी घटनास्थळावरून पळ काढला. घटनेनंतर आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी तातडीने धाव घेत जखमी प्रशांत यांना उपचारासाठी अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले.घटनेची माहिती मिळताच चांदूरबाजार पोलीस ठाण्याचे ठाणेदार सोनवणे यांनी तातडीने पावले उचलत जखमीचा जबाब नोंदवण्यासाठी पोलिसांचे एक पथक अमरावती रुग्णालयाकडे रवाना केले. चांदूरबाजार पोलीस सध्या या अज्ञात शिकाऱ्यांचा तीव्र शोध घेत आहेत.

मोठा अनर्थ टळला; वन विभागावर संताप- ही गोळी जर शेतकऱ्याच्या छातीवर किंवा डोक्यावर लागली असती, तर प्रशांत यांचा जागीच मृत्यू झाला असता आणि मोठा अनर्थ घडला असता. ☞(पान २ वर)

आठवडी बाजारात एकाची हत्या, दुसरा गंभीर

दारू दुकानाबाहेर धारदार शस्त्रांनी हल्ला

-बडनेरा पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू

अमरावती/प्रतिनिधी:-

बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आठवडी बाजार परिसरात रविवारी ३० ऑगस्ट रोजी रात्री आपसी वादातून झालेल्या रक्तरंजित संघर्षात एका तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली, तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. दारूच्या दुकानाबाहेर धारदार शस्त्रांनी झालेल्या या हल्ल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, गुलिस्ता नगर



परिसरातील रहिवासी शेख कासिम याच्यावर काही जणांनी धारदार शस्त्रांनी हल्ला केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या कासिमचा घटनास्थळीच मृत्यू झाला. त्याचवेळी सोहेब शाह सरदार शाह हा देखील हल्ल्यात गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आठवडी बाजारातील दारूच्या दुकानाबाहेर आपसी वादाचे पर्यवसान ☞(पान २ वर)

नरभक्षक वाघिणीची मोर्शीत दहशत कायम

गाईची शिकार, -वनविभागाकडून शोध सुरू

मोर्शी/प्रतिनिधी:- मोर्शी तालुक्यातील जुना भांबोरा शेतशिवारात दोन दिवसांपूर्वी नरभक्षक वाघिणीने शेतकरी चरणदास वासुदेव इखे यांच्यावर हल्ला केल्यामुळे त्यांना आपला जीव गमवावा लागला. काल दि.२९ ऑगस्ट रोजी पुन्हा मोर्शी खरेदी विक्री संघाचे संचालक स्वप्निल पाथरे यांच्या एका गाईला जखमी करून दुसऱ्या गाईची शिकार केल्याने ती गाय मृत्युमुखी पडल्याची घटना आज दि.३० ऑगस्ट रोजी उघडकीस आली.

त्यामुळे आता पुन्हा

भांबोरा,कवठाळ, राजुरवाडीसह इतर गावातील नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे.कवठाळ येथील स्वप्निल पाथरे यांचे ७० ते ८० जनावरे राजेंद्र कोकाटे व प्रेमदास तायडे या दोन गुराख्यांनी त्यांच्या मालकीच्या पडीत शेतात चारण्यासाठी नेले होते. त्यावेळी कोकाटे यांना वाघ दिसताच त्यांनी दुसऱ्या रस्त्याने गावाकडे धूम ठोकली. ☞(पान २ वर)

तक्रार निवारण शिबिरातच अन्यायाचा कहर!

-ग्रामपंचायत कार्यालयात महिलेला मारहाण, -जातिवाचक शिवीगाळ; संतापजनक आरोप!

अचलपूर/प्रतिनिधी:-

जनतेच्या तक्रारी ऐकून त्यांना न्याय देण्यासाठी आयोजित केलेल्या तक्रार निवारण शिबिरातच एका महिलेचा छळ झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अचलपूर तालुक्यातील कविठा बु. येथील ग्रामपंचायत कार्यालयात २८ जुलै २०२६ रोजी हा प्रकार घडल्याचा आरोप पीडित महिलेने केला आहे. सर्वांसमक्ष मारहाण, जातिवाचक शिवीगाळ आणि कपडे काढण्याचा प्रयत्न करून विनयभंग केल्याचा गंभीर आरोप करण्यात आल्याने या घटनेने प्रशासनाच्या

कार्यपद्धतीवरच संतप्त सवाल उपस्थित केले आहेत.

तक्रार निवारण शिबिर म्हणजे नागरिकांना आपली व्यथा मांडण्यासाठी मिळणारे व्यासपीठ. मात्र, याच ठिकाणी महिलेचा अपमान आणि मारहाण झाल्याचा आरोप होत असेल तर सामान्य नागरिकांनी न्यायाची अपेक्षा कोणाकडून करायची, असा प्रश्न निर्माण झाला आहे. पीडित महिलेच्या तक्रारीनुसार, शिबिरादरम्यान गावातील काही व्यक्तींनी तिच्याशी अश्लील तसेच जातिवाचक शब्दांत शिवीगाळ केली. त्यानंतर तिच्यावर मारहाण करण्यात आली. एवढेच नव्हे तर अंगावरील कपडे काढण्याचा प्रयत्न करून विनयभंग केल्याचाही गंभीर आरोप तिने केला आहे.

या प्रकरणी चार व्यक्तींविरुद्ध नावाने तक्रार दाखल करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करताना काही आरोपींची नावे वगळण्यात ☞(पान २ वर)

आयोडिनयुक्त मीठ, टाटा सॉल्टकडून जनजागृती

अमरावती : आयोडिनयुक्त मीठाचा वापर आयोडिन कमतरता टाळण्यासाठी आणि थायरॉईडचे कार्य सुरळीत ठेवण्यासाठी महत्त्वाचा आहे. गर्भवती महिला व मुलांच्या मेंदूच्या विकासासाठी आयोडिन आवश्यक असून, याबाबत जनजागृतीची गरज आहे. टाटा सॉल्टकडून गुणवत्तापूर्ण आयोडिनयुक्त मीठाच्या वापराबाबत जनजागृती आणि प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यावर भर दिला जात आहे. आयोडिनयुक्त मीठाचा वापर आयोडिन कमतरता टाळण्यासाठी आणि थायरॉईडचे कार्य सुरळीत

ठेवण्यासाठी महत्त्वाचा आहे. गर्भवती महिला व मुलांच्या मेंदूच्या विकासासाठी आयोडिन आवश्यक असून, याबाबत जनजागृतीची गरज आहे.

टाटा सॉल्टकडून गुणवत्तापूर्ण आयोडिनयुक्त मीठाच्या वापराबाबत जनजागृती आणि प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यावर भर दिला जात आहे.

दलित वस्त्यांच्या प्रश्नावर अचलपूर नगर परिषदेची ‘मुजोरी’!

-आयोगाचा आदेश तीन वर्षे दफन, -प्रशासनाला जाग येणार तरी कधी?

अचलपूर/प्रतिनिधी:-

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचा आदेशही अचलपूर नगर परिषद प्रशासनाच्या जाड कातडीला भेदू शकला नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया आता उमटू लागली आहे. दलित वस्त्यांची गणना करून त्या अधिकृतरीत्या घोषित कराव्यात, तेथे पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात आणि त्याबाबतचा अहवाल सादर करावा, असा स्पष्ट आदेश आयोगाने दिलेला असतानाही तब्बल तीन वर्षे त्याची अंमलबजावणी न होणे हा प्रशासनाच्या कारभारावरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा प्रकार आहे.

अचलपूर शहरातील नगर परिषद हद्दीतील दलित वस्त्यांची गणना, त्यांना अधिकृत दर्जा आणि मूलभूत सुविधांचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. याच प्रश्नाची दखल घेत महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोग, वरळी, मुंबई यांनी २० सप्टेंबर २०२२ रोजी पत्र क्रमांक २८९० अन्वये जिल्हाधिकारी, अमरावती आणि अचलपूर नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडून

अहवाल मागविला होता. आयोगाने निर्देश दिले, पण अचलपूरच्या प्रशासनाने त्याची किती गांभीर्याने दखल घेतली, याचे उत्तर आजवर मिळालेले नाही.

पहिल्या आदेशानंतरही प्रशासन हलले नाही. त्यामुळे आयोगाला पुन्हा स्मरणपत्र काढावे लागले. ३१ मार्च २०२३ रोजी जा.क्र. म.रा.अ.जा.जा.आ./वाशिम/प्र.क्र. ११६-२०२२/१६४५ अन्वये तातडीने कार्यवाही करून सद्यस्थितीचा अहवाल सादर करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. मात्र या दुसऱ्या आदेशालाही आता तीन वर्षांहून अधिक काळ लोटला. आदेश देणारा आयोग वैधानिक; प्रश्न घटनात्मक अधिकारांचा; मात्र अंमलबजावणी करणारे प्रशासन मात्र ढिम्म! हा प्रकार नेमका कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अचलपूर शहराध्यक्ष किशोर केशवराव मोहोड यांनी २०१८ पासून या प्रश्नासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याचे म्हटले आहे. वर्षानुवर्षे निवेदने, मागण्या आणि पाठपुरावा करूनही दलित वस्त्यांचा प्रश्न प्रशासनाच्या फाईलमध्येच अडकून पडत असेल, तर त्या फाईलींवर धूळ साचली की प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर, असा सवाल आता विचारला जात आहे.

दलित वस्त्यांना रस्ते, नाल्या, पाणी, स्वच्छता, पथदिवे आणि अन्य मूलभूत सुविधा मिळणे हा कोणाचा उपकार नाही, तर नागरिकांचा अधिकार आहे. शासनाच्या योजना आणि निधी उपलब्ध असताना वस्त्यांनाच अधिकृत दर्जा देण्यास टाळाटाळ केली जात असेल तर विकासाच्या नावाखाली नेमका कोणाचा विकास केला जात आहे, याचा जाब प्रशासनाने द्यायलाच हवा.

त्याहून गंभीर आरोप म्हणजे दलित वस्ती सुधार योजनेचा निधी अन्यत्र वळविण्यात आला आहे काय, याची चौकशी करण्याची मागणी आरपीआयने केली आहे. निधी आला ☞(पान २ वर)

विहिरीत आढळलेल्या महिलेच्या खुनाचा उलगडा

-पतीला पांढरकवड्यात अटक -हत्या करून हात-पाय बांधून मृतदेह विहिरीत फेकला

-माहुली पोलिसांचा तामिळनाडूपासून पांढरकवड्यापर्यंत पाठलाग

अमरावती/प्रतिनिधी:-

माहुली जहांगीर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शेतातील विहिरीत महिलेचा मृतदेह आढळून आला होता. या खुनाच्या प्रकरणाचा पोलिसांनी छडा लावला आहे. महिलेची हत्या करून तिचे हात-पाय बांधून मृतदेह विहिरीत फेकल्याची कबुली दिल्यानंतर तिचा पती दशरथ गुरुप्रसाद मांगुळकर (वय ३७, रा. सिवनी, ता. जि. पांढुर्णा, मध्यप्रदेश) याला पांढरकवडा, यवतमाळ येथून पोलिसांनी अटक केली.

माहुली जहांगीर येथील शेतमालक मो. अयाज मो. हनीफ (वय ६६) यांनी २६ ऑगस्ट रोजी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यांच्या शेतात मध्यप्रदेशातील सिवनी येथील दशरथ मांगुळकर व त्याची पत्नी पूजा मांगुळकर हे कामासाठी राहत होते. ४ जुलै रोजी शेतात गेले असता पूजा दिसून आली नाही. याबाबत तिच्या पतीकडे विचारणा केली असता, तिने दुसरे लग्न केल्याचे सांगून त्यानेही ५ जुलै रोजी काम सोडले.

दरम्यान, २४ ऑगस्ट रोजी दशरथ याचा फिर्यादीला फोन

आला. पूजा हिचा मृतदेह शेतातील विहिरीत असल्याची माहिती मिळाल्याचे त्याने सांगितले आणि विहिरीत पाहण्यास सांगितले. त्यानुसार फिर्यादीने शेतात जाऊन पाहणी केली असता पूजाचा मृतदेह विहिरीत तरंगताना आढळून आला. अज्ञात व्यक्तीने तिची हत्या करून मृतदेह विहिरीत टाकल्याच्या तक्रारीवरून माहुली जहांगीर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला. तामिळनाडूपासून पांढरकवड्यापर्यंत पाठलाग-

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी आरोपीला तत्काळ अटक करून गुन्ह्याचा उलगडा करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार माहुली पोलिसांचे विशेष तपास पथक तयार करण्यात आले. गोपनीय माहिती तसेच तांत्रिक ☞(पान २ वर)

‘दवाखान्याचे काम’ सांगून चोरीच्या दुचाकींची विक्री

दोघांना ठोकल्या बेड्या,दोन मोटरसायकली जप्त

अमरावती/प्रतिनिधी:-

‘दवाखान्याचे काम आहे, गाडीची कागदपत्रे नंतर देतो,’ असे सांगून चोरीच्या मोटरसायकलींची विक्री करणाऱ्या दर्यापूर तालुक्यातील दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. आरोपींकडून चोरीच्या दोन हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकली, असा एकूण सुमारे ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे दर्यापूर पोलिस ठाण्यात दाखल असलेला मोटरसायकल चोरीचा गुन्हाही उघडकीस आला आहे.

अमरावती ग्रामीण जिल्ह्यात मोटरसायकल चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने अशा गुन्ह्यांना आळा घालून गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळविण्याच्या दृष्टीने पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मोटरसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा समांतर तपास करून आरोपींचा शोध घेण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार २८ ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दर्यापूर-अंजनगाव उपविभागात रेकॉर्डवरील मोटरसायकल चोरट्यांची तपासणी करीत होते. यावेळी गोपनीय माहितीदाराकडून उमरी मंदिर परिसरात अजय चव्हाण नावाचा व्यक्ती विनाकागदपत्रांची मोटरसायकल वापरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी उमरी येथून अजय चव्हाण याला मोटरसायकलसह ताब्यात घेतले. मोटरसायकलच्या कागदपत्रांबाबत विचारणा केली असता त्याच्याकडे कोणतीही कागदपत्रे नसल्याचे समोर आले. चौकशीत दर्यापूर येथील रोशन चव्हाण आणि शेख रियाज यांनी ‘दवाखान्याचे काम आहे, गाडीची कागदपत्रे नंतर देतो,’ असे सांगून आठ हजार रुपयांत मोटरसायकल विकल्याची माहिती अजयने दिली. यानंतर पोलिसांनी दर्यापूर येथून रोशन विक्रम चव्हाण (वय २६, रा. टाटानगर, दर्यापूर) आणि शेख रियाज शेख इस्माईल (वय २४, रा. टाटानगर, दर्यापूर) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे कसून चौकशी ☞(पान २ वर)